[Type text]

क्षण जीवनाचे



प्रकाश राऊत

प्रकाश
राऊत

क्षण जीवनाचे

प्रकाश राऊत

"चिरंजीव नात चार्वी, मुलगा आशय, कन्या मृदुला, जावई सचिनराव, सूनबाई पल्लवी, सौ. रेखामाझी पत्नी ईत्यादी सर्व प्रेमळ कुटुंबास तसेच सर्व नातेवाईकांना हे माझे आत्मकथन

सहर्ष

अर्पण करतांना मला अतिशय आनंद होत आहे. याचा सर्वांनी लाभ घ्यावा हीच

ईश्वर चरणी

प्रार्थना करून ही माझी जीवनकथा त्या जगन्नियंत्यास अर्पण "………

अनुक्रमणिका

1. बाल्यावस्था व घडण
2. पब्लीक स्कूल स्पर्धा परीक्षा व यशप्राप्ती
3. पब्लीक स्कूलचे विदयार्थी जीवन
4. महाविदयालयीन जीवन
5. अपयशातून यशाकडे
6. प्रकल्प आणि अभियंता जीवन
7. नोकरीची व्यथा
8. मुलांची घडण
9. मुलगी मृदुला व तिचे आयुष्य
10. माझे प्रमोशन
11. मुलीचे यश
12. माझी जनसेवा व प्रसिध्दी
13. शासन सेवा निवृत्ती
14. आशयचे भवितव्य
15. वाचनाची आवड
16. माझा सेवानिवृत्तीनंतरचा काळ
17. माझे लिखाणाविषयी
18. जीवन दु:खाचा आराखडा
19. समारोप परीच्छेद
20. संदर्भ

लिहिण्यापूर्वी थोडसं...........

लिखाणाचा छंद हा लहानपणापासूनच. पण खरी सुरूवात माझ्या लिखाणाला झाली ती 1978 पासून. मी तोतलाडोह प्रकल्पावर असतांना मला ईंगजी पेपर्स वाचायची खूप आवड होती. हळूहळू मी ‘द हितवाद’, नागपूर टाईम्स, काही लोकल पेपर्स मातृभूमी, जनमाध्यम ईत्यादी वृत्तपत्रात लिहिता लिहिता केंव्हा लेखक झालो हे कळलेच नाही. तरी जीवनातलं पहिलं पुस्तक लिहायला वय उलटून गेलं होतं. ज्ञानप्रकाशन पुणे येथील प्रकाशक श्री. कुणाल हजेरी हे मला एका कान्हेरे मैदान येथे नाशिकला भेटले व माझे पहिले पुस्तक “नोकरशाहितील बाळूच्या गमतीजमती हे 1.03.2011ला प्रकाशीत झाले. त्यानंतर मी ई-साहित्य डॉट कॉमवर माझे दुसरे पुस्तक डिजीटल फॉर्मॅटमध्ये ‘ आजच्या जगात वावरतांना’ हे प्रकाशीत केले. त्यात श्री. सुनिल सामंत यांचा मी आभारी आहे. या वेबसाईटवरच मग मी अजून एक पुस्तक ‘ई साहित्य काळाची गरज’ हे प्रकाशीत केले. असे करत करत अमॅझॉनच्या सेल्फ पब्लीशींग वेबसाईटवर माझे चवथे पुस्तक “Flowering of thoughts”, kindle reader a need of the hour असे व ईतर काही स्वत:च्या कोटेशनची अशी जवळपास दहा पुस्तके Publish केली.

मुळात लेखक व्हावे व पैसा कमवावा हा हेतू कधीच ठेवला नाही पण माझे विचार सर्व वाचकांपर्यंत पोहोचावे हीच प्रबळ ईच्छा ठेवून मी नेहमी लिखाण करीत असतो. मी सध्या प्रतिलीपीवर बरेचदा व नियमीत लिहित असतो. त्यावर मी माझ्या कल्पनेतून अनेक मनोरंजक गोष्टी किंवा माझे अनुभव कथन करीत आलो आहे. त्यामुळेच मला माझे आत्मकथन लिहिण्याची प्रेरणा मिळाली व हे कार्य माझ्या हातून सुरू झाले. यात कितपत यश येईल हा भाग माझेसाठी अतिशय गौण आहे.

कोणतेही लिखाण करणे, वाटते तितके कधीच सोपे नसते. त्यात बरेचदा अनेक अडचणींना तोंड दयावे लागते. मुख्य म्हणजे वेळातून वेळ काढणे, वारंवार स्वत:चाच ड्राफ्ट वाचणे अशा अनेक बाबी पार पाडतांना माझी पत्नी सौ. रेखा ही नेहमीच मला सहकार्य करते. मुलगी मृदुला वर्धेला राहून सुध्दा वारंवार लिहिण्याला उत्साहित करीत असते. मुलगा आशय हा तर सध्या विदेशात असला तरी मलाच ‘रोल मॉडेल’ मानत आला आहे. त्याचा विनयशीलपणा नेहमीच मला प्रोत्साहीत करीत असतो. माझे जावई हे व्यवसायात मग्न असतात पण ते माझे लेख नेहमीच वेळ मिळाला की वाचत असतात. याशिवाय ईतर बरेच

नातेवाईक जसे की, संजयराव सांगोले, काही मित्रमंडळी विशेषत: श्याम कारंजकर हे नेहमीच लिखाण करण्यास प्रोत्साहित करतात. या सर्वांच्या शुभेच्छा माझ्या पाठीशी असतात. तेंव्हाच अशी पुस्तके लिहिण्याचे कार्य घडत जाते. या सर्वात महत्वाचे म्हणजे निसर्गाची साथ. माझे आरोग्यच जर चांगले राहले नाहीतर मी काय लिहू शकणार? जीवनात खूप काही फॅक्टर्स असतात. त्या प्रत्येक बाबीचा उल्लेख करण्यासाठी शब्दसंग्रह अपूरा पडतो. मी जीवनात भरपूर वाचन करीत आलो आहे. त्या सर्व मराठी व ईग्रजी लेखकांचाही मी खूपच आभारी आहे. कारण ते कसे लिहितात हे मी आवर्जून निरीक्षण करीत असतो. व मला लिहिण्याची प्रेरणा मिळत असते. मला प्रसिध्दीची हाव नाही पण जेंव्हा मला प्रतिलीपीवर लिहितांना वाचकांचा प्रचंड प्रतिसाद मिळतो तेंव्हा मात्र माझा लिखाण उत्साह नेहमीच व्दिगुणीत होत आला आहे.

मी माझे स्वकथन लिहिण्याचा प्रयत्न माझे ज्ञानानुसार केला आहे. तो कितपत यशस्वी होतो हे मी वाचकांवरच सोपवतो. शक्यतोवर कोणतेही पुस्तक वाचतांना ते वाचकांना कंटाळवाणे होवू नये यासाठी मी नेहमी तत्पर असतो. त्यामुळेच मी काही जीवनातील प्रसंग हुबेहूब तसेच वर्णन केले आहे. त्यातील काही रोमँटीक प्रसंग जसे की, माझ्या जीवनात आलेलया मुली वगैरे हे केवळ वाचकांच्या मनोरंजनासाठी लिहिलेआहेत.

शेवटी सर्वात महत्वाचा घटक असतो तो म्हणजे वाचकवर्ग. हा जर अस्तित्वात नसता तर कोणीच लेखक झाला नसता. त्यामुळे त्यांचे मन:पूर्वक आधीच आभार मानतो. व माझे हे संक्षिप्त शब्द संपुष्टात आणतो. वाचा बरं कां मंडळी नक्कीच . हे पुस्तक तुम्हाला यत्किंचीतही कंटाळवाणे वाटणार नाही याची मी ग्वाही देतो.

धन्यवाद!

प्रकाश राऊत,हल्ली मु. अमरावती दि. 7.09.2021 Ph.No. 9552543947

****

Kshan Jivnache

क्षण जीवनाचे..आत्मकथन

1. बाल्यावस्था व घडण

" I don't think anybody should write his biography untill after he's dead."-
Samuel Goldwyn

या विश्वातील प्रत्येक व्यक्ति ही एकमेव (Unique) असून प्रत्येकामध्ये काहीना काही वैशिष्ठय असते. असं कोण म्हणतं की, आत्मकथन हे थोर व्यक्तिनींच लिहायला हवे. आपले संक्षिप्त आयुष्य हे थोडक्यात लिहायचा अधिकार प्रत्येकालाच आहे. सुप्रसिध्द लेखक वि.स.खांडेकर तर म्हणतात की, प्रत्येकाच्या जीवनाची कहाणी ही एक कादंबरीच असते म्हणूनच मी कादंबरी तर नाही पण माझ्या संक्षिप्त जीवनाची कहाणी सांगू ईच्छितो.

माझा जन्म वणी तालुक्यामध्ये नांदेपेरा या एका लहानशा खेडयामध्ये 2.11.1955 ला झाला. माझे वडील म्हणायचे की हा जन्म ब्राह्मणाच्या शेजारी झाला असल्याने माझे नांव प्रकाश ठेवण्यात आले. माझे बाबा प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक होते. ते स्वभावाने जरा कडकच असल्यामुळे त्यांची बदली दर वर्षी होत असे. मला माझ्या आयुष्यातले पहिल्या मराठी वर्गापासूनचे आठवते. त्यावेळी मी वेगांव या गावी माझ्या पहिल्या मराठी वर्गात बाबांसोबतच जात होतो. मला आठवते की, मी पहिल्या वर्गात ‘नाच नाच नाचूनी अती मी दमले.....थकलेऽरे नंदलाला ..... आऽ आऽ थकलेरे नंदलाला” हे जीवनातले पहिले गाणे वर्गात म्हटले होते. वर्गात सर्व बालकांनी प्रचंड टाळया वाजवून मला खूप प्रतिसाद दिलेले मला आठवते. त्यावेळी माझे बाबा म्हणाले होते की, ‘आऽरे, तुझा गळा खूप गोड आहे. अशी स्तुती तर माझी आई सुध्दा नेहमीच करीत असे.

माझ्या वडिलांची नोकरी सुरू असतांना त्यांच्या कडक स्वभावामुळे आमची बदली एक वर्षातच दुस-या गावी व्हायची. तेथून माझे वडिल बदलून गेल्यावर हिवरा मजरा येथे तिस-या वर्गापर्यंत मला शिकावे लागले. व चवथ्या वर्गासाठी मला राजूर ईजारा येथे यावे लागले. चवथा वर्ग मी पूर्ण करीत असतांना एकदा माझे वडील माझ्या तिस-या वर्गात, मुख्याध्यापक असल्यामुळे वर्ग तपासायला आले. नेमके मलाच वर्गात उभे करून प्रश्न विचारण्यात आला. त्याचे उत्तर मला न आल्यामुळे मला वडीलांचा मार खावा लागला. ते म्हणाले की , ‘तू हेडमास्तरचा पोरगा असून तुझी ही बोंबाबोंब. ते मलाच नव्हे तर माझ्यापेक्षा मोठया मंदाताईला पण मेहंदीच्या ओल्या काडीने खूप मारायचे. तो काळच मार खाण्याचा होता. आजच्यासारखे

मुलांवर बापलोक लाड करीत नव्हते. काही चुकले की, पाठीवर धपाटा बसत असे. लहान भाऊ विनोद हा तर शाळेमध्ये जातच नव्हता कारण त्याला एका 'गेडाम' मॅडमची खूप भिती वाटत असे.

वडीलांच्या हाताखालीच प्राथमिक शिक्षण झाल्यामुळे काहीसे अभ्यासाचे संस्कार मनावर होतेच. बाबांचे वाचन अफाट होते. दररोजचे वृत्तपत्र वाचण्याच्या त्यांच्या सवयीमुळे, एक दिवस मी चवथ्या वर्गात असतांना त्यांना महाराष्ट्र शासन, खेडयातल्या मुलांसाठी एक स्पर्धा परीक्षा घेवून 'पब्लीक स्कूल' काढत असल्याचे, त्यांचे वाचनात आले. त्यावेळी मी केवळ दहा वर्षाचा होतो. मला काहीच कळत नव्हते. मी राजुरा ता. वणी या खेडयातून त्या परीक्षेला बसलो होतो. जेंव्हा मला त्या परीक्षेला बाबांनी बसविले, त्यावेळी शाळेतील सर्व शिक्षक हसले होते आणि हसणे साहजिकच होते. या परीक्षेला प्रत्येक जिल्हयातून साधारणपणे दोन हजार विदयार्थी बसणार असा शासनाचा अंदाज होता. प्रत्यक्षात मात्र त्या परीक्षेला ईतका प्रतिसाद मिळाला की, त्या परीक्षेला जवळपास 2500 विदयार्थी खेडयामधून एकाच जिल्हा केंद्रावर परीक्षा दयायला आले होते. त्या काळातील ही पहिलीच स्पर्धा परीक्षा होती. ती मुळात खेडे विभागातील मुलांसाठीच शासनाने ठरवली होती. त्याकाळी स्पर्धा परीक्षेसाठी पुस्तकांची उपलब्धता शून्य होती. कोणतीच स्पर्धा परीक्षेकरीता लागणारी तयारी मी अशा पुस्तकाअभावी करू शकलो नव्हतो.

सदर परीक्षेसाठी कोणतीही पुस्तके अस्तित्वात नव्हती. त्यावेळच्या विदर्भातील आठ जिल्हयामधून किमान पंधरा सोळा हजार मुले परीक्षेला बसली असतांना शासनाला केवळ विदर्भासाठी तीसच विदयार्थी घ्यायचे होते. मग अशा परिस्थितीत माझ्या वडीलांनी मला बसवावे म्हणजे निवडीची शक्यता हास्यास्पदच होती.

सर्व शिक्षक म्हणाले, 'गुरूजी कशाला या भानगडीत पडता. खरंच तुमचा मुलगा विदर्भात पहिल्या तीसमध्ये येणार आहे काय? उगीच पैशाचा अपव्यय आहे हा. उगीच यवतमाळ येथे जा, पैसे खर्च करा आणि वापस या.

बाबा म्हणाले....'मी पोराला फिरायला नेतो आहे. त्याला बसमध्ये प्रवास करायला खूप आवडते.'

बाबांनी त्याचा निश्चय कायम ठेवला आणि मग एक दिवस मला म्हणाले...

'चलतो कां फिरायला. खूप लांब बसचा प्रवास करायचा आहे'.

हे ऐकूण मला अतिशय आनंद झाला पण मला नेमके कशासाठी प्रवासाला नेत आहेत याची कल्पनाही नव्हती. माझे बालमन केवळ प्रवासाचा आनंद घेत होते. यवतमाळला पोहोचल्यावर अमोलकचंद महाविदयालयाजवळ एक शाळा होती तेथे ती स्पर्धा परीक्षा होणार होती. प्रथम खायला भरपूर केळी दिली. एक पेन्सिल घेवून दिली. व म्हणाले.... 'तू आता या शाळेमध्ये जा. तीन तास तूला परीक्षा दयायची आहे. परीक्षेत जे प्रश्न येणार आहेत त्याची उत्तरे त्या प्रश्नाखालीच असणार आहेत. चार उत्तरे असतील त्यापैकी चारही निट वाचून योग्य उत्तरावर पेन्सीलने काळा गोल व्यवस्थीत करायचा आहे. मला आश्चर्यच वाटले की, या भानगडीसाठी मला येथे आणले की काय? माझा काहीच उपाय चालला नाही.

सर्व पालकांनी मुलांना महाराष्ट्रातील मंत्र्यांची नावे, भौगोलीक माहिती ईत्यादी तयारीनिशी आणले होते. आणि मला केवळ प्रवासात फिरण्याच्या हेतूने आणले होते. मी परीक्षेसाठी आंत गेलो व परीक्षा शांत चित्ताने दिली. बाहेर आल्यावर ते मला म्हणाले की.. ‘पेपर कसा होता?’ प्रवासातही तोच प्रश्न, मला म्हणाले,' पेपर कसा होता'. माझ्या बालमनाला ते काय कळणार होते पण मी बोललो, ' चार प्रश्नांपैकी दोन उत्तरे तर नक्कीच चुकीची आढळत होती पण उरलेली दोन मात्र सारखीच वाटत होती. नेमके कोणते अचूक असेल हे मला कळत नव्हतं म्हणून मी कमी प्रश्न सोडवले. जे सोडवले ते मात्र अचूक असावे अशी माझी धारणा आहे'. प्रवासात परत येतांना खूप आनंद घेतला. पुढे काय घडले ते क्रमश: भाग2 मध्ये सांगणार आहेच.

****

2. पब्लीक स्कूल स्पर्धा परीक्षा व यशप्राप्ती

" Blessed is he who expects nothing, for he shall never be disappointed."- Alexander Pope

" भाग्यवान ते असतात की, जे कशाचीही अपेक्षा ठेवत नसतात की, ज्यासाठी त्यांना नैराश्य येणार असतं."- अलेक्झांडर पोप

पब्लीक स्कूल परीक्षा आटोपली. मी व माझे बाबा यवतमाळवरून बसने परत आलो. बसमधून लागणा-या थंड हवेने मी बसमध्ये लवकरच झोपी गेलो होतो. वणीवरून एका पॅसेंजरने राजूरला व तेथून मग तीन किलोमीटर पायी असे माझ्या गावाला जावे लागत असे. माझ्या वडिलांना परीक्षेच्या निकालाची उत्सुकता तर होतीच पण त्यांचा मुलगा या स्पर्धा परीक्षेसाठी निवडल्या जाणार की नाही, याची खात्री व अपेक्षा मात्र नव्हती. मी त्यावेळी नुकतीच प्राथमिक शाळेची चवथ्या वर्गाची बोर्डाची परीक्षा दिली होती व त्यात मला प्रथम श्रेणी मिळाली होती. ही गोष्ट 1964 ची आहे. आजही त्या गुणपत्रिकेवर मुख्याध्यापक म्हणून माझे वडीलांचीच सही आहे. त्या काळात झेरॉक्स असा प्रकार नसायचा त्यामुळे गुणपत्रिकेच्या दुय्यम प्रती हातानेच वडिल सुवाच्च अक्षरात लिहून सुरक्षीत ठेवायचे.तशीच कापडाने गुंडाळलेली दप्तर पध्दत बरेच काळ मी पण वापरत होतो.

माझे वडील जेथे, म्हणजे राजुरा या खेडयामध्ये मुख्याध्यापक म्हणून नोकरी करीत होते त्या शाळेत फक्त सातवीपर्यंतच वर्ग होते. माझी मोठी बहीण मंदाताई त्यावेळी सातव्या वर्गात शिकत होती. दोघानांही भविष्यात चांगल्या शहरातल्या शाळेत शिक्षण घेता यावे या हेतूने आमच्या बाबांनी आम्हा दोघांना एक लहानशी खोली भाडयाने घेवून शिकायला वणी शहरात ठेवले होते. जनता विदयालयात मी पाचव्या वर्गासाठी दाखल झालो. व मंदाताई आठव्या वर्गासाठी दाखल झाली होती. आम्ही दोघे बहिण भावंडे मंथनवार यांचे घरामागील खोलीत राहात होतो. आमची शाळा तट्टयाचीच बांधलेली असायची.

मला अभ्यासाची आवड होतीच त्यामुळे मी साडे दहा वाजेपर्यंत जागत असे व ताई लवकर झोपून जायची पण माझा अभ्यास निट व्हावा म्हणून आमच्या बेडजवळ नेहमी उदबत्ती लावायची. एक दिवस मला अचानक अभ्यास करता करता झोप लागली. आम्ही दोघेही गाढ

झोपेमध्ये असतांना लावलेली उदबत्ती केंव्हा आमच्या गादीच्या कॉर्नरवर पडली ते आम्हास कळलेच नाही. गादी करपत करपत जळत होती व आम्ही दोघेही झोपेत. त्या काळात पंखे नव्हते म्हणजे किमान आमच्या खोलीवर तरी गरीबीमुळे पंखा नव्हता. खिडकीतून येणा-या मंदवा-यामुळे गादीचे करपत जळणे माझ्या डोक्याचे दिशेने हळूवार येत होते. गादी करपत जळत होती आणि आम्ही गाढ झोपेत होतो. आमचे नशीब बलवत्तर की काय ताईला अचानक जाग आली आणि गादी जळतांना दिसली. तशी ताबडतोब मला झोपेतच तिने एक पाठीवर झापड लगावली व लगेच उठवले. हळूहळू घरमालकीनही आमच्या खोलीत काय विपरीत घडले हे पाहण्यासाठी आल्या होत्या. त्या दिवशी आम्हा दोघांचाही जीव ईश्वर कृपेने वाचला. हे विशेष होय.

पाहता पाहता वर्ष संपत आले होते पण स्पर्धा परीक्षेचा निकाल काही लागत नव्हता. बाबांना मी पास होईल याची अपेक्षाही नव्हती. मला तर फारसे कळतच नव्हते. माझे व ताईचे हे वर्ष केवळ एकत्र गाणे म्हणण्यात गेले. पाकीजा, ‘हिमालय की गोदमे’ अशा चित्रपटातील गाणे आम्ही उपजतच चालीसह पाठ करायचो व म्हणायचो. आमचे मोठे बंधू श्री. किशोर भाऊ आम्हाला एक लहानशे गाण्याचे पुस्तक आाणून दयायचे. त्यांना देवानंद या नटाचे चित्रपट खूप आवडत असे. ताईचा गळा अतिशय गोड होता व मी पण काही कमी प्रतीचा चांगला गात नव्हतो, असे नव्हे. पण ताईच्या तुलनेत जरा कमीच. ती मात्र हुबेहूब लता मंगेशकर सारखी गाणे म्हणायची. एक दिवस बाबा अचानक खोलीवर वणी शहराला भेट दयायला आले. अतिशय आनंदी दिसत होते ते. मला अचानकच म्हणाले," प्रकाश, तू पब्लीक स्कूल परीक्षेत केवळ उत्तीर्णच झाला नाही तर तुझी निवड शाळेसाठी झाली आहे. व तू विदर्भातून अकरावा मेरीट आला आहेस. विदर्भातील तीस विदयार्थ्यांच्या निवडीमध्ये आपल्या यवतमाळ जिल्हयातून फक्त तेरा मुलांची निवड झाली आहे व त्यात तुझा नंबर लागला आहे. शासनाने तसे सविस्तर पत्र पाठवले आहे. विलंबाने कां होईना पण माझ्या पदरात यश पडले होते. मेरीट काय असतं हे कळण्याएवढंही माझं वय नव्हतं. तेंव्हा मी अकरा वर्षाचा होतो. माझं शिक्षण यापुढे शासनाच्या एका उच्च शाळेत होणार होतं ही माझेसाठी खूप आनंदाची बाब होती.

शासनाचे पत्र फार मोठे होते, त्यात विदर्भातील मुलांना शासकीय पब्लीक स्कूल चिखलदरा या शाळेत मोफत शिक्षणासाठी जावे लागणार होते. बाबा पत्र वाचत असतांना एकदम गंभीर झाले होते कारण मला कळलेच नाही. त्यांचे डोळेही पाणावले. ते मला म्हणाले," बाबा (ते मला लाडाने बाबाच म्हणायचे), तुझी निवड तर झाली आहे पण ती शाळा वणी या

शहरापासून चारशे किलोमीटर दूर आहे आणि तू तर फारच लहान आहेस." मी त्यावेळी केवळ अकरा वर्षाचा होतो.

मग आई बाबांचा संवाद मी चोरून झोपेच्या वेळी ऐकत असे.

बाबा: अगं मनु, ऐकतेस कां. "आपला बाबा प्रकाश शासकीय शाळेसाठी निवडल्या गेला आहे. पण त्याची शाळा चारशे किलोमीटर दूर आहे. त्याला वर्षभर त्या शाळेमध्ये राहावे लागेल व त्याचे पुढील पूर्ण अकरावी पर्यंतचे शिक्षण महाराष्ट्र शासनातर्फे मोफतच होणार आहे.'

आई: मी आधीच बोलले होते की, त्या परीक्षेला त्याला बसवू नका. झालं ना आता जे व्हायचं ते. मी त्याला त्या शाळेत जावू देणार नाही. मी माझ्या पोराला एवढया दूर पाठवणार नाही.

बाबा: वेडी आहेस कां तू. अशी संधी वारंवार चालून येत नसते. आपण भाग्यवान की, आपण कशाचीही अपेक्षा ठेवली नाही तरी प्रकाश निवडल्या गेला आहे. आणि तुला तर माहितच आहे की, आपली परिस्थिती कशी आहे. मला जेमतेम शंभर रूपये पगार आहे. तेंव्हा जावू दे त्याला शिकायला. सर्व शिक्षण मोफत आहे असे स्पष्ट लिहिले आहे. माझा आग्रह आहे तूला.

आई अश्रू गाळत होती ते बाबांचे बोलणे ऐकूण म्हणाली..."पोराले इतक्या दूर पाठवता कां?" तिकडे काही आपल्या माघारी बरं वाईट झालं तर मग काय पोरगं गमावून बसान काय?

बाबा: तूला तर चांगलच माहित आहे की, वणीला काय घडलं होतं. ते जर त्या उदबत्तीनं मेलं असतं तर तू काय केलं असतं, आपण होतो कां तिथं? मग आताही असं समज की, एक एक वर्षासाठी तो आपल्यासाठी काही क्षणासाठी दूर जात आहे. त्याच्या भविष्यासाठी आपण आपल्या छातीवर गोटा ठेवायला नको कां?

बाबांनी आईची संमती तर मिळविली होती परंतू त्यांना परत एक भयानक अडचण जाणवली. ती म्हणजे शासनाने एक भली मोठी यादी सोबत दिली होती की, मुलांसोबत खालील गोष्टी देणे अनिवार्य आहे असे पत्रात नमूद होते. शासन या बाबीसाठी येणारा खर्च नंतर प्रतीपूर्ती (Reimbursement) करून देणार होता. ती यादी एवढी लांब होती की, त्यासाठी किमान दोनशे रूपये खर्च येणार होता. त्या यादीमध्ये एक लोखंडी पेटी, दोन पोशाख खाकी व पांढरा, पांढरे व खाकी जोडे, साबण पेस्ट, टूथब्रश, मोठा टॉवेल, छोटा नॅपकीन ईत्यादी... नॅपकीन हा शब्द तर आम्ही एकलाही नव्हता. एवढे सामान घेवून देण्यासाठी बाबांजवळ पैसे नव्हते त्यामुळे ते फार

चिंतेत होते. शंभर रूपये पगारात दोनशे रूपयाचे सामान या पोरासाठी कोठून घ्यायचे. बाबांची चिंता मला कळत होती. माझ्या बालमनाने त्यावेळी भीक मागण्याचा निर्धार केला.

मी शिकत असतांना माझे वर्गात एक राजासेठची लता नावाची मुलगी होती. वणीजवळ राजूरला खूप चुण्याचे भट्टयांचे कारखाने आहेत. असे कारखाने राजूरला खूप आहेत. त्यातीलच राजासेठ एक होते. तेथे बरीच सेठमंडळी होती. तीनेच मला सल्ला दिला होता की, तीचे बाबा दहा रूपयापर्यंतची मदत करू शकतात. तसेच मी जर सर्व सेठ लोकांची भेट घेतली तर मला दोनशे रूपये सहज मिळू शकतात. प्रथम मी लताच्या वडिलांकडे न जाता पापासेठकडे गेलो. आमच्या सोबत माझे वडील व माझ्या शासन निवडीची माहिती सांगण्यासाठी एक गाईड पोरगा अशी मंडळी होती. त्यावेळी म्हणजे 1966 ला मला पापा सेठनी 20 रूपयाची भरगच्च मदत केली. मग हे बघून ईतरही सेठ लोकांनी मला खूप मदत केली. अशा पध्दतीने मी बाबांना दोनशे रूपये सेठ लोकांच्या दारोदारी जावून मिळवून दिले होते. तेही माझ्या सोबत होतेच. पण महत्वाचे एवढेच आहे की, मी माझ्या शिक्षणासाठी त्या वेळी म्हणजे माझे वयाच्या केवळ अकराव्या वर्षी भीक सुध्दा मागितली आहे. आजकालच्या मुलांवर असा प्रसंग येत नाही. शिक्षणाचे महत्व त्या काळातही माझ्या बालमनाला समजले हे सर्व माझ्या वडिलांची मी पुण्याई समजतो. माझी आई चवथ्या वर्गापर्यंत शिकली होती आणि त्या काळात ती सही करीत असे तरी सुध्दा माझी आई शेतात निंदण करण्यासाठी जात होती. कष्टाच्या सुरकुत्या तिच्या चेह-यावर नेहमीच दिसत असे. आम्ही सायंकाळी तिची चातक पक्षाप्रमाणे वाट पहात होतो की, ती आम्हा बालकांसाठी तुरीच्या शेंगा खायला शेतातून आणेल. असे ते रम्य बालपण काळाच्या ओघात आईवडीलांच्या आठवणीसह आज लोप पावले आहे. ‘धरतीपे रूप माँ बापका, ये विधाता की पहचान है....या गाण्याची आठवण झाल्याशिवाय राहात नाही.

आता पुढील पब्लीक स्कूलच्या प्रवेशाचे काय होते ते पुढील भागात सांगणार आहेच.

****

3. पब्लीक स्कूलचे विदयार्थी जीवन

" Once you replace negative thoughts with positive ones, you'll start having positive results."- Willie Nelson

पब्लीक स्कूल परीक्षेचा निकाल तब्बल अकरा महिण्याने लागला होता. बाबांनी तर आशाच सोडली होती पण मी मात्र खूप आशेने व आतुरतेने वाट पाहल्यामुळेच मला यश प्राप्ती झाली होती. वडीलांनी शासनाचे निर्देशानुसार सर्व तयारी सुध्दा केली होती. सर्वात प्रथम तीस रूपयाची एक लोखंडी पेटी वणी शहरातून घेवून दिली. त्याकाळी सुटकेस महाग मिळत होत्या. ते श्रीमंत लोकच घेवू शकत होते. आम्ही गरीब म्हणून टीनपटाची पेटी घेतली. ती पेटीवर शासकीय विदयानिकेतन चिखलदरा असे पेंटींगने वडीलांनी लिहून दिले होते. तशी त्याकाळी पेटीवर नावे लिहिण्याची पध्दत होती. माझा, 'त्यांना पैशाची मदत करण्यात' सिंहाचा वाटा होता. सर्व प्रकार झाल्यानंतर सुध्दा शासनाचे परत एक पत्र आले की काही तांत्रिक अडचणीमुळे सदर शाळा 1967 ला चालू होणार आहे. आता मी सहाव्या वर्गात गेलो होतो. दूर असणारी शाळा एक वर्ष उशीरा चालू होणार याचा सर्वात प्रथम माझ्या आईला आनंद झाला. आणि दुसरा आनंद झाला असेल तर तो माझी बालमैत्रीण सुनंदा हिला. आम्ही त्यावेळी बेलदार पु-यात वणी शहरात राहात होतो. वडील मंदर या खेडयावर शाळेमध्ये सायकलने तीन किलोमीटर दररोज जायचे.

चातक पक्षी आकाशात पावसाची वाट पहातो त्याप्रमाणे माझी बालमैत्रीण सुनंदा माझी शाळा किती उशीरा सुरू होईल याचीच वाट पहात होती. होय हे खरंच आहे. मी केवळ बारा वर्षाचा व ती केवळ दहा वर्षाची पण आमची मैत्री काही निराळीच होती. दोघात असलेलं निखळ व शुध्द प्रेम पब्लीक स्कूलच्या विरहातच जाणार होतं, हे निश्चित झाले होते. कालांतराने ती माझेपासून या दुनियाच्या गर्दीत केंव्हाच लुप्त झाली. पण तत्पूर्वी रोज दुपार झाली की, ती माझे गाणे ऐकायला माझ्या जवळच असलेल्या घरी नेहमीच यायची. आईची दुपारची वामकुक्षी सुरू झाली की, आम्ही तासनतास बंगईवर (पाळण्यावर) गप्पा मारत होतो. गप्पाही कोणत्या तर केवळ अभ्यासाच्या. एक दिवस तो चिमुकला जीव मला म्हणाला.....

" प्रकाश, खरंच तू चिखलद-याला शिकायला जाणार आहेस कां? ती म्हणाली..

"अगं,तो विचार तू सोडून दे, कारण मी दरवर्षी जुलै आगष्ट मध्ये दोन महिण्याच्या सुट्टीत येणार आहेच. मी आलो की आपण खूप खेळत जावू व गप्पा पण मारत जावू...मी म्हणत असे.

"पण मी एकटी कशी अभ्यास करणार. तुला पाहलं की, मला वेगळाच उत्साह येतो." आणि ती अश्रू गाळायला लागली. आमचे प्रेम हे एखादया बहिण भावाप्रमाणे मला भासत होते.आम्ही घरातल्या बंगईवर (पाळण्यावर) बसून गप्पा करीत होतो. सुनंदाला सोडून मला ही एकटेपण जाणवणारच होते कारण त्या पब्लीक स्कूल शाळेमध्ये मुली नसणार ही पण जाणीव मला होती.

माझे मोठे भाऊ सध्याचे स्व.किशोर हे त्यावेळी नुकतेच यवतमाळ जिल्हयात चोरखोपडी या लहानशा दुर्मिळ खेडयात प्राथमिक शिक्षक म्हणून नोकरीवर लागले होते. ते ही मला सोडून जाणार होते. आई, वडील, मोठा भाऊ किशोर व जीवलग मैत्रीण सुनंदा या सर्वांना सोडून जाणे म्हणजे माझ्यासाठी कठीणच काम होते. सुप्रसिध्द हिंदी लेखक प्रेमचंद त्याच्या एका कथेमध्ये म्हणतातच की, "गहरे पानी पैठनेसेही मोती मिलते है." तीच माझी स्थिती होती. मला माझ्या जीवनात शिक्षणाचे शिखर गाठायचे होते. व खोल पाण्यातील शिक्षणाचे मोती गाठायचे होते.

एक वर्ष असेच निघून गेले व शासनाचे पत्र आले की, सर्व पालकांनी आपापल्या पाल्यांना जिल्हा स्तरावर आणून दयावे व नंतरची जबाबदारी शासनाने घेतलेली होती. ठरल्याप्रमाणे मी सातव्या वर्गात प्रवेश घेण्यासाठी चाललो होतो आणि तेही बाबांना सोडून. यवतमाळला सर्व निवड झालेले विदयार्थी जमले होते व आम्हास घ्यायला शासनाचे शिक्षक आले होते.

त्यांचे हवाली मला सोडतांना बाबांना जणू वाटत होते की त्यांचा 'राम' चिखलद-याच्या वनवासात पांच वर्षासाठी जात आहे. भविष्याच्या वाटेवर मी ‘एकला चलो रे’, अशी माझी स्थिती झाली होती. बरीच मुले त्यांच्या पालकांना सोडतांना खूप रडत होती कारण ती केवळ 13 वर्षे वयाचीच होती.

चिखलदरा प्रथमच पहात असतांना घटांग येत पर्यंत काहींना घाटात उलटया झाल्या तर आम्ही काही मुलं त्या मेळघाटाच्या हिरवळीची मजा घेत होतो. बस डोंगराच्या वळणावरील वाटेवर घरघर करत चालली होती. ड्रायव्हर ईकडून तिकडे हात फिरवून गाडी वळवत होता. एकीकडे डोंगराचे सौंदर्य व दुसरीकडे हा जीवघेणा पहिला प्रवास. जीवनात पहिल्यांदाच घाटाचा प्रवास करत होतो. वळणे ईतकी भारी की, गाडी वरच्या वळणावर गेली की खालची दोन किंवा तीन वळणे वरून खिडकीतून दिसायची. असे वाटत होते की, बस खाली दरीत कोसळणार तर

नाही. घटांग हे खेडं परतवाडा ते चिखलदरा या रस्त्यामधले अगदी मध्यातले स्थळ. तेथे गाडी ईंजिन थंड होण्यासाठी काही काळ थांबत असे. त्यानुसार ती क्षणभर बस ईंजिन थंड होण्यासाठी थांबली. आम्ही खाली उतरूही शकत नव्हतो कारण गाडीच्या दरवाज्याजवळच सर्वांनी उलटया केल्या होत्या. बसमधील आतील आदिवासी म्हणायचे... मोटरका मौसम बिघड गया यार...आंत एक उलटयांचे बिभत्स दर्शन व बाहेर ते डोंगरांच्या रांगाचे रम्य दर्शन. घटांग नंतर एक वेगळाच अनुभव यायला लागला. चिखलद-याची थंड वा-याची झुळूक मनाला विसावा देत होती. ती आल्हाददायक हवा मन खेचून घेत होती. कसे बसे चिखलदरा आले] तेंव्हा एका नगरपरीषदच्या कमानीने आमचे स्वागत केले. त्यावर लिहिले होते की, ‘नगरपरीषद चिखलदरा आपले स्वागत करीत आहे’. कडक शिस्त असलेल्या शाळेमध्ये आम्ही पोहोचले. आमची शाळा टेकडयावर होती. शाळा अशा पध्दतीने बांधलेली होती की, चारही बाजूने खोल्या व मध्यभागी चौकोनी लहान मैदान. आजही ती ओसाड ईमारत चिखलद-याला अस्तित्वात आहे ज्यात आम्ही घडलो. मायबाप विरहीत अवस्थेत आम्ही केवळ शासन शिक्षकांच्या ताब्यात गेलो. आदर्श शाळेत प्रवेश तर झाला पण पुढे काय, कशी वागणूक आम्हास मिळेल, आम्ही रडण्याव्यतिरिक्त काय करणार होतो.

तेथे कोणत्या प्रकारची वागणूक मिळणार होती, काय खायला मिळणार होते, राहण्याची व्यवस्था शासनाने कशी केली होती. विदर्भातील सर्व जिल्हयातील मुलांची भाषा कशी वेगळी होती त्यात काय गंमती होत्या. शिक्षकांना ही मुले नियंत्रित करणे, किती कठीण जात होते, चिखलद-याचे वातावरण त्या काळात कसे होते वगैरे सर्व बाबी क्रमश; पुढील भाग क्रमांक 4 मध्ये मी घेवून येत आहे.

'You can't change your situation, the only thing you chose to deal with it.'-
Curiano quotes.com

सर्व विदर्भातील शासनाच्या स्पर्धा परीक्षेत निवडलेली पहिली तीस मुले चिखलद-याच्या शाळेत पोहोचली. सर्वांची मुद्रा नाराजीची दिसत होती. मी पण विचारातच गुंतलो होतो. 1967 साली त्यावेळचे शिक्षण मंत्री श्री. मधुकररावजी चौधरी यांचे कल्पनेनुसार शाळेला सुरूवात झाली. त्यांनी आमच्या शाळेला अनेकदा भेटी दिल्या होत्या. त्यांची एक उत्कृष्ट कल्पना या शाळेच्या रूपाने भविष्यात साकारण्यासाठी आम्ही खेडयातील विदयार्थी तेथे पोहोचलो होतो.

आम्हाला प्रत्येकाला एक अॅटलास कंपनीचा डबलबेडचा कॉट ज्यावर खाली एक व वर एक विदयार्थी झोपणार होतो. अशा प्रकारचा कॉट मी पहिल्यांदाच जीवनात पाहला होता. कारण मी खेडयावर खाटेवरच झोपत होतो कधी कधी तर जमीनीवर झोपावे लागत असे. तसेच एक गोदरेच कंपनीची आलमारी वैयक्तिक देण्यात आली. चार फुटाची ती आलमारी आमच्या उंची एवढीच होती. सर्व मुलाची भाषा अशी होती की, जणूकाही आठ जिल्हे म्हणजे आठ नदयांचे पाणी एकत्र करण्यात आले होते. ते पाणी एकत्र थोडेही एवढया लवकर मिसळणार होते. वार्डन म्हणून चांगल्या स्वभावाचे श्री. तिवारी सर तसेच अत्यंत कडक स्वभावाचे श्यामसुंदर पंचारिया सर होस्टेल प्रमुख म्हणून लाभले होते. याशिवाय रेक्टर व प्राचार्य श्री. सिंगम सर अशी मंडळी आमच्या वर देखरेखीसाठी होती. शाळेची दैनंदिनी खालीलप्रमाणे होती.

सकाळी पाचला उठणे अनिवार्य होते. पांच ते सहा शौच मुखमार्जन व सहा वाजता पीटीसाठी तयारी. सहा ते सात आलाडोहपर्यंत धावणे व नंतर व्यायाम अर्थात पीटी. आठपर्यंत ते साडे आठ नाश्ता. सरकारने पत्येक विदयार्थ्यामागे त्या काळात एकशे पंचेवीस रूपये महिना अनुदान ठरविले होते. खाण्यापिण्याची खूप रेलचेल होती. नाश्त्यामध्ये कधी उपमा, ब्रेड दूध, कधी पोहे असे रहायचे. साडे आठ ते दहापर्यंत वसतीगृहात अभ्यास. दहाला जेवण. जवणात सुग्रास भोजन मिळत असे. रविवारी गोड जेवण किंवा सामीष भोजन पण मिळायचे. अकराला शाळा. दोन वाजता चहा. पांचला शाळा सुटली की नंतर पुन्हा दोन तास खेळ. रात्रीचे जेवणानंतर सुध्दा झोपायचे वेळी घट्ट दूध. सायंकाळची प्रार्थना पण यात आलीच. वाचनालय चोवीस तास होस्टेलमध्येच होते. दररोज दैनंदिनी लिहिणे सुध्दा अनिवार्य होते. पण गावात

जाण्याची परवानगी नसायची. ही पब्लिक स्कूल शाळा त्यावेळी फार प्रसिध्द झाली होती पण आज तीचे स्वरूप काळं कुत्रही विचारत नाही. कारण शासनाने सातत्य ठेवले नाही. केवळ आरंभशूरपणा दाखविला आहे.असे आज वाटते. तेथील उत्कृष्ट जेवण व भरपूर व्यायाम यामुळे प्रत्येकाच्या तब्येतीत फार सुधारणा होत असे. काहींच्या मांडया पिळदार तर काही माझ्यासारखे जिमनॅस्टीक एक्सपर्ट झाले.

अकरावी मॅट्रिकनंतर सर्वांना वा-यावर सोडून दिले. तरी सुध्दा आज पब्लीक स्कूलची मुले खूप मोठया पदावर आहेत. काही जिल्हाधिकारी, उदा. रविंद्र जाधव, काही एस.पी., तर काही न्यायाधीश जसे सुनिल मोडक,आर टी ओ ऑफीसर शरद जीचकार,तर काही विदेशात उदाहरणार्थ हटवार Senior Geophicist अशी स्थिर झालेली आहेत. काहींची अवस्था तर शाळेने सोडून दिल्यामुळे फार खराब झाली आहे. उदाहरणच दयायचे असल्यास श्री. किसन कांबळे हा पब्लीक स्कूलसारख्या शाळेत शिकूनही नागपूरात सायकल रिक्शा ओढत आहे. हा सर्व शासनाच्या दुर्लक्षाचा एक भाग आहे. आम्ही या शाळेचा दर्जा आजही टिकून राहावा यासाठी माजी विदयार्थी कल्याण संघ स्थापन केला. त्यामध्ये स्व. प्रदीप वानखडे, देवकिशोर गडपांडे, किशोर नगराळे तसेच सर्व सिनीयर्स हे नेहमी धडाडीने कार्य करतात. पण रत्नदीप वानखडे सारखे काही ज्युनिअर्स सोडले तर ईतरांना मात्र अशा समारंभात काहीही आवड नाही असा माझा अनुभव आहे. प्रदीप गेल्यानंतर मला अमरावतीच्या स्नेहसंमेलनात संचालन करण्याची संधी देवकिशोर गडपांडेनी दिली. पांडूरंग वानखडे हे सुध्दा मला पी.एम. या नावाने हाक मारून माझेवर प्रेम करतो आहे. बरीच मंडळी जशी रमेश मेश्राम हा मला वाचण्यासाठी आजही डिजीटल पुस्तके पुरवितो आहे. सर्वांचीच नावे येथे लिहिणे विस्तारभयास्तव मला शक्य होणार नाही. 1971 पासून आजतागायत आम्ही दरवर्षी प्रत्येक जिल्हयात 14 जानेवारीला वार्षिक मेळावे घेत असतो. ही एकच संस्था अशी आहे की , आम्ही चाळीस वर्ष होवूनही एकत्र येत असतो. ना पंथ ना जात, ना कोणता भेदभाव. आम्ही जणू बंधूच एकामेकांशी सख्या भावापेक्षाही प्रेम करीत आलो आहे. अशा आदर्श शाळेत नेमके कोणते संस्कार आम्हाला आदर्श शिक्षकांनी दिले असावे हे जाणून घेण्याची आपणास नक्कीच उत्सुकता लागली असेल. शाळेमध्ये विशेषत: तिवारी सर, बक्षी सर, करकरे सर, कुळकर्णी सर,वाघमारे सर असे अनेक शिक्षक त्या काळात स्वत:चे वेतन किती आहे हे न पाहता केवळ आमचे भविष्य मेहनत घेवून घडवित होते. आमच्या शाळेवर लिहायला बसलो तर तुम्हाला कंटाळा

येणार नाही अशी कितीतरी पाने मी लिहू शकतो. बक्षी सर तर मला भविष्यात तोतलाडोह प्रकल्पावरही भेटले होते. ते विदयार्थ्यांची सहल घेवून आले होते.

पुढील जीवनाकडे वळण्याआधी माझेवर व ईतर विदयार्थ्यांवर काय नेमके संस्कार झाले व ते कशा प्रकारे करण्यात आले याची थोडक्यात माहिती मी पुढील भागामध्ये लिहिणार आहे. जीवनात यश कसे मिळवावे हा मंत्रच सर्वांना कळावा हाच एकमेव हेतू माझे आत्मकथनाचा गाभा आहे. आम्ही आलेल्या परिस्थितीशी बालवयापासुन स्वत:ला कसे जुळवून घेतले, हे नक्कीच यापुढे वाचणीय राहणार आहे. सर्व सामान्यांना किंवा आजच्या विदयार्थ्यांना आजकाल वेळ मिळत नाही अशी सबब असते. **************************

"It's very hard to remain a student in Life."- Carol Kane. Picture quotes.com

पब्लिक शाळा बालवयातच सुरू झाली. शाळेमध्ये संस्काराला सुरूवात कशी झाली हे या भागात आपण पाहणार आहोत. अगदी सुरूवातीला विदर्भातील त्या काळातील आठ जिल्हयाची मुले तेथे आली होती त्यामुळे प्रत्येकाची भाषा वेगळी असणे साहजिकच होते. सर्वांना एकत्र बसवून एक शिक्षक म्हणाले,' सांगा मुलांनो, जर एखादा मुलगा भिंतीवर गेला तर त्यास तुम्ही तुमच्या भाषेत काय म्हणाल. प्रश्न अतिशय सोपा होता म्हणून एक भंडा-याचा मुलगा मोठया तावातावाने उठला व म्हणाला,' गुरूजी लय सोप आहे. तो दिवालीवर यंगला. सर प्रथम हसले व नंतर आश्चर्यचकीत झाले होते. ते म्हणाले,' अरे जरी आपल्या विदर्भावर सी. पी. अॅण्ड बेरार प्रदेशाचा प्रभाव असला तरी असे हिंदी व अशुध्द मराठीत बोलायचे नसते. 'तो भिंतीवर चढला' असे म्हणावे. ही भंडा-याची मुले, 'च' ला च्य व ज ला ज्य म्हणायची. अमरावती जिल्हयाची मुले विशेषत: दर्यापूर भागातील मुले 'पळाला या शब्दाला पयाला' व मले तुले, महयावाल, तुहयावाल, असे बोलायचे. सर्व जिल्हयातील मुलांची भाषा फारच वेगळी होती. एक उदाहरण केवळ मनोरंजन या हेतुने देतो. माठात बुडवून पाणी घ्यावयाच्या लोटीला किती शब्द आहेत बघा. वर्धा जिल्हा 'डवला, चंद्रपूर 'वगराळ' नागपूर ' लोटी, चंबू, छोटं भगूनं वगैरे, सांगण्याचे तात्पर्य एवढेच की, एवढी गावंढळ भाषा आम्ही त्या काळात बोलत होतो. एक वर्षात आमच्या भाषेत खूप बदल झाला व आम्ही जेंव्हा पावसाळयाच्या सुट्टीत घरी जायचो

तेंव्हा आमची भाषा पाहून आमचेच आई वडील आमच्या शुध्द भाषेला हसत होते. हा भाषेचा पहिला संस्कार.

आमच्या शाळेला उन्हाळयाऐवजी पावसाळयामध्ये दोन महिण्याची सुट्टी राहत असे कारण मेळघाटात जुलै आगष्टमध्ये पाऊस खूप पडायचा व थंडी फारच असायची. आज ग्लोबल वार्मींगमुळे चिखलद-याचे तापमानही वाढले आहे. वर्ग लगेच म्हणजेच एक 'मे' ला च चालू व्हायचा. दुसरा संस्कार प्रार्थनेचा. जेवायच्या वेळी 'वदनी कवळ घेता, नाम घ्या श्रीहरीचे, सहज हवन होते नाम घेता फुकाचे, जीवन करी जीवित्वा अन्न हे पूर्ण ब्रह्म, उदरभरण नोहे जाणिजे यज्ञ कर्म'. ही प्रार्थना म्हणणे अनिवार्य होते. आज सहासष्ट वर्षाचे माझे वय असून सुध्दा अशा प्रार्थना आम्हा सर्व विदयार्थ्यांना पाठ आहेत. आंघोळीच्या वेळी, गंगेच यमुना चैव गोदावरी सरस्वती नर्मदा कावेरी सिंधु जलेस्मिनम् सन्निधींम कुरू वगैरे सर्व आजही जशाचा तशा मुख:पाठ आहेत. याव्यतिरीक्त सायंकाळची संत तुकडोजी महाराजांची सामुदायिक प्रार्थना सुध्दा सर्वांना पाठ आहेच. ती म्हणजे, "है प्रार्थना गुरूदेवसे यह स्वर्ग सुख संसार हो, अति उच्चतम जीवन बने, परमार्थमय व्यवहार हो.." हे सर्व संस्कार या शाळेचे आमच्यावर झालेले अनंत उपकार आहेत.

दैनंदिनी लिहिणे अनिवार्य होतेच. सायंकाळच्या प्रार्थनेच्या वेळी ती वेळेवर कोणालाही उठवून वाचवून घेतल्या जात असे. याबाबत माझे बाबतीत घडलेला एक किस्सा सांगतो. त्या विशिष्ट दिवशी मी कोरी वही घेवूनच प्रार्थनेला गेलो होतो कारण मुळात मी दैनंदिनी लिहिलेलीच नव्हती. मला वाटले आज आपला नंबर लागणार नाहीच. झालं उलटंच. मलाच उठवले. सर म्हणाले,... प्रकाश, वाचा तुमची डायरी. मी उभा झालो आणि सुरू झालो. एकही शब्द लिहिला नसतांना मी अगदी ईतरांप्रमाणे सरळ आणि न अडखळता ती काल्पनिक दैनंदिनी वाचून दाखवली. फक्त एका ठिकाणी अडखळयामुळे सरांना शंका आली व ते म्हणाले... आण तुझी वही..दाखव बरं काय लिहिले आहे ते. वहीवरचा कागद कोरा व वाचन मात्र न अडखळता. मला वाटले आज तर मार निश्चितच आहे पण झाले उलटेच. ते म्हणाले वहीत एक शब्दही नसून लिहिल्याप्रमाणे तू ती डायरी वाचली आहेस. कमाल आहे तुझी. कुळकर्णी सर म्हणाले... तू तुझ्या पुढील आयुष्यात नक्कीच लेखक होणार आहे. म्हणूनच की काय आज माझे नावे तीन मराठी व दहा इंग्रजी पुस्तके आहेत. असो. वि.स.खांडेकर त्यांच्या 'एका पानाची कहानी' या आत्मकथनेच्या प्रस्तावनेत म्हणतात की आत्मकथनेमध्ये अहंकार येवू नये याची

काळजी घ्यावी. पण ओघाओघाने मी तुम्हास माझ्या लेखन कार्याचा उल्लेख केला. त्याबद्दल क्षमस्व.

तिसरा संस्कार म्हणजे कोणत्याही विषयावर विदयार्थ्याला किमान दोन पाने लिहिता आले पाहिजे. आम्हाला निबंधाचे विषय 'मी पंतप्रधान झालो तर' किंवा गांधी, नेहरू असे विषय कधीच देत नव्हते. आम्हाला सर विषय दयायचे ते म्हणजे 'शाळेत साप निघतो'. आता या विषयावर त्या बालवयात काय बोडखं लिहिणार होतो. पण लिहावच लागे. दुसरा विषय 'पडक्या देवळाची आत्मकथा'. ईंग्रजी ग्रामर तर वाघमारे सरांनी एवढे घोटून घेतले होते की, ईंगजी वाक्याचे सर्व प्रकार आजही आम्हाला पाठ आहेत. त्यावेळी आम्ही ‘आंग्लभाषा परीचय भाग चार’ पर्यंत सर्व भाग अक्षरशः रटले आहेत. याशिवाय देवळे सरांनी आम्हाला संस्कृत शिकविले होते. मी भारतीय विदयाभवन मुंबईच्या तीन परीक्षा पास केल्या होत्या. त्या बहूतेक भारतीय विदयाभवन यांनी घेतलेल्या होत्या असे आठवते. आमची प्रत्येक वर्गाची परीक्षा आटोपली की, आमच्या गुणपत्रिका या दिपक चौधरी याचे अक्षर चांगले असल्यामुळे त्याचेकडूनच लिहून घेतल्या जात असे. माझ्याकडे सर्व गुणपत्रिका अजूनही मी जपून ठेवल्या आहेत. याचे मुख्य कारण त्या केवळ गुणपत्रीका नव्हतया तर त्यात ईतरही बाबींचा समावेश असायचा. जसे की, उंची,वजन, संगीत, खेळ यापैकी कशात मुलाला आवड आहे हे सुध्दा नमूद केलेले असायचे. माझे वजन मात्र सातव्या वर्गात असूनही केवळ 19 किलो होते असे माझे गुणपत्रिकेत नमूद आहे. सर्व सुभाषितं आजही पाठ आहेत. याशिवाय गीता पठण. बाबासाहेब पुरंदरे यांनी लिहिलेल्या शिव चरीत्राचे वाचन नियमीत सायंप्रार्थनेच्या वेळी श्री. श्यामसुंदर पंचारिया सर करायचे. रामरक्षा तर सर्वांनाच पाठ होती. हे सर्व विदयेबाबत मी तुम्हास कथन केले आहे. आता पुढील भागात कलेविषयी व खेळाविषयी रूचकर अशी माहिती सादर करणार आहे. तोपर्यंत भाग सहाची वाट पहा. कला आणि खेळ व्यतिरिक्त अफाट वाचन आम्ही त्या काळात कसे केले हे सुध्दा पुढील भागात येईलच.

धन्यवाद वाचकहो.

****

' Every child is an artist; the problem is staying an artist when you grow up.'- Pablo Picasso

पब्लिक स्कूलसारख्या आदर्श शाळेमध्ये प्रवेश तर मिळाला व विदयारंभाला सुरूवातही चांगली झाली होती. मला वाटले एवढयावर निभावेल, पण नाही. प्रत्येक मुलांमध्ये नेमकी कोणती कला आहे, हे आमचे शिक्षक शोधून पाहत होते. ज्याला जे येतं ते सादर करण्याचा आग्रह धरण्यात आला. मग ती साधी प्रार्थना असो व नक्कल असो की, नाटक असो, काहीना काही सादर करणे अनिवार्य होते.

माझी पाळी (Turn) आली तेंव्हा मी सातव्या वर्गात एक भा.रा.तांबे यांची कविता म्हटली होती. कवितेच्या ओळी होत्या ,'मधु मागशी माझ्या सख्या परी, मधु घटची रिकामे पडती घरी...' वगैरे..मी म्हटलेल्या कवितेबाबत मला फारशी माहिती नव्हती पण हे गाणे वजा कविता मला माझ्या आईने शिकविली होती. हे विशेषच कारण माझी आई ही केवळ चवथा वर्ग पास होती. या गाण्याचे वैशिष्टय असे की, मी अतिशय गोड आवाजामध्ये गायली असे सरांचे म्हणणे होते. लवकरच मला शाळेचा गायक म्हणून प्रसिध्दी मिळाली. मला बांसरी पण वाजविण्याचा उपजत गुणधर्म होता. तशी मला एक बाँसरी ‘सुदाम’ या स्वयंपाक घरात काम करणा-या एका गरीब नोकराने वाजवायला दिली होती असे आठवते. त्यावरच मी प्रॅक्टीस करायचो. माझे वडील भजनामध्ये हारमोनियम वाजवायचे त्यामुळे की काय मला हामोनियम पण ब-यापैकी वाजवता येत होती. आता तर उत्तम बांसरी व कॅसिओ मी वाजवतो पण केवळ स्वत:च्या मनोरंजनासाठी. गाणे ऐकले की, उपजत स्वरज्ञान असल्यामुळे मी ते वाजवू शकतो. वास्तविक मला शास्त्रीय शिकण्याची संधी मिळाली नाही. माझे काही बांसरी वादन यू टयुबवर मी अपलोड केले आहेत.

कला क्षेत्रात प्रगती सुरूच होती. यासोबत खेळाच्या बाबतीत सांगायचे तर मी सातव्या वर्गामध्ये हडकुळा असल्याने मला खो खो, कब्बडी व बेसबॉल ईतरांसारखे खेळता येत नव्हते. मग मी माझे प्राविण्य जिमन्यास्टीककडे वळवले. मी ईतका उत्तम जिमनॅस्ट होतो की, मला पायाऐवजी हातावर चालण्याची खूप प्रॅक्टीस होती. मुलं त्याला 'विंचूचाल' म्हणायचे व ते नेहमीच मला विंचूसारखे चालायला लावायचे. अशाच प्रकारच्या विंचूचालची संवय काही प्रमाणात दिलीप वानखडे याला पण होती. त्या खोडकरपणामुळेच मी त्यामध्ये प्राविण्य मिळविले. मी मल्लखांब, बांबू उडी, योगा ईत्यादीमध्ये एक्सपर्ट झालो. अष्टपैलू होण्याची संधी मला माझ्या या शाळेनेच दिली.

ईतर वेळामध्ये भरपूर वाचन अर्थात ही क्रिया सर्वच मुलं करायची. अभ्यासाचं सातत्य हे तर अजूनही सुरूच आहे. वाचनाच्या बाबतीत सांगायचे झाल्यास मी गो.नी. दांडेकर, ह.ना.आपटे, साने गुरूजी, प्रेमचंद, चोरून चोरून बाबुराव अर्नाळकर पण मी वाचायचो. खूप पुस्तके वाचण्याची संवय आम्हा सर्वांनाच शाळेपासून लागली. आज माझे जवळ बावीसशे पुस्तकांची स्वत:ची लायब्ररी आहे. व जवळपास पाचशेच्या वर माझे जवळ मासिके आहेत. या संग्रहाच्या आवडीबाबत मी पुढे ओघाओघाने सांगणार आहेच. विशेषत: डिजीटल संग्रहाबाबत.

या शाळेमध्ये आम्हा विदयार्थ्यांना काही संतांच्या भेटीही घडवून आणल्या आहेत. अभ्यास सोडून ईतरही बाबींचा समावेश आमच्या जीवनात येत होता त्यामुळे कंटाळा काय असतो हे मला आजही माहित नाही. माणसाने सर्वगुणसंपन्न असलं तर त्याला जीवनात कधीच कोणत्याच गोष्टीचा कंटाळा येत नसतो, हेच मला माझ्या आत्मकथनातून आवर्जून सांगायचे आहे. आमच्या शाळेचं ब्रीदवाक्य आहे, 'उध्दरावा स्वये आत्मा' . या ओळी गीतेतील आहेत. साने गुरूजींची खरा तो एकची धर्म, जगाला प्रेम अर्पावे हे आम्ही केवळ पाठांतर केले नव्हते तर ती गोष्ट अंमलात पण आणत होतो. आमचे बंधूप्रेम आजही तसेच आहे. रविंद्रनाथ टागोरांच्या कविताही आम्हाला पाठ करायला आमचे सर लावायचे. याशिवाय नाटकामध्ये सहभाग, आदर्श भोजन कसे करावे, शाळा व होस्टेलमधील शिस्त अत्यंत कडक होती. जेवणात कधीही उष्टे टाकता येत नव्हते. मग पात्रामध्ये कारल्याची कां भाजी असेना. ती आवडत नसली तरी मग ती तशीच तोंडात घेवून मी बेसिनजवळ जावून थुकायचो. अन्नाची कशाही प्रकारे नासाडी होवू नये हा हेतू कदाचीत सरांचा असेल. याबाबत मला एक गोष्ट वाचनात आली आहे की, जनार्दन स्वामी कधीही जेवणपात्रात उष्टे टाकीत नसत. ईतकेच नव्हे तर जेवण झाल्यावर म्हणे ते ताट पाणी टाकून ते पाणी पण पिवून घ्यायचे. हे सत्य आहे की, लेखकाची अतिशयोक्ति आहे याबाबत मी सांगू शकत नाही पण हे त्यांचे ग्रंथात नमूद आहे. अशा या आदर्श शाळेबाबत जेवढे सांगावे तेवढे कमीच.

कोणत्या संतांना आम्ही प्रत्यक्ष पाहले, त्यांचेशी आम्ही काय व कशी चर्चा केली. हे सर्व मी आपणास पुढील भागामध्ये थोडक्यात सांगणार आहे.

****

' Once you meet to spiritual person, your life changes automatically.'- Prakash Raut

मी ज्या शाळेत शिकलो त्या शाळेत मला काही संतांच्या भेटी आमच्या शिक्षकांकडून घडल्या होत्या. अर्थात हे श्रेय मी माझ्या पब्लिक स्कूलला मनापासून देतो. 1968 ला मी आठव्या वर्गात नुकताच गेलो होतो. बुलढाणा जिल्यातील संत श्री. पांचलेगावकर महाराज त्यावेळी आमच्या शाळेत आले होते. त्यांची ख्याती अशी होती की, ते जिवंत साप हाताळायचे मग तो कितीही विषारी साप असो.

एकदा ते आमच्या शाळेत आले. त्यांची भेट आमच्या शाळेतील विदयार्थ्यांना व्हावी हा एकमेव, आमच्या शाळेतील शिक्षकांचा हेतू होता. ते सायंकाळच्या प्रार्थनेच्या वेळी आले. त्यावेळी एक वेगळाच किस्सा घडला. जेंव्हा त्यांनी म्हटले की......'मला कोणताही धार्मिक प्रश्न विचारा'. त्यावेळी आम्ही तर विचारले नाहीतच पण आमच्या शाळेतील एका मोहोड सरांनी बरीच प्रश्ने संयमानी विचारले. त्यांचा धार्मिक अभ्यास खूप होता. प्रश्न आणि उत्तरांची जुगलबंदी एवढी भयानक होती की, शेवटी संत श्री. पांचलेगावकर महाराज हरण्याच्या बेतात दिसत होते तेंव्हा ते ईतके भयानक चिडले की, त्यांचा मनावरील ताबा गेला. ते चिडून म्हणाले, 'मला अशी सिध्दी प्राप्त आहे की, मी कोणताही विषारी साप तुम्हास आता पकडून दाखवतो'. मोहोड सर अतिशय शांत स्वभावाचे होते ते शांतपणे म्हणाले की, साप पकडणे हे काही सिध्दीचे लक्षण नव्हे ती एक सावधगिरीची कला आहे. ते या वाक्याने आमच्या शाळेतून लवकरच उठून पळाले. या प्रसंगाने आम्हाला श्रध्दा आणि अंधश्रध्दा यातला फरक मोहोड सरांनी शिकविला.

यानंतर मात्र आमची गाठ राष्ट्रसंत श्री. तुकडोजी महाराजांशी झाली. हा संत देशभर प्रसिध्द होता. ते अजानुबाहू होते असेही एकीवात होते. ते आमच्या शाळेत आले तेंव्हा एवढे निरीक्षण तर आम्ही करू शकलो नाही की, ते खरंच अजानुबाहू आहेत. अजानुबाहू म्हणजे ज्यांचे हात गुढग्यार्पंत लांब असतात. भगवान कृष्ण अजानुबाहू होते असे माझे ऐकीवात आहे. तुकडोजी महाराज आमच्या शाळेत सायंकाळच्या प्रार्थनेच्या वेळी आले होते. त्यांची भव्य उंची, तेजस्वी स्वरूप, अजानुबाहू व्यक्तिमत्व, त्यांची प्रार्थना शैली, त्यांची गीते, भजने एवढी प्रभावी होती की, त्यात अंधश्रध्देचा लवलेशही नव्हता. त्यांच्या भेटीनंतर आम्ही व आमचे जीवनच बदलले. काय व्यक्तिमत्व होतं ते व काय आमचे भाग्य की आम्ही त्यांना प्रत्यक्ष डोळयाने पाहले. 'या भारतात बंधुभाव नित्य वसू दे', दे वर ची असा दे', 'मंदिरात नाही दिसला सावळा मुरारी', मनी नाही भाव म्हणे देवा मला पाव देव अशानं भेटायचा नाही रे देव बाजारचा भाजीपाला नाही रे', है प्रार्थना गुरूदेवसे,यह स्वर्गसम संसार हो अती उच्चतम जीवन बने

परमार्थमय संसार हो' अशा अनेक प्रभावी गीतांनी आमची मने अगदी ईश्वर प्रेमाने भारली होती. त्यांची 'ग्रामगीता' तर एक अत्यंत प्रभावी गीता आहे. आजही शासनाने त्या ग्रंथाची प्रत अगदी दहा रूपये किंमतीत ठेवली असूनही बरेच लोकांनी ती वाचलेली आढळत नाही. आम्हाला त्यांचे दर्शन म्हणजे प्रत्यक्ष ईश्वर दर्शनासारखेच वाटले. आमच्या शाळेत संस्कृतमध्ये रामरक्षा, महाराजांची सामुदायिक प्रार्थना, शिवचरीत्र वाचन, दैनंदिनी लिखाण हे सर्व अनिवार्यच होते. आज आमची जी काही जीवनात प्रगती झाली असेल ती केवळ या शाळेमुळेच. सदैव प्रेरणा देणा-या या कथा कितीही सांगितल्या तरी त्या थोडयाच.

दोन संतांच्या भेटीनंतर मात्र अत्यंत दु:खाची वार्ता आमच्या कानी पडली आणि ती म्हणजे राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे 1969-70 च्या दरम्यान झालेले निधन. आमच्या शाळेला त्यांनी दिलेली भेट हीच अखेरची भेट ठरली होती. पुढील जीवनात मला एकदा संत विनोबा भावे यांनाही पहायला मिळाले ते पुढे ओघाओघाने माझ्या जीवन कथनात येईलच. शाळेतून निघाल्यानंतर आम्हा पब्लिक स्कूल विदयार्थ्यांचे काय झाले व प्रत्यक्ष माझ्या या जीवनात काय घडत गेले, हे पुढील भागामध्ये मी सादर करेन.

****

4.महाविदयालयीन जीवन

'Life is the most difficult exam. Many people fail because they try to copy others- not realising that everyone has a different question paper'.- Quotemaster.org

मागच्या भागात संताचा सहवास मला कसा घडला व मला त्याचा काय लाभ झाला हे सांगितले आहे. वर्ग नववीमध्ये मी गेलो. संत दर्शनाने माझे जीवन नदीप्रवाहासारखे शुध्द होत चालले होते. नऊ दहा अकराची एकत्र परीक्षा म्हणजे बोर्डाची हायर मॅट्रिकची परीक्षा. परीक्षेसाठी खूप अभ्यास केला नाही. मी एक साधारण विदयार्थी होतो. आठवीपर्यंत इतिहास, भूगोल, नागरीक शास्त्र हे सर्व मराठीत असून सुध्दा मला या विषयामध्ये फारच कंटाळा येत असे. मी मग विज्ञान शाखेमध्ये रूची वाढवत होतो.

अकरावीच्या बोर्ड परीक्षेमध्ये मला फारसे यश मिळाले नाही. मी व्दितीय श्रेणीत पास झालो हे माझे पहिले अपयश. मी अपयश हा शब्द यासाठी वापरला की, आमच्या शाळेतील जे विदयार्थी प्रथम श्रेणीत पास होणार होते त्यांना थेट इन्स्टीटयूट ऑफ सायन्स, नागपूर येथे शासनाच्या नियमानुसार बी.एस.सी. पार्ट वनला प्रवेश मिळणार होता. तो मला माझ्या व्दितीय श्रेणीमुळे मिळू शकला नाही.

त्या काळात हायर मॅट्रीक करणा-या मुलांना प्री युनिव्हरसिटी न करता डायरेक्ट बी.एस.सी. पार्ट वनला प्रवेश मिळत होता. नागपूरचे कॉलेज न मिळाल्यामुळे माझे बाबा नाराज झाले होते. त्यांना असे वाटत होते की, मी बी.एस.सी. व्हावे व हायस्कुलवर शिक्षकाची नोकरी करावी. शिक्षक होणे हा फार मोठा फंडा त्या काळात होता. माझे वडील वणी तालुक्यात होते. वणीला सायन्स कॉलेज नव्हते.

मी जानकीदेवी बजाज विज्ञान महाविदयालयात बी.एस.सी. प्रथम वर्षाला प्रवेश घेतला. मराठी माध्यमातून एकदम ईंग्रजी महाविदयालयात जाणे व ते ही थेट प्रथम वर्षाला. जरा कठीणच जाईन असे मला वाटत होते. मी खूप अभ्यास करण्याचा प्रयत्न केला. मी खरोखरच अभ्यास करतो की नाही हे तपासण्यासाठी एकदा माझे वडील जे. बी. सायन्स कॉलेजच्या होस्टेलमध्ये रात्री बारा वाजता काझीपेठ वर्धा या पॅसेंजरने होस्टेलमध्ये आले होते तेंव्हा मी त्यांना अभ्यास करतांना आढळलो. ते फार खूष झाले. मी गरीबीत असून सुध्दा अभ्यास करतच होतो. माझा ड्रेस म्हणजे पांढरा चक्क पैजामा व ओपन शर्ट. बाकी सर्व शहरातील मुले फुलपँट घालून यायचे. कालांतराने वडिलांनी मला एक टेरीलीनचा फुलपँट शिवून दिला होता पण तो जुन्या पध्दतीचा शिवला होता. त्याच्या पायाच्या खाली साहेबी पँटप्रमाणे फोल्ड मारली होती. बाकीच्या मुलांचे पँट नॅरो व नवीन फॅशनच होते. त्यामुळे मला वर्गातील मुले खूपच हसत होती. माझ्या गरीबीचा हा उपहास मला सहन होत नव्हता पण काहीही असो माझ्याशी एक लिना वेले नावाची मुलगी नेहमी बोलायची. ती माझ्यापेक्षा उंचीने मोठी होती हा भाग निराळा आहे. ती एकदा मला होस्टेलवर वही मागायला आली होती. तिने जेंव्हा माझी वही परत केली तेंव्हा सर्व होस्टेलच्या पोटयांनी ती ईतकी बारकाईने पाहली की, जणूकाही त्यात काही संदेशच लिहिला आहे. अर्थात हा पोरकटपणामध्ये मला ईंटरेस्ट नव्हता. माझी राहणी अतिशय साधी होती. मी पँटचा नाद सोडला व पैजाम्यावरच एवढे प्रेम केले की, तोतलाडोह प्रकल्पावर अभियंता म्हणून जॉईन होतांना सुध्दा पैजाम्यावरच कामावर रूजू झालो होतो. तेंव्हाही माझी थोडीफार चेष्टा झालीच होती.

मराठी माध्यमातून सरळ ईंग्रजी माध्यमात अभ्यास करणे मला जमले नाही व अपयशाचा दुसरा धक्का मला बी.एस. सी. वनने दिला. मी अनुतीर्ण झालो. चक्क नापासच म्हणाना. मराठी ज्ञानगंगेच्या नदीतून ईंग्रजी ज्ञानसागरात मी तरळू शकलो नाही. सलग दुसरा दु:खाचा आघात. माझ्या वडीलांनी वृत्तपत्रातुन माझ्या अपयशाची वार्ता निकालातच पाहली. माझा रोलनंबर 2542 हा त्यांना वारंवार वृध्द चष्यातून पाहून सुध्दा दिसू शकला नाही. ते म्हणाले, 'पोरा खूप अभ्यास केला हे सत्य असले तरी तुला अपयश मिळाले हे त्याहूनही खरे सत्य(Fact) आहे.' ते शांत चित्ताने परत म्हणाले की, "अपयश हीच पुढील यशाची पहिली पायरी आहे". असं करं तुझी मार्कशीट घेवून ये. किती दिवे पेटले व किती विझले ते तरी मला एकदा पाहू दे. सावरकर म्हणतात त्याप्रमाणे कोणतेही व्रत मग ते अभ्यासाचे असो की कोणतेही असो त्यात अंधता नसावी. ते म्हणतात ना... "की घेतले न व्रत हे आम्ही अंधतेने". त्याप्रमाणे तू आता पुढील अभ्यासाचे व्रत मोठया जोमाने स्विकार. माझा उत्साह व्दिगुणीत झाला. माझे बाबा न रागावल्यामुळे मी वर्धेला माझे बी.एस.सी. प्रथम वर्षाचे गुणपत्रक आणायला गेलो.

गुणपत्रक मी प्रथम स्वत: पाहले व नंतर ते मला वडीलांना दाखवायची हिंमतच झाली नाही कारण माझे चक्क दोन विषय राहले होते. एक भौतिक शास्त्र व दुसरे गणित. गणिताचे तीन पेपर्स होते. पन्नास पन्नास मार्काचे तीन. दिडशे पैकी मला तीनही मिळून किमान त्रेपन्न मार्काची आवश्यकता होती तर तो माझा विषय निघाला असता. गणितात दिडशेपैकी फक्त त्रेचाळीचस गुण होते. अपयश ज्याचे व्दारी त्याचे कोण जीवन उध्दारी, असे मला वाटले. बाबांनी माझे गुणपत्रक हिसकावले व चेक केले. त्यांना जे आढळून आले ते काही निराळेच होते. ते म्हणाले, 'बाबा तुला गणिताच्या तिस-या पेपरमध्ये फक्त शून्य एक मार्क मिळाला आहे. हे माझे तिसरे अपयश. पण ते माझ्यावर अजिबातच रागावले नाही. ते म्हणाले, 'जो माणूस पन्नास पैकी एक मार्क मिळवू शकतो याचा अर्थ त्यात किमान एक मार्क मिळविण्याची क्षमता आहे. हीच क्षमता जर त्याने अभ्यासाचे व्रत घेवून उपयोगात आणली तर तो पैकीच्या पैकी तर नाही पण ऐंशी टक्कयापर्यंत यश मिळवू शकतो याची मला केवळ खात्रीच नाही तर तुझ्यावर विश्वास आहे. हे एकूण हा टोमणा की, उत्साहवर्धक उपदेश हेच मला क्षणभर कळले नाही.

मी बोललो.... 'मला हाच वर्ग डबल करू दया. म्हणजे पुन्हा शिकू दया. ते म्हणाले, 'आऽरे, दुस-यांदा शिकण्यासाठी दर महिण्याला पंचेवीस रूपये फी कॉलेजला दयावी लागेल आणि तूला तर माहित आहे की, आता मी सेवानिवृत्त झालो आहे. एवढी फी, मी तुझी भरू शकत नाही. तू सरळ पुरवणी परीक्षा दे.

मला 1973 ला पुरवणी परीक्षेत सुध्दा यश मिळाले नाही कारण माझी ओळख हिंगणाघाटला एका 'मंगला' नावाच्या मुलीसोबत झाली होती. मंगलाचे प्रेम व सायन्सचा अभ्यास हा ताळमेळ बसणारच नव्हता याची मला पूर्ण खात्री होती. पुढील भागामध्ये याही अपयशाची थोडीशी कहाणी व मंगलाचा किंचित सहवास जीवनाला काय कलाटणी देतो ते आवर्जून वाचण्यासाठी भाग 9 ची वाट पहावी ही विनंती. थोडा रोमांस जीवनकथेत असला तरच वाचकांनाही मजा येईल याकरीता मी पुढील भाग घेवून येतोच आहे.

****

5.अपयश आणि यशमय जीवन

'Love is an untamed force. When we try to control it, it destroys us'.- Paulo Coelho

पहिलं अपयश हायर मॅट्रिकला फक्त व्दितीय श्रेणी. दुसरं अपयश बीएससी वन नापास आणि आता तिसरं अपयश मुलीच्या प्रेमात पडणे. बघू या पुढे काय होतं ते. माझे वडील 1973 ला सेवानिवृत्त झाले आणि आम्ही कुटुंबासहित हिंगणघाट येथे रहायला आलो. केवळ दोन हजार रूपयामध्ये एक लहानसे कौलाचे घर बाबांनी विकत घेतले होते. घर ही असे विचित्र होते की, ते वेणा नदीच्या काठापासून केवळ दोनशे मीटरवर होते. नदीला जर मोठा पूर आला तर आमच्या घराच्या पायथ्याशी नदीच्या पुराचे पाणी यायचे. नेमके तेच झाले. 1973-74 च्या दरम्यान वेणा नदीला महापूर आला. पाणी आमच्या घरातच शिरायचे राहले होते. हे तर काहीच नाही दुसरी महत्वाची गोष्ट अशी की, माझ्या घरापासून स्मशानघाट सुध्दा केवळ 300 मीटरवर होते. हिंगणघाट परीसरात 15 किलोमीटरच्या आंत हे एकमेव असे स्मशानघाट होते. मला प्रथम घराजवळून मुर्दे गेले की खूप भिती वाटायची. नंतर दररोज अंत्ययात्रा पहायची संवयच लागली होती. पण रात्री बारा वाजल्यानंतर एखादा मुर्दा आला की, तो पहावा की नाही या संभ्रमात पहालाच जायचा. कारण नाही पाहला तर भिती अधिकच असायची.

1973-74 हे वर्ष, बीएससी पार्ट वन मध्ये राहलेल्या विषयाची परीक्षा देण्यासाठी माझे जवळ राखीव होते. माझा अभ्यास त्या बिना फॅनच्या कौलारू घरात सुरू होता. अभ्यास मी करण्याचे व्रतच घेतले होते. यावेळी मला नक्कीच यश मिळेल अशी खात्री होती. त्यादृष्टीने अभ्यासपण सुरू होता. ईतक्यात या अभ्यासात एक विघ्न आले. हेच ते प्रेमळ विघ्न.

वर्ध्यावरून एक मंगला नावाची मुलगी हिंगणघाटला माझ्या घराच्या पुढच्या घरी पाहूणपणासाठी आली होती. ती अचानक माझ्या घरी दूध मागायला आली. माझ्या वडीलांनी घरगुती दुधाच्या व्यवस्थेसाठी एक बकरी पाळली होती. दुधाचा व्यवसाय हा हेतू नव्हता पण किरकोळ कोणी मागितले तर आम्ही बकरीचे दूध अल्प पैशात मदत म्हणून देत होतो.

मंगला आली दाराजवळ आणि माझ्याकडे एकटक पाहत उभी होती. ती नेमकं काय पहात आहे, हे क्षणभर मलाही कळले नाही. वय तीचे सोळा व माझे वय एकोणीस होते. ती दिसायला गोरी आणि सुंदर होती. ती म्हणाली, 'प्रकाश तू खरंच दिसायला फार छान आहेस. काय करतो आहेस.'

'मी सप्लीमेंटरीचा अभ्यास करीत आहे'.

ती हळूच गालातल्या गालात हसली व निघून गेली. पुन्हा तीन वाजता ती किती वाजले हे विचारण्यासाठी आमच्या घरी आली. व मी उत्तर दिल्यानंतर, 'थँक्यू' म्हणून निघून गेली. बस एवढंच घडलं. माझी त्या दिवसापासून अभ्यासाची गती दुरावली. अभ्यासात माझे मन लागत नव्हते. हा माझ्या जीवनातला प्रेमाचा दुसरा अनुभव. प्रथम मी लहान असतांना सहाव्या वर्गातील एक सुनंदा नावाची मुलगी माझ्या जीवनात बालमैत्रिण म्हणून आली होती. मी मात्र पब्लिक स्कूलमध्ये चिखलद-याला गेल्यामुळे आमचे बालपणीच्या प्रेमात मोठा खंड पडत गेला व नंतर आम्ही वणी शहर सोडल्यामुळे तेथेच नष्ट झाले. हा दुसरा प्रेमाचा प्रसंग माझ्या जीवनात परत एकदा नासाडी करण्यासाठी आला होता. प्रेम काही सिरीयस नव्हते. 'तारूण्यात होणा-या प्रेमाला प्रेमाची परीभाषा कळत नसून ते केवळ एक शारिरीक आकर्षण असते' हे दोघानांही समजत होते. पण अभ्यासात व्यत्यय आणण्याईतके हे प्रेम प्रभावी होतेच. दोन दिवसाच्या प्रेमात माझ्या जीवनात सर्वप्रथमच मला एका मुलीकडून चिठ्ठी मिळाली. त्या काळात फोन नव्हते. मुलींशी बोलणे हे महापाप समजले जायचे. केवळ हसण्यापर्यंतच मजल असायची. मुलींच्या भावना काय असतात हे मला माहित नव्हतेच. मी ती चिठ्ठी चोरून चोरून दोन तीनदा नाहीतर बरेच दिवस वाचत होतो. तो एकच कागद वारंवार माझ्या जीवनातला पहिला आणि शेवटचा

होता. आता परीणाम तुम्हाला सांगायलाच हवे काय. माझा एकही विषय दोनदा परीक्षा देवूनही निघाला नाही. असे माझे 1972 नंतर 73-74 हे वर्ष वाया गेले. आता मात्र कहरच झाला होता.पण असे काय होते त्या चिठठीत होते की, माझे जीवन स्थगीत झाले, हे मी तुम्हाला सांगणारच आहे कारण अशी उत्सुकता सर्वांनाच असते. तर मी पुढच्या भागामध्ये मंगलाने मला लिहिलेल्या चिठ्ठीमध्ये काय होते ते सविस्तर सांगेन. माझ्या पुढील प्रेमाच्या भागासाठी जरूर वाट पहा व माझी ही आत्मकथनाची सिरीज जरूर वाचत चला. बरे वाईट कॉमेंट्स पण लिहीत चला. तर मित्रांनो भेटू या नंतर तोपर्यंत सर्व वाचकांचे आभार मानून हे लिखाण संपुष्टात आणतो. एक बाब लक्षात ठेवा की सर्वच प्रेमाने माणसाचे नुकसान होतेच, असे काहीही नाही. कदाचीत माझ्या जीवनाची ही चांगली सुरूवातही होवू शकते. शिक्षक होण्यापेक्षा मी जीवनात हळूहळू अभियंता कसा होत गेलो हे सुध्दा तुम्हाला लवकरच कळणार आहे. करीता पुढील भाग जरूर वाचा.

****

'Love is an untamed force.

मंगलाची भेट ही काही जीवन गाठ नव्हती. ते एक क्षणिक असे प्रेम होते. ते केवळ शारिरीक आकर्षण असावे. त्या शारिरीक आकर्षणापोटी तिने मला एक चिठ्ठी लिहिली होती. या काळामध्ये मी हिंगणघाटलाच वास्तव्यासाठी होतो. अभ्यासा व्यतिरीक्त मला दुसरे तिसरे कोणतेही काम नव्हते. बराच वेळ रिकामा मिळत होता. तो वेळ मी अतिरीक्त वाचनामध्ये घालवित होतो

हिंगणघाटचे नगर वाचनालय माझ्या घरापासून बरेच लांब होते. तरी मी पैदल तेथे वाचण्यासाठी जात होतो. मंगलाच्या प्रेमामुळे मी हिंदी कादंब-या वाचायला लागलो. शहरामध्ये एका मुसलमान पोराची टपरी होती. तो मला पंचेवीस पैसे प्रतिदिन याप्रमाणे एक कादंबरी एका दिवसासाठी दयायचा. ती कादंबरी एकाच दिवसात वाचून झाली पाहिजे यासाठी वाचन अखंड करीत होतो. काही पुस्तके तिच्यासाठी सुध्दा आणायचो पण तिला त्यात फारसा रस वाटत नव्हता. शेवटी ती चार दिवसाची पाहूणीच. दुपारची वेळ होती. तिने लिहिलेली चिठ्ठी माझ्या हातात पडली. त्यात लिहिले होते.

प्रिय प्रकाश, मी येथे येवून फक्त दोन दिवस झाले. तूला पाहले आणि मला तुझ्याबद्दल प्रेम निर्माण झाले आहे. तू फार सुंदर आहेस. मला घराबाहेर निघायची परवानगी नाही म्हणून मी

माझ्या भावना कागदावर व्यक्त करीत आहे. तू यानंतर कोठे जाशील याची मला कल्पना नाही. पण तू जेथे कोठे जाशील तेथे मी तूला पत्राव्दारे भेटत जाईन. आपली प्रत्यक्ष भेट आता यापुढे शक्यच होणार नाही कारण मी लवकरच वर्धेला जाणार आहे. तू आज संध्याकाळी माझ्याशी थोडावेळ तरी बोल म्हणजे मला बरे वाटेल. .....वगैरे...वगैरे... तुझीच मैत्रीण मंगला.

हा कागद लहान असला तरी माझ्याही भावनांना त्या काळात हृदयाला हेलकावे देवून गेला. अशा कृत्यामुळे मला अपयश आल्याचे मी मागील भागामध्ये स्पष्ट केले आहे. ही प्रेमाची बाब मात्र कोणासही माहित नव्हती.

या काळात मी हिंदी पुस्तकांचे भरपूर वाचन केले. गुलशन नंदा, रानू, सुरेंद्र मोहन पाठक, प्रेमचंद, ओमप्रकाश शर्मा, या सर्व लेखकांची जवळजवळ पूर्ण पुस्तके मी वाचून काढली. आठवणीतली पुस्तके म्हणून मी ‘रानू’ यांच्या ‘पूजा’ कादंबरीचा उल्लेख करेल कारण त्यात नर्स विषयी ज्या सामान्यांच्या भावना असतात त्या पूर्णपणा बदलून जातात. दुसरे 'गुलशन नंदा' यांचे 'घाट का पत्थर' ज्यावर 'खिलौना' हा हिंदी चित्रपट निघाला होता. 'प्रेमचंद' यांच्या तर कादंब-या त्या काळात समजायला जरी भाषेमुळे कठीण वाटत होत्या तरी, त्यांच्या कथेतील मर्म मात्र काही निराळेच होते. "गहरे पानी पैठनेसेही मोती मिलते है".. अशी वाक्ये आजही मला आठवतात. जवळ जवळ पन्नासेक पुस्तके मी एकाच वर्षात वाचली होती. कदाचीत त्यामुळेही मी सप्लीमेंटरी परीक्षेत पास होवू शकलो नसेल.

जीवन काय असतं त्याची कल्पना मला नव्हती. ही गोष्ट बाबांच्या आवर्जून लक्षात आली व त्यांनी त्यांचा संयम सोडला. ते म्हणाले...'तू आताच्या आता घराबाहेर जा'... व पुढे काय शिक्षण घ्यायचे ते तूच ठरवायचे आहे. बीएससी तूला जमतच नाही हे जवळजवळ निश्चित झाले आहे. पैसे मी तूला पुरेसे देतो कारण तुझ्या नावावर पोष्टाचे खाते आहेच. त्यांनी मला मी चिखलद-याला रहात असल्यामुळे लहानपणापासूनच पोष्टाचे सेव्हींग पासबुक कसे हाताळावे हे शिकविले होते.

माझ्या पासबुकामध्ये त्यांनी त्या काळात चारशे रूपये एवढी भव्य रक्कम देवून हाकलल्याप्रमाणे केले. मी बसने नागपूर गाठले. मला लहानपणापासूनच बसचा प्रवास कोठेही करण्याची संवय होतीच. तेथे माझे चुलत काका रहात होते. ते सुध्दा घरातून पळून गेले होते. त्यांचेच मार्गदर्शन मला लाभदायक ठरेल, ही माझी भावना होती. त्यावेळी ते सदर, नागपूर येथे राहात होते. त्यांचा पत्ता शोधला. ते शासकीय दूध डेअरीमध्ये ड्रायव्हर असल्याचे कळले. त्यांचे

घर पण मिळाले. त्यांना आश्चर्य वाटले की, मी एकटाच कसा काय त्यांचे कडे आलो. मी बोललो, 'मला घरातून हाकलून दिले आहे. पण माझ्याकडे पुरेसे पैसे आहेत व मला त्यात माझे जीवन घालवायचे आहे'. ते म्हणाले काही हरकत नाही. 'मी सुध्दा तुझ्यासारखाच होतो पण आज मी दूध ड्रायव्हर युनियनचा अध्यक्ष आहे'. तू बीएससी नापास आहे तेंव्हा आपण येथील पॉलिटेक्निकमध्ये प्रवेश मिळतो काय ते बघू. आम्ही दोघे जवळच सदर नागपूर परीसरातील शासकीय तंत्र निकेतनात गेलो. त्यांचे ओळखीचे प्राचार्य निघाले. मला वाटले माझा प्रवेश निश्चित आहे. पण मला नागपूरलाही प्रवेश मिळाला नाही कारण तेथील सर्व जागा आधीच भरल्या होत्या. मात्र त्यांनी एक फार चांगले मार्गदर्शन केले की, आज चोवीस जून ही तारीख आहे. ही या तंत्रनिकेतनात ॲडमिशन घेण्याची शेवटची तारीख आहे, तेंव्हा वेळ न गमावता तुम्ही याला यवतमाळच्या शासकीय तंत्र निकेतनात पाठवा, असे ते माझ्या काकांना म्हणाले. तेथे शासकीय तंत्र निकेतन असल्याची फारशी लोकांना कल्पना नाही. तेथे याला प्रवेश मिळू शकतो. आणि जर नाहीच मिळाला तर तेथेच बाजूला शासकीय औदयोगिक प्रशिक्षण केंद्र (ITI) आहे. तेथे कोणत्याही ट्रेडमध्ये प्रवेश

मिळून जाईन.

मी आयटीआयचा इलेक्ट्रीसियन हा कोर्स करण्याचे मनाशी ठरविले. लगेच मी वेळ कमी असल्यामुळे त्याच दिवशी यवतमाळ गाठले. भूक खूप लागली होती. पण जेवत बसलो असतो तर हा सुध्दा प्रवेश जाईन असे मला वाटले. यवतमाळ येथे तंत्रनिकेतन कोठे आहे याची चौकशी केली. लोकं म्हणाले, 'ते कॉलेज या बसस्थानकापासून चार किलोमीटर दूर आहे'. पैसे फारसे खर्च होवू नये म्हणून मी न जेवता पायी पायीच एक तासात आयटीआय कॉलेज गाठले. तेथे पोटात कावळे खूप ओरडत होते म्हणून फक्त दोन प्लेट भजे खाल्ले.

आयटीआयच्या प्रवेश व्दाराजवळ एक शिपाई तंबाखू चोळत होता. त्याला मी भेटलो. त्यांनी माझे सर्व सर्टिफिकेट्स पाहले. व माझे जीवनच बदलून टाकले. तो बोलला, 'पोरा तू ,बीएससी पार्ट वन आहेस आणि आयटीआय कशाला करतो. चल ती तूला शासकीय तंत्र निकेतनात प्रवेशाची प्रक्रीया सांगतो. हा शिपाई म्हणजे मला भेटलेला देवच होय. एका असहाय्य मुलाला मदत करणारा तो शिपाई देव नव्हे तर अजून कोण असणार. आम्ही दोघे त्याने मला चहा पाजल्यानंतर बाजूलाच असलेल्या शासकीय तंत्र निकेतनात नेले. 1974 लाच या कॉलेजमध्ये ॲडमिशन घेण्यासाठी 1200 अर्ज आले होते. शासकीय जागा फक्त 120

होत्या. तेथे दुसरा देव मला भेटला आणि तो म्हणजे श्री. किटे नावाची व्यक्ति. ही व्यक्ति पॉलीटेक्निकच्या वर्कशॉपमध्ये अटेंडन्ट होती.

त्यानेही माझी सर्व कागदपत्रे पाहली त्यावर त्याला, माझे पूर्ण नांव 'प्रकाश माणिकराव राऊत' असे दिसले. माणिकराव हे तुझे वडील शिक्षक आहेत काय ते सध्या कोठे आहेत. कारण त्यांनीच मला सातवी पासचे प्रमाणपत्र दिल्यामुळे मी या तंत्र निकेतनात वर्कशॉप अटेंडट म्हणून लागलो आहे. सविस्तर चर्चेनंतर माझ्या वडीलांचा गावाचा परीचय दिल्यावर त्यास हे निश्चित झाले की, मी राऊत गुरूजींचाच पोरगा आहे. त्याचेवर उपकार करणारे गुरूजी दुसरे तिसरे कोणी नसून माझे वडीलच होते हा योगायोग म्हणा परमेश्वराने केलेली मदत म्हणा. उपकाराची परत फेड म्हणून श्री. किटे यांनी मला खूप मदत केली. आता प्रवेश मिळणे हे वेटींगवर होते. मी परत हिंगणघाटला गेलो. मला पाहून वडीलांचा चेहरा लाल बुंद झाला होता. ते म्हणाले, 'घराबाहेर जावून कशाला परत आला आहे'. मी बोललो.... बाबा, 'मी शासकीय तंत्र निकेतनात प्रवेश अर्ज टाकला आहे. ते म्हणाले, आऽरे, 'ज्याला सायन्स जमत नाही त्याला अभियांत्रीकी अभ्यास जमणे म्हणजे 'आगीतून धूपात जावून जळणे' होय. एकंदरीत तूला धूपात जळण्याची ईच्छा दिसते.

पंधरा दिवसानंतर माझा नंबर पॉलिटेक्निकमध्ये लागला. मी ओव्हरसियर होणार किंवा स्थापत्य अभियंता होणार याचा मला मनोमन आनंद झाला. दोन गरीब व्यक्तिंनी मला देवांनी मदत करावी असा माझ्या साठी रस्ता तर मोकळा करून दिला. पण या गरीबीत पुढे काय होते ते पुढील भागात मी कथन करेन. आगीतून धूपात जाणारा मी पामर टिकतो की काय अशी शाश्वती मलाही नव्हती पण 'प्रयंत्नांती परमेश्वर' हे ब्रीदवाक्य माझ्या बाबतीत खरे ठरते की खोटे. अजूनही यश येईल की, मंगलाच्या प्रेमामुळे अपयश येईल हे ठरण्याअगोदरच माझ्या वडीलांनी मात्र मला ताकीद दिली की, मला दोन वर्ष तुझे गुणपत्रक दाखवायचे नाही. उर्वरीत आयुष्य तुला मी दिलेल्या पैशात घालवायचे आहे. मग तू रिक्शा चालव की, अजून काही कर. पण पैसा नसल्यास घरी येण्याचा प्रयत्न करायचा नाही. असे त्यावेळचे बाबा होते आणि आजकाल मुलांचे किती लाड पूरवल्या जातात, हे तूम्ही पाहताच.

'Fall seven times and stand up eight'.- Japanese Proverb

माझ्या जीवनात सलग चार वेळा अपयश येवून सुध्दा मी मनाने खचलो नाही. तंत्रनिकेतनासाठी उपाशी राहूनही अतोनात प्रयत्न केले. शेवटी मला यशाचा मार्ग सापडला.

माझी प्रवेश निवड शासनाने निश्चित केली होती. तसे लेखी पत्र मला पोष्टाने प्राप्त झाले होते. पुढील मार्ग अगदी स्पष्ट दिसत होता तरी सुध्दा मला मंगलाच्या प्रेमाने अडथळा निर्माण होईन असे वारंवार वाटायचे. जी गोष्ट दूर असते तिचेच आकर्षण माणसाला जास्त सतावत असते. ती वर्धेला निघून गेली होती. पाहूणपणासाठी आलेली व्यक्ति किती दिवस हिंगणघाटला राहाणार होती.

पण माझ्या जीवनाला हेलकावे देवून गेली. तिची आठवण सतत यायची. ईकडे तंत्रनिकेतनच्या अभ्यासाचे कडक व्रत स्विकारायचे ठरविले. बाबा आधीच नाराज होते ते माझे गुणपत्रक सलग दोन वर्ष पाहणार नाही, असा त्यांचा पण होता. अशा परिस्थितीत मला अभ्यासासाठी कॉलेजच्या होस्टेलवर जावे लागले. एक लहानशी कापसाची गादी एसटीवर टाकून मी यवतमाळला पोहोचलो. प्रथम सेमिस्टर सुरू झाले होते. होस्टेलमधील जीवन एवढे खडतर होते की, धड खायला मिळत नव्हते. यवतमाळला गावात जावून खावे तर आनंदाश्रममध्ये एवढे भंगार जेवण मिळत होते की, अक्षरश: मला कडू पोळया खाव्या लागत होत्या. मला जबरदस्तीने अभ्यासात मन लावावे लागत होते. तशाही परिस्थितीत अभ्यास मात्र चालूच होता.

वर्गातील सर अत्यंत कडक होते. वर्ग सुरू होत असतांना विदयार्थ्यांशी परीचय करून घेण्याची पध्दत असते. पण तंत्रनिकेतनात डायरेक्ट शिकवायलाच सुरूवात झाली होती. टेस्ट परीक्षेत गुण देण्याची पध्दत तर अशी होती की, Communication Skill चे सर वीस पैकी साडेबारा मार्क्स देत असत. त्यांनी आम्हा सर्व विदयार्थ्यांना ताकीद दिली होती की, हे महाराष्ट्र शासनाचे तंत्रनिकेतन आहे. महाराष्ट्रात केवळ पंधरा पॉलिटेक्निक त्यावेळी होते. ते म्हणाले,' या तंत्रनिकेतनात जरी तुम्हाला आता एकशे वीस विदयार्थी दिसत असले तरी सहा सेमिस्टर झाल्यानंतर केवळ सहा मुले स्थापत्य अभियंता होतील याची जाणीव ठेवून अभ्यास करा. कारण आमचा प्राध्यापकांचा असा अनुभव आहे की, बहुतांश मुले येथून पळून जातात. कारण अभ्यासक्रम फारच कठीण आहे. विविध प्रकारच्या प्रॅक्टीकल्स मुळे मुलांना अभ्यासाला वेळच मिळत नाही. येथील शेडयुल अतिशय किचकट आहे. या शिवाय पुस्तके पुरेशी उपलब्ध नाहीत. तुम्हाला आम्ही दिलेल्या नोट्स वर अवलंबून रहावे लागेल. कॉलेज लायब्ररीमध्ये जी पुस्तके आहेत ती फार कमी वेळा आपणास मिळतील. महाराष्ट स्टेट बोर्ड ऑफ टेक्निकल एज्युकेशन अत्यंत निराळे पेपर्स परीक्षेसाठी काढतात. आम्ही किती मार्कस देण्यात कंजूष आहोत, हे

तुम्हाला दर महिण्याच्या परीक्षेला अनुभवास येईलच. हा अनुभव माझेसाठी नवल वाटणारा होता.

वर्गात अरूण सरागे हा मेरीटचा विदयार्थी होता. हा माझा अत्यंत जिगरी दोस्त पण तो शहरात राहात असे व मी होस्टेलवर. दुसरा मित्र दिनेश राजाणी. हा सुध्दा गावातच राहायचा. हे दोघेही अत्यंत हूशार पण माझे मित्र झाले होते. अरूण तर ईतका शार्प होता की, वर्गात कितीही स्पीडने सरांनी लिहावयास सांगितले तर तो तितक्याच स्पीडने लिहित होता. ईतकेच नाहीतर त्याचे वेगाने काढलेले अक्षर सुध्दा अतिशय सुरेख होते. राजाणी त्याचे पाठोपाठ व मी त्याचे मागे असा आमचा वर्गातील क्रम होता. मला बीएससी पार्ट वन अभ्यासक्रमाचा आयता फायदा मिळत होता. अभ्यासापेक्षा वर्कशॉपच जास्त होते. नको ती कामे आम्हाला करावी लागत असे. जसे की, टिन स्मिथवाला ॲल्युमिनियमचे डबे करायला लावायचे तर ब्लॅकस्मिथवाला लोखंडी कच्चा रॉड हतोडयाने वाकवायला लावून त्याची रिंग बनवावी लागत असे. फिटींग जॉब तर एवढा भारी होता की, म्हणे गॅपमधून हवाही यायला नको. मी अभ्यासापेक्षा त्या वर्कशॉपला कंटाळलो होतो. बरीच मुले या वर्कशॉपमुळे तंत्रनिकेतन सोडून गेले होते. असे वाटायचे की कोठे शिक्षण घ्यायला आलो आपण. पण नाईलाज होता. ड्राईंगचे प्राध्यापक श्री. खर्चे सर ईतके कडक होते की, जरा पेन्सिलची रेषा त्यांना ड्राईंगमध्ये जाडी आढळली तर ते चक्क पेन्सिलच मोडून टाकायचे. या सर्व बाबी सांगण्याचा हेतू एवढाच की, तो काळ कसा होता. नाहीतर आज दुनियाभ-याच्या टयुशन्स लावूनही पोरांना यश मिळत नाही.

तीन महिण्यात नोव्हेंबरमध्ये लगेच परीक्षा यायची. सर्व टर्मवर्क लवकरच सबमिट करायचे असल्याने अभ्यासाची दमछाकच होत असे. काहीजण रात्रभर जागायचे तर काही नियोजीत क्रमाने अभ्यास करायचे. मी मात्र ज्या दिवशीचा अभ्यास त्याच दिवशी आटोपत होतो. मला कसेही करून पास व्हायचेच होते. प्रथम सेमिस्टरची परीक्ष आटोपली. रिझल्ट लागला. मला 73 टक्के मार्कस पडले. मी अतिशय आनंदी झालो होतो. माझ्या वडीलांनी मात्र माझे गुणपत्रक पाहले नाही. त्यांचा राग अजूनही निवळला नव्हता. मी दुस-या सेमिस्टरमध्ये गेलो. त्या काळात मला पोष्टाने एक चिठ्ठी मिळाली ती मंगलानेच लिहिलेली होती. प्रेमाचे विघ्न दुस-या सेममध्ये.... मग काय राहला की एक विषय त्या सेमिस्टरमध्ये. पण तंत्रनिकेतनात विषय राहला तरी पुढे जाण्याची संधी मिळत असे. त्यास ATKT असे म्हणत. एटीकेटी म्हणजे Allowed to keep term. पण आम्ही विदयार्थी त्यास एटीकेटी म्हणजे अटकत अटकत पुढे जाणे असे गंमतीने म्हणत होतो. विषय राहण्याचे मुख्य कारण मंगला नव्हती. आम्ही तिघा

शहाण्यांनी नटबोल्टचे ड्राईंग सोडवण्याऐवजी फालतूच प्रोजेक्शन सोडवण्याच्या भानगडीत पडलो होतो. हाच शहाणपणा माझे आंगी आला. पण असो तो विषय लवकरच म्हणजे पुढच्या सेमला 75 पैकी 73 मार्कस मिळवून निघाला. त्यानंतर मात्र आम्ही 65 च्या वरच मार्कस मिळवित होतो.

तिस-या सेमपर्यंत कमी कमी विदयार्थी राहात गेले. फार थोडेजण यशस्वी होत होते. तिकडे खाण्याची होस्टेलमध्ये काहीच सोय नसल्यामुळे पाय तुडवत चार किलोमिटर गावात जेवायला जावे लागत होते. काही वेळ मात्र मी अरूणने किंवा दिनेशने आणलेल्या घरगुती डब्यावर हात मारत होतो. ते घरगुती जेवण खूपच रूचकर लागायचे. नाहीतर आनंदाश्रमामध्ये चक्क कडू पोळया व पातळ वरण खावे लागे. चवीत बदल म्हणून मी पुरी भाजी खात असे. पंच्याहात्तर पैशात सहा पु-या व आलूची भाजी फारच रूचकर लागे. असे कठीण दिवस आम्ही पॉलिटेक्निकमध्ये घालवले.

सर्व सेमिस्टरमध्ये प्रथम श्रेणी मिळवून सुध्दा वडिलांनी दोन वर्ष सलग माझी मार्कशीट पाहली नाही. त्यामुळे मी सुध्दा मध्ये एक विषय राहला हे सांगितलेच नाही. शेवटच्या वर्षात काय चमत्कार घडला. कारण फक्त आठच विदयार्थी पास झाले होते. खास चमत्कार पांचव्या सेमिस्टरमध्येच घडला. ज्यामुळे माझे जीवन यशस्वी होणार होते तो चमत्कार नेमका काय आहे, हे पुढील भागामध्ये मी सादर करणार आहे.

****

6. प्रकल्प आणि अभियंता जीवन

"I find that the harder I work, the more luck I seem to have."- Thomas Jefferson

तंत्रनिकेतनातील चार अभियांत्रिकी सेमिस्टर माझ्या कठीण परीश्रमाने कसे लवकर निघून गेले हे मला कळले सुध्दा नाही. चारही सेममध्ये प्रथम श्रेणी मला मिळाली होती. आता बाबांचा विश्वास मी संपादन केला. बाबांनी माझी तोंड भरून स्तुती केली. ते म्हणाले, 'वाऽरे बाळा, 'सतत अपयश येवूनही तू तुझी चिकाटी कायम ठेवली, ही खरंच तुझ्या जीवनासाठी उल्लेखनीय बाब आहे.'

माझा उत्साह व्दिगुणीत झाला. होस्टेलमध्ये राहून खूप अभ्यास केला. मुले चिडवायची की, एवढा अभ्यास कशासाठी करतो आहेस. आम्ही कसे पिक्चर पाहून सुध्दा यश मिळवितो

तसे करून दाखव. हे त्यांचे आव्हानही मी स्विकारले. पाचव्या सेमिस्टरमध्ये तीन महिण्यात तब्बल वीस मुव्हीज पाहूनही पाचव्या सेमिस्टरमध्ये सुध्दा प्रथम श्रेणी मिळविली. आता केवळ हाच चमत्कार घडला नाही तर दुसरा एक अद्भूत चमत्कार घडला. ते मी आता तुम्हास सांगणार आहे.

शासनाने एक परीपत्रक काढले होते की, तंत्र निकेतनातील जी मुले पांचव्या सेमिस्टरपर्यंत प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाली असतील त्यांना तोतलाडोह प्रकल्पावर कनिष्ठ अभियंता म्हणून कामावर रूजू करून घेणार होते आणि तेही अपिअर्ड बेसिसवर. याचा अर्थ जे विदयार्थी सहाव्या सेमिस्टरच्या म्हणजे फायनल परीक्षेसाठी पात्र आहेत त्यांना प्रकल्पावर कनिष्ठ अभियंता म्हणून महाराष्ट्र शासनाची नोकरी मिळेल. त्यांनी फायनलचा रिझल्ट लागला नाही तरी ते या पदासाठी जॉईन होवू शकतात. या नियमानुसार मी 22 जून 1977 ला सकाळी अकरा वाजता कनिष्ठ अभियंता म्हणून तोतलाडोह प्रकल्पावर जॉईन झालो. त्यावेळचा बेसिक पगार होता फक्त 170 रूपये. पूर्ण पदविका मिळाल्यानंतर मला रूपये 200 मूळ पगार अशी शासनाची नोकरी मिळाली. जे अभागी ज्यांनी फायनल परीक्षा उत्तीर्ण केली नाही ते अर्थातच शासनाच्या नोकरीतून काढल्या गेले.

शासनाच्या नोकरीवर रूजू होतांना, मी जरी कनिष्ठ अभियंता झालो होतो तरी माझा ड्रेस मात्र गरीबीमुळे साधा पांढरा पैजामा व ओपन शर्ट असा होता. सर्व कर्मचारी मला पाहून हसले होते की, हा खरंच स्थापत्य अभियांत्रीकी पदविका परीक्षा पास झाला आहे की नाही. मी मात्र शांतच होतो. कोणालाही उध्दट उत्तरे दिली नाहीत. त्या काळात प्रकल्पावर श्री. बंदवार हे मध्यप्रदेशातील उप विभागीय अभियंता मला साहेब म्हणून लाभले होते. ते दिसायला राणा प्रतापासारखी मिशी ठेवणारे होते पण स्वभावाने अतिशय प्रेमळ होते. ते म्हणाले, बाळा तू आता घरी जा. कारण येथे मच्छर खूप आहेत व तू काहीच सामान आणलेले दिसत नाही. एक तारखेला सर्व सामानासहीत येशील. तूला राहण्यासाठी शासनाचे क्वार्टर मिळणार आहेच. मी घरी आलो व बाबांचा आनंद वाढवला. ते माझ्यावर खूप खूष झाले कारण मी ज्युनिअर ईंजिनिअर झालो होतो. बाबांचे मला बीएससी नंतर शिक्षक करावे ही अपेक्षा मी उंचावर नेवून अभियंता झालो ते ही महाराष्ट्र शासनातील पाटबंधाने विभागाचा. मला जलविदयुत प्रकल्प उपविभाग क्रमांक 4 मध्ये नोकरी मिळाली.

एक जुलैला ऑफीसमध्ये गेलो. आठवडाभर गावला गेलो होतो तरी माझ्या हातात माझा पहिला पगार चारशे रूपये शासनाने दिला होता. मला चटकन आठवले की, ज्या बाबांनी मला चारशे रूपये देवून घरातून हाकलून लावले होते त्यांचेच हातात आता मी हे चारशे रूपये सुपूर्द करणार होतो. काही रक्कम माझेजवळ आधीच होती. मी परत गावला गेलो तेंव्हा बाबांना म्हणालो, ...'.बाबा ही घ्या तुम्ही मला दिलेले जीवन घालविण्यासाठीची रक्कम. आता मी स्वतंत्र झालो आहे. हे पैसे परत केले तेंव्हा बाबांना अश्रू आवरता आले नाही. बाप कधी अश्रू गाळत नसतो म्हणून त्यांनी डोळे पाणावण्यावरच नियंत्रण दाखवले.

'नाही रे बाळा, कोणताही बाप हा मुलांच्या भविष्यासाठी कठोर बोलत असतो म्हणून त्याचे मुलावर प्रेम नाही असा अर्थ होत नसतो. मी सेवानिवृत्त झालो होतो म्हणून तूला बोललो. पण त्या बोलण्यानेच तुझ्या मनावर आघात होवून तू खूप अभ्यास केला आहेस. हेच जीवनातले यशाचे मर्म होय'. प्रत्येक बापाला वाटत असते की, त्याचा मुलगा हा त्यांचेपेक्षाही वरचढ निघायला हवा.

आता तुझे आयुष्य तू निर्व्यसनी राहून घालव. बाबांचे बोल माझे मनावर ईतके बिंबले की, संपूर्ण आयुष्यात मी अभियंता असून साधी सिगारेट सुध्दा ओढलेली नाही. मी पान आणि सुपारी पण खात नाही. हेच माझे बाबांचे संस्कार पुढील माझ्या आयुष्यात माझ्या मुलांवर कसे झाले हे ओघाओघाने कथनामध्ये येणार आहेतच.

तोतलाडोह प्रकल्प हा पेंच नदीवर महाराष्ट्र व मध्यप्रदेशच्या बॉर्डरवर पेंच जलविदयुत प्रकल्प म्हणून बांधकामधीन होता. त्यामध्ये अंडरग्राउंड पावर हाऊस प्रस्तावीत होते. पावर हाऊस अंडरग्राउंड असल्यामुळे त्यात बांधकामाच्या उद्देशाने प्रवेश करण्याचे हेतूने हा ॲप्रोच टनेल प्रस्तावीत होता. त्यामध्ये बोगदयामध्ये अंडरग्राउंड कंन्स्ट्रक्शनचे काम मी पहात होतो. मी कामावर रूजू झालो तेंव्हा तो फक्त 500 मीटर खोल खणल्या गेला होता. ॲप्रोच टनेलमध्ये खूप रिस्की काम असल्याने शासन आम्हाला वीस पर्सेंट एवढे भव्य अनुदान केवळ रिस्क अलांउस देत होते. बोगदयाचे काम जीव घेणे होते त्यातूनही मी कसा वाचत गेलो याचे धोकादायक वर्णन मी तुम्हाला पुढील भागात सांगणार आहेच.

****

' Life is all about taking risks.If you never take a risk, you will never achieve your dreams'.- Picture quotes.com

शासकीय तंत्र निकेतनातील शिक्षण मोठया गरीबीत आटोपले व लवकरच नौकरी पण लागली. ही नोकरी अतिशय दुर्गम भागात म्हणजे मध्यप्रदेशच्या काठावर पेंच नदीवर असणा-या प्रस्तावित जलविदयुत प्रकल्पावर लागली. नवीन नोकरी ही नेहमीच अशा भागात लागत असते. जेथे खूप धोका असतो. प्रकल्पावर जरी मला सरकारी निवासस्थान मिळाले तरी ते अशा जागी एका टेकडयावर होते की, क्वार्टरच्या मागील संडासामध्ये नेहमी जंगलातून एक कोल्हा येवून बसायचा. याशिवाय साप,विंचू हे जंगलामुळे परिचीतच होते. ही जबाबदारी स्विकारून मी नौकरी सुरू तर केली पण जॉब ही असा होता की, मला टनेलच्या कामात सर्वेक्षण करावे लागे.

यातील पुढील धोका काय आहे हे सांगण्यापूर्वी मी माझे मोठे बंधू स्व. श्री. किशोरभाऊ यांना कसा विसरेल. त्यांनी मला त्यांच्या तुटपुंज्या नोकरीतील पैशातून दर महिण्याला मदत केली. माझे शिक्षण पूर्ण करण्यात त्यांचाही सिंहाचा वाटा आहे. एवढेच नव्हे तर त्यांनी मला चोरखोपडी या दुर्गम भागातून बदलीवर भिडी या गावात आल्यावर स्वत: पैदल वाबगांवच्या शाळेपर्यंत नेहमी जावून माझ्यासाठी मात्र नवीन घेतलेली सायकल पाठविली होती. एवढे त्यांचे माझ्यावर प्रेम होते. आज ते अस्तित्वात नसले तरी, त्यांचे उपकार मी विसरू शकत नाही. किशोर भाऊ आणि मी नेहमी एकाच विषयावर वाद करायचो. तो म्हणजे या जगात ईश्वर आहे की नाही. कधी ते नाहीची तर कधी मी आहेची अशी बाजू घेवून नेहमी बौध्दिक वाद करायचो. त्यांनीच मला ईंग्रजी पत्रे कशी लिहावी हे शिकविले होते. ते जीवनात फारसे यशस्वी होवू शकले नाही कारण त्यांनी फक्त बी.ए. पार्ट वनपर्यंतच शिक्षण घेतले होते व नंतर डि.एड करून प्राथमिक शिक्षक झाले होते. त्यांना चित्रपट पाहण्याचा फार नाद होता. एवढेच नव्हे तर ते हूबेहूब देवानंदसारखा भांग करायचे. त्यांचे ड्राईंग अतिशय चांगले होते. त्यांनी विदर्भसंत श्री. गजानज महाराजांचे चित्र केवळ पेन्सिलने ईतके सुबक काढले होते की, आम्ही त्यास फ्रेम केले होते. व नित्य पूजा करायचो. माझ्या वहिनी सौ. सुशिला हया सुध्दा प्राथमिक शिक्षीका होत्या. त्या मात्र अजूनही चांगले जीवन जगत आहेत. हे सर्व केवळ त्यांचे उपकार म्हणून मी सांगितले आहे.

माझी ताई मंदाताई ही व मी मिळून खूप गाणे म्हणायचो कारण ताईचा आवाज हुबेहूब लता मंगेशकर सारखा होता. मला मात्र रफीच्या आवाजाची गोडी होती. ताईचे लग्न झाल्यानंतर

मला तिचा विरह जाणवला. आजही तिच्या आवाजाची गूंज माझ्या कानात आहे. ती सध्या हिंगणघाटलाच राहते पण भेटी फार कमी वेळा होतात. प्रकल्पावर नोकरी करतांना माझा लहान भाऊ विनोद हा वर्धेला एम. कॉमला शिकत होता. तो पुढे शिकून एमफिल व पीएचडी झाल्यानंतर अनुक्रमे वरूड, नांदुरा ईत्यादी ठिकाणी प्राध्यापकाच्या नाकरीत होता. तो नेहमीच प्रकल्पावर माझ्या भेटीसाठी येत असे.

प्रकल्पावर बोगदयाच्या कामाला मी सुरूवात केली. ही जीवनातली एक धोकादायक सुरूवात होती. बोगदयात एकदा गेला की तो माणूस बाहेर जिवंत येईलच याची काही शाश्वती नव्हती. डोक्यावर हेलमेट असले तरी एक एक टन वजनाचे दगड डोक्यावर केंव्हा पडतील हे सांगता येत नव्हते. आम्ही त्या खोदलेल्या भागाला नंतर वक्राकार असे वरून कॉंक्रीटींग करायचो पण तत्पूर्वी आम्हा अभियंत्यांना तेथे सर्वेक्षण करावे लागे. तेथेच काही मित्रांचा परीचय झाला होता. तेही त्याच बोगदयात कामाला होते.

ज्ञानेश पाहूणे, श्रीराम चल्लावार, चौथकंठीवार, प्रकाश बेडेकर, मनोहर मंथनवार, वणीकर, अजित चाणेकर, हे सर्व माझे खास दोस्त होते. प्रत्येकाचे वैशिष्ठ्य वेगळे असायचे. आम्ही सर्व बॅचलर होतो त्यामुळे आम्ही एक भोजनासाठी मेस केली होती. प्रत्येक जण वेगवेगळया शिफ्ट मध्ये काम करायचे, पण जेवण मात्र एकाच क्वार्टरमध्ये. हा क्वार्टर दारूचा नव्हे बरं.. हे निवासस्थान होय. एकमेव मनोरंजनाचे साधन. धोकादायक नोकरीतही असा आनंद मिळविणे म्हणजे जीवनाची कसरत होती. धोका आणि जीवनाचा आनंद या दोन गोष्टी भिन्न असल्या तरी, आम्ही मित्र कसा आनंद घेत होतो हे पुढील भागात सांगतो. ज्ञानेश पाहूणेची नाटय कला, माझे किस्से सांगण्याची लकब, रविवारच्या मद्दयहीन पार्ट्या, चल्लावार यांनी जमविलेल्या हिंदी पुस्तकांच्या गंमती, प्रकाश बेडेकर सिनीयर याची मदत, सर्वांचे लग्न होण्याची प्रक्रीया अशा कितीतरी गंमती घेवून मी पुढील भाग सादर करेन. तोपर्यंतं ही जीवनयात्रा एकसारखी वाचत चला.

****

'Many people will walk in and out of your life, but only true friends will leave footprints in your heart'. - Eleanor Roosevell

तोतलाडोहच्या जंगलात नौकरी करतांना एकाकीपण जाणवत होते. शासकीय काम तीन पाळीत अहोरात्र चालू होते. मला रात्रपाळीत ही काम करावे लागत असे. आळस करून किंवा नाराजी दाखवून काम करण्यात काही अर्थ नव्हता. असे म्हणतात ना की, 'अलसस्य कुतो विद्दया, अविद्दयस्य कुतो धनम्, अधनस्य कुत: मित्रम्, अमित्रस्य कुत: सुखम्!. म्हणून मी आळस सोडून मित्र जोडण्याचा प्रयत्न केला. मला प्रकल्पावर खरोखरच चांगले मित्र सुरूवातीपासूनच मिळाले. त्यांचा सहवास मला एक जीवनपर्वनीच वाटली.

अगदी सुरूवातीला म्हणजे जॉईनींगच्या वेळी ज्ञानेश पाहूणे याची भेट झाली. बोलता बोलता सहजच माझ्या तोंडून निघाले की, मी पब्लिक स्कूलचा विदयार्थी आहे. तो लगेच म्हणाला, 'आऽरे, 'आपल्या साईटवर एक पब्लिक स्कूलचा पोरगा लागला आहे. तू जर त्याला ओळखत असशील तर तुला एक चांगला मित्र मिळेल. त्याचे नांव सुधीर कोल्हे आहे. मी अतिशय आनंदीत झालो कारण तो मला शाळेमध्ये केवळ एका वर्षाने सिनियर होता. मी दहावीत होतो तेंव्हा तो अकरावीत होता. हे ऐकूण ज्ञानेशला एक युक्ति सूचली.

तो म्हणाला आरे साईटला चल. मी त्याची गंमत करतो. आम्ही दोघे साईटवर गेलो. ॲप्रोच टनेलची साईट फक्त दोन किलोमीटर होती त्यामुळे आम्ही दोघे पायीच गेलो. तेथे गेल्यावर ज्ञानेश म्हणाला, 'आरे हा पोरगा नोकरीच्या शोधात आला आहे. तू त्याला मस्टरवर लावून घे'. त्यावेळी आम्हा अभियंत्यांना मस्टरवर मजूरांना लावण्याची परवानगी होती. मजूरांच्या अल्पसंख्येमुळे तसे अधिकार आम्हाला देण्यात आले होते. आम्ही लावलेले मजूर नंतर डिपार्टमध्ये नियमीत झाले आहेत. मी आणि ज्ञानेश सुधीर कोल्हे समोर गेलो असता ज्ञानेश म्हणाला, आरे याचे नांव मस्टरवर लिहून घे बरं. त्याला ही गोष्ट खर वाटली. सुधीर म्हणाला आरे हा तर माझा पब्लिक स्कूलचा मित्र आहे. खरंच लावू कां..तेंव्हा ज्ञानेश खूप हसला व बोलला की, आऽबे तो अभियंता म्हणून येथे आला आहे. असा हा माझा मित्र खोडकर ज्ञानेश. याला नको त्या उचापती करण्याची फारच संवय होती. तो पुढे याच प्रकल्पावर अनेक नाटकांमध्ये भाग घेवून चमकला होता. मला नाटकाची फारशी आवड नव्हती पण मी त्याची नाटके नेहमीच पाहत होतो. या व्यतिरीक्त तोतलाडोहला दुसरे मनोरंजनाचे साधनही नव्हते.

यानेच मग श्रीराम चल्लावार याची ओळख करून दिली. तो अतिशय शांत प्रवृत्तीचा होता. स्वत:च्या निवासस्थानात एका आडव्या झोपलेल्या टेपरेकॉर्डवर तो नेहमी जुने गाणे ऐकायचा. मी त्यास एक जुन्या गाण्याची सोनी कंपनीची कॅसेट दिली होती. नंतर

त्याच्याजवळील तो झोपलेला टेपरेकॉर्डर मलाच विकत दिला होता. त्याचे डोक्याचे कुरळे केस एवढे वाढले होते की, तो कृष्णासारखा दिसायचा. दोन मित्र मिळाले. सुधीर तिसरा नंतर प्रकाश बेडेकर हा सिनियर, चौथकंठीवार, वणीकर, मंथनवार, चाणेकर ईत्यादी नंतरचे मित्र. अजित चाणेकर हा त्यावेळी एएमआई हया परीक्षेचा प्रायव्हेट अभ्यास करीत असे. तो पुढे त्यात यशस्वीपण झाला. मला ती एएमआई अभ्यासाची किमया जमली नाही. प्रत्येकाचे वैशिष्ठय वेगळे होते. हे मित्र म्हणजेच तोतलाडोहचे एकमेव मनोरंजन. कारण सर्व मंडळी बॅचलर होती. आमच्या चौघाच्या जेवणाच्या मेसची मजा तर काही औरच होती. देशपांडे हा आमचा फुकटया मित्र. तो केवळ फुकटचे पोहे झोडायला येत असे. नंतर दोन वर्षांनी आम्हा सगळयांचे लग्न झाले. नंतरची मजा काही वेगळीच आहे.

मध्यंतरीच्या या काळामध्ये एका अजून मुलगी माझ्या सानिध्यात जबरदस्तीने आली. तिचे नांव संध्या. मी जसा जसा मुलींपासून दूर पळण्याचा प्रयत्न करतो तितके ते अधिकच माझ्या जीवनात कालवाकालव करीत होते. वास्तविक प्रेम वगैरे असे काहीच नव्हते. तर या संध्याची गंमत मी पुढील भागात सांगणार आहे. त्यानंतर माझ्या लग्नाची गंमत अशा कितीतरी जीवनातल्या गंमती घेवून माझी ही आत्मकथनाची सिरीज पुढे जाणार आहे. तेंव्हा वाचता आहात ना मंडळी माझे आत्मकथन. सर्व जीवन केवळ सिरीयस लिहिण्यापेक्षा काही गंमती सांगण्याचा मला छंदच आहे. मी दर रविवारी जेंव्हा प्रकल्पावरील गंमती सांगत होतो तेंव्हा त्या विशेषत: श्रीरामला फार आवडत असत. आजही आम्ही जुने मित्र जेंव्हा नागपूरला ज्ञानेशकडे भेटतो तेंव्हा ही मैफील चांगली जमत असते. अजून पुढे काही गंमती ओघाओघाने येतीलच तोपर्यंत पुढील भागाचीआवर्जून वाट पहा. आणि माझी ही आत्मकथनाची कहाणी नियमीत वाचत चला. मित्रांनो वाचनाने माणसाचे आयुष्य वाढत असते हे माझ्या जीवनाचे ब्रीदवाक्य आहे. सर्व वाचकांचे पुन्हा खूप खूप आभार.

****

"Love is so short, forgetting is so long." – Pablo Neruda

प्रकल्पावर आम्हा सर्व मित्रांना बॅचलर असल्यामुळे वेगळया एका टेकडयावर असलेल्या कॉलनीतील सरकारी निवासस्थानावर ठेवण्यात आले होते. बाकी सर्व लग्न झालेली मंडळी तोतलाडोहच्या खालच्या सपाट भूमीवर राहात होते. नंतर प्रकल्पावर कर्मचा-यांची गर्दी

वाढल्यावर काही प्रापंचिक मंडळी सुध्दा तेथे रहायला आली होती. त्यातच एक अभियंता जो दारूच्या व्यसनाधिन राहात असे त्यास एक क्वार्टर मिळाले. दारूचे नव्हे तर रहाण्यासाठी. त्यांची एक सोळा वर्षाची मुलगी संध्या दहाव्या वर्गात शिकत होती. ती दिसायला अत्यंत सावळी होती.

हीच ती संध्या. माझा आणि तिचा सुतमात्रही संबंध नव्हता पण मी साईटवरून येण्याची वेळ व तिची शाळा सुटण्याची वेळ ही अशाप्रकारे जुळत होती की, ती मला वारंवार रस्त्यात भेटत असे. भेटतांना त्या काळात मुलींशी काहीतरी मुद्दामच बोलावे अशी प्रथा त्या काळात नव्हती. ती मात्र केवळ स्मित हास्य करीत असे. थोडक्यात We were used to do the short love with each others. हे प्रेम सुध्दा अल्हड प्रेमाच्या प्रकारात मोडत होते. ती शाळेत मात्र कोणाशी हसून बोलत असे, याची मला कल्पना नव्हती. तारूण्यात रंग सावळा असो वा गोरा पण मुलींचे तारूण्यातील स्मित हास्य पोरांना प्रेमच वाटत असते. हे सुध्दा एक शारिरीक आकर्षण होय हे समजण्याईतका मी प्रौढ झालो होतो. माझे वय त्यावेळी बावीस वर्षाचे होते. थोडी पार्श्वभूमी सांगायची झाल्यास मी प्रथम ज्या पब्लिक स्कूलमध्ये शिकलो होतो तेथे सुध्दा मुली नव्हत्या. त्यानंतर शासकीय विदयानिकेतनातून शासकीय तंत्र निकेतनात गेल्यावर तेथे सुध्दा मुली नव्हत्या. एकंदरीत माझा मुलींशी कधीच संबंध आला नाही. मग मी कशाला कोणाच्या प्रेमात पडू. तरी सुध्दा लहानपणी सुनंदा नंतर कॉलेजमध्ये मंगला आणि आता ही संध्या असा त्रिवेणी संयोग माझ्या जीवनात थोडया प्रमाणात कां होईना पण घोळ करून गेला. या सर्व मुली ओघाओघानेच जीवनात आलेल्या होत्या. या सर्वांचा ख-या प्रेमाशी काहीच संबंध नव्हता.

एक दिवस अचानक काय घडले की, संध्याला कोणीतरी अर्थात तिच्या शाळेतलाच एका खोडकर विदयार्थ्याने तिला एक चिठ्ठी पाठवली. ती हिंदी भाषेत लिहिलेली होती. आणि शेवटी 'तेरा काला गुलाब' असे लिहीलेले आढळले. तो कागद तिने घरी आणला व लपवून ठेवला. तरी सुध्दा ती चिठ्ठी तिच्या आईच्या हातात पडली. झालं नेमकं नको तेच घडलं. वास्तविक हा प्रकार तिच्या शाळेतलाच असावा याची खात्री तिला होती. पण प्रकार काही वेगळाच घडला. माझ्याशी ती वारंवार रस्त्यामध्ये हसायची त्यामुळे तिची कल्पना अशी झाली की, तो कागद मीच लिहिला असेल. आईला पण तशीच शंका आली. कारण मी तिच्या क्वार्टरजवळ रहात होतो. तरूणपणाचे डोळे फिरविणे, असा तिरपा कटाक्ष तिच्या आईच्या नेहमी लक्षात येत असावा.

तिच्या आईने मला शंकेपाटी बोलावले व खूप आरोप केले. मी स्वत: ती लिहिली चिठ्ठी नसल्याने वारंवार त्यांची समजूत घालीत होतो की, मी मराठी भाषिक असतांना कशाला हिंदीमध्ये चिठ्ठी लिहू. शिवाय मी गोरा असतांना कशाला 'काला गुलाब' असे लिहिणार पण त्यांच्या टाळक्यात माझे बोलणे शिरत नव्हते. वगैरे वगैरे ....मी काकळूतीने त्यांना सांगत होतो की, वाटल्यास तुम्ही माझे हस्ताक्षर डिपार्टमेंटमधील कागदपत्रावरून पडताळू शकता. तिचा बाप मदय प्राशनी असल्याने तो 'नरो वा कुंजरो वा' ची भूमिका बजावत होता. या कैचीतुन माझी सुटका कशी करावी हेच मला समजत नव्हते.

मग तीने एक योजना आखली. अंबाखोरीला ती एका लग्न झालेल्या महिलेसोबत आली व मला साईटवरून थेट तेथे बोलावले. मी आश्चर्यचकीत झालो. मला वाटले आता ही मला नेमके काय विचारणार आहे. मी गेलो. आम्ही दोघे एका नदीतील दगडावर बसलो. ती म्हणाली, 'खरंच ती चिठ्ठी तुम्ही लिहिलेली आहे की नाही. मी बोललो..'नाही,अगं मी कशी लिहिणार. मला वेळ तरी आहे काय? आणि मी कशाला या भानगडीत पडू. मी फक्त तुझ्याकडे पाहून हसत होतो त्याचंही कारण तू हसत होती म्हणून. बाकी काहीच नाही.

ती: बरं ते जावू दया. मी मात्र तुमच्यावर खरंच प्रेम करते आहे. जरी तुम्ही ते लिहिलेलं नसेल तरी तुम्ही माझ्याशी लग्न कराल काय?

मी अवाक झालो. जे माझ्या ध्यानी मनी नाही ते या सोळा वर्षाच्या पोरीला कसे सुचले. मग मी बोललो... 'अगं हा तुझा आणि तुझ्या आईचा प्लॅन तर नाही'.

तुझी जात वेगळी. माझी जात वेगळी. हे शक्यच नाही. ती जरा नाराज झाली पण मी तिला समजावलं की याला प्रेम म्हणत नसतात. हे शारिरीक आकर्षण असतं. तसंही मला तिला कटवायचच होतं. हे प्रकरण मी संपुष्टात तर आणलं पण एव्हाना ही बातमी माझ्या मित्रापर्यंत गेलीच. तेथून ती बातमी माझ्या वडीलांपर्यत गेली. त्यांनाही वाटलं की, पोरगं आता वयात आलं आहे..याचं लग्न करायला पाहिजे. नाहीतर हा बिघडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

हा.. हा... म्हणता, हे सर्व सगळीकडे पसरलं. आणि अचानक चार पाहूणे तोतलाडोहला येवून पोहोचले. माझ्या ध्यानी मनी नसतांना 'आ बैल मुझे मार' ही अवस्था माझी झाली. आता पुढे लग्नाचा प्रसंग माझेवर कसा आला व मला कशी बायको मिळाली, ही उत्सुकता तुम्हाला लागली असेलच. तेंव्हा ते चविष्ट वर्णन घेवून मी तुम्हाला पुढील भागामध्ये भेटणार आहे. तोपर्यंत नेहमीप्रमाणे आपले वाचन सुरू ठेवा. माझ्या आत्मकथनाची कहाणी अधिकाधिक

वाचणीय व्हावी, याची काळजी मी घेत आहेच. सर्व बाबी या सत्य लिहिलेल्या आहेत यावर कृपया विश्वास ठेवा.

****

“Marriage lets you annoy one special person for the rest of your life.” – Unknown

संध्याच्या प्रकरणानंतर मला लग्न झालेच पाहिजे अशी काही घाई नव्हती. तसा माझा कलही नव्हता. माझ्या वडीलांपर्यंत जी खोटी बातमी पोहोचली होती त्यात माझा ही काही अंशी दोष आहे असे मला वाटत होते म्हणून मी लग्नाला होकार दिला. मधला दोन वर्षाचा काळ आईसोबत गेला होता. मीच तिला प्रकल्पावर नेले होते. तिला फार काळ तेथे करमले नाही. मी एकटाच जीवन जगत होतो. तिकडे माझ्या लग्नासाठी कोण योग्य मुलगी आहे याचा शोध घेणे सुरू झाले होते. प्रथम वडीलांनी नेहमीच्या पध्दतीनुसार मामाचीच पोरगी पाहली. त्यावेळी खेडयामध्ये अशी चर्चा होती की, ईंजिनियर हे दारू पितात.

मी माझ्या मोठया भावाला घेवून खैरी या खेडयावर गेलो. तेथे ती नव्हती. ती नुकतीच दहावीची परीक्षा दयायला गेली होती. आम्ही उत्साहापोटी त्याही खेडयावर गेलो. तिचे नांव नंदा होते. आता नंदाला पाहले. ती दिसायला साधारण होती. पण तिचे बोलणे 'आजी काजी' असे म्हणणारे होते. खेडयात आजही ही पध्दत आहे. ती जरी आदरयुक्त असली तरी मला आवडत नव्हते. मला थोडी मॉडर्न बायको असावी असे उगीचच वाटायचे मी तिला सुध्दा पसंती दर्शविली. ती माझ्या नशीबात नसावी. अभियंता हे नेहमीच मद्दय प्राशन करतात या धर्तीवर माझे ते स्थळ मला मिळाले नाही. तशी माझी ईच्छाही नव्हती.

मग दुसरी मुलगी पाहणे आवश्यक होते. एक प्रपोझल पुन्हा आले. ते सुध्दा खेडयातले. असो ही मुलगी मात्र दिसायला अतिशय सुंदर होती. ही माझ्या भाग्यात असलेली एकमेव मुलगी. हिचे नांव रेखा. ही त्यावेळी मॅट्रीक पास होती. ही मला पसंद पडली. पण एक शब्द वडीलांच्या कानावर टाकला.

"एखादी पदवीधर मुलगी पहा ना!.. मी म्हणालो.

बाबा: "आऽरे पदवीधर मुलगी तुला सांभाळणार नाही. या कमी शिकलेल्या मुलीच चांगला संसार करू शकतात, आणि तसाही तू कोणता पदवीधर आहेस. तुझा स्थापत्य अभियांत्रिकीचा डिप्लोमाच आहे."

अशी भावना त्यावेळी माझ्या वडीलांची होती. या त्यांच्या वक्तव्यामुळे माझी दांडी पूर्णपणे पडली होती. आता हीच मुलगी मी जेंव्हा पहायला गेलो तेंव्हा हीच फायनल झाली. मला सुट्टया फार कमी मिळत होत्या. लग्नासाठी केवळ दहा दिवसाची सुट्टी मी घेतली होती.

माझे लग्न साध्या पध्दतीने पार आर्वी येथे पार पडले. एक महत्वाची गोष्ट अशी की, मी लग्नापूर्वीच माझ्या जीवनातील पहिली गाडी राजदूत मोटरसायकल ही घेतली होती. त्यासाठी मला माझे मोठे बंधू किशोर भाऊ यांनी त्यावेळी चार हजाराची मदत केली होती. यामध्ये आमच्या सुशिला वहिनींचा ही होकार असल्याशिवाय ही मदत होणे शक्य नव्हते त्यामुळे मी या ठिकाणी सौ. सुशिला वहिनी हिचाही खूप खूप आभारी आहे. त्यांनी मला व विनोदला लहानपणापासून खूप सांभाळले. त्यांचाही आवाज चांगलाच होता. त्या गाणे म्हणून आम्हा भावंडांना बंगईवर रोहणीला असतांना झोपवत असायचे. तर वडीलांनी एक हजार व माझ्याजवळचे साडेतीन हजार असे मिळून मी 8300 ची ही नवीन मोटरसायकल घेतली होती. या ठिकाणी एक उल्लेख करावास वाटतो की, माझे आजोबा हे त्यांच्या मुलाला म्हणजे माझ्या वडीलांना किमान सायकलवर बसण्याचे स्वप्न पाहणार होते पण त्यांची ईच्छा त्यांच्या अगोदरच झाड अंगावर पडून झालेल्या निधनामुळे पूर्ण होवू शकली नव्हती. मी मात्र माझ्या वडीलांना मोटरसायकलवर बसविले होते.

प्रत्येक बापाला आपल्या मुलाने उच्चशिक्षा विभूषीत व्हावे व त्यांना कोणत्या तरी चांगल्या ठिकाणी बसवावे असे वाटत असते. मला सुध्दा पुढे माझ्या जीवनात माझ्या मुलाने म्हणजेच आशयने प्रथमच विमानात बसविले, हे पुढील आत्म कथनात येईलच. असो परत लग्नाकडे वळू या. माझे लग्न उपरोक्त कथीत केलेल्या मुलीशी म्हणजेच रेखाशी 9 जुलै 1980 ला झाले. मी तिला घेवून तोतलाडोह प्रकल्पावर शासकीय निवासस्थानात गेलो. सुखाचा संसार चालू झाला होता. मी अतिशय आनंदी होतो. आम्हा उभयतांना लवकरच एक कन्यारत्न प्राप्त झाले. या कन्या रत्नाचे जन्माचे वेळी मला व रेखाला काय त्रास झाला, हे मी पुढील भाग क्रमांक 17 मध्ये सांगणार आहेच. प्रत्येक वेळी मी संघर्षमय जीवनच जगत आलो आहे. त्यावेळी मला जेमतेम नवशे रूपये पगार होता. व या बाळासाठी मला तीन हजार रूपये खर्च

आला तो कां व कसा आला ही एक लहानशी कहाणी घेवून मी पुढील भागात तुम्हास भेटणार आहेच.

****

" Life's problems wouldn't be called 'hurdles' if there wasn't a way to get over them."- Danielle Henn

"जीवनाच्या प्रश्नांना तोपर्यंत कठीण म्हणू नये, जोपर्यंत तो सोडविण्यास मार्ग सापडत नाही."- डॅनियली हेन्न

तोतलाडोह प्रकल्पावर माझा संसार सौ. रेखाशी सुरू झाला. सुखाचे दिवस फार काळ टिकत नसतात. कारण सुख आणि दु:ख या एकाच नाण्याच्या दोन बाजू असतात तसेच ते डोंगरावरच्या उतार चढावासारखे असतात. यालाच तर जीवनाचे रहस्य म्हणतात.

लग्न होवून फक्त एक महिणा झाला असेल तोच तिला गर्भधारणा झाली. काही काळ तिला आरामासाठी गावला पाठविण्यात आले. पण लगेच सहा महिणे होत नाही, तर ती प्रकल्पावर परत आली. मला काय माहित की ती काही नवीन संकट घेवून येईल. सातव्या महिण्याचे सोपस्कार ज्याला आपण 'सातवा महिणा' बाळाचा पाळणा असे काहीतरी म्हणतो ते ही तिच्या नशीबात नव्हते. माझ्याजवळ त्यावेळी तिच्याजवळ राहायसाठी कोणीच नव्हते. मला प्रयत्न करूनही तशी मदत करणारी व्यक्ति मिळाली नव्हती. ही माझी पहिली शोकांतिका होय. म्हणतात नां संकटे नेहमी एकटयाने येत नसतात, ते सोबत अनेक संकटांना घेवून येतात.

झालंही तसंच, एक दिवस पहाटे चार वाजता तिचे पोट दुखायला लागले. मला काहीच कळत नव्हते. एवढया पहाटे मी सांगणार तरी कोणाला होतो. तरी पण मदत घेणे अत्यावश्यक होते. मी बाजूच्या क्वार्टरमध्ये राहात असलेल्या एका मुस्लीम बाईचे सहाय्य घ्यायचा प्रयत्न केला. श्री. पटेल यांच्या पत्नीने तात्काळ मदत केली. त्या म्हणाल्या, 'यांना ताबडतोब दवाखाण्यात नेणे आवश्यक आहे'. त्या वेळी तोतलाडोह प्रकल्पावर केवळ एक लहानसा सरकारी दवाखाना होता तो काहीच कामाचा नव्हता तरी सुध्दा मी तिला तेथे घेवून गेलो.

त्या ठिकाणी असलेल्या तुटपुंज्या सोयीनुसार डॉक्टरने माझ्या बाळाची खूप काळजी घेतली व मला प्रकल्पावरच सातव्या महिण्यातच एक कन्यारत्न प्राप्त झाले. डॉक्टर म्हणाले, "साहेब ही प्रिमॅच्युअरर्ड डिलीव्हरी आहे. मुलीचे वजन केवळ एक किलो सहाशे ग्रॅम आहे.

म्हणजे माझे बाळ हे साडेतीन पौंडाचे होते. अशा परिस्थितीत हिला नागपूरला तातडीने हलविणे जरूरी आहे." अन्यथा...........? एवढे बोलून ते स्तब्ध झाले होते. माझी धावपळ चालू झाली. मी तातडीने तिच्या जवळ एका मनोहर मंथनवार नावाच्या मित्राच्या आईला तिच्या जवळ ठेवले. तिचे उपकार मी जन्मभर विसरू शकत नाही. त्यावेळी ती नसती तर माझी बेबी कधीच मला पहायला मिळाली नसती. दुसरा एक मित्र श्री अजित चाणेकर याला फायनान्स प्रॉब्लेमसाठी सुरक्षीत ठेवला होता. त्यांनेही जिवापाड मेहनत घेतली, माझ्या मागे पैसा पुरविला कारण मी लगेच प्रकल्पावरून माझ्या वहिनींना आणायसाठी मोटरसायकलने गेलो होतो.

मला मोटरसायकल प्रवासात खूप अडचणी आल्या. माझी गाडी कोराडीजवळ पंचर झाली होती. मला माहित नसल्याने मी ती तशीच ओढत कमी स्पीडमध्ये चालवत नेली. प्रकार असा झाला की, मला पूर्ण टयुबच बदलावा लागला. तो त्या लहान गावात न मिळाल्याने मला गाडी तेथेच ठेवून नागपूरला बसने जावून तो टयुब आणावा लागला. अर्थातच मला वर्धा देवळी व मुरदगांवला पोहोचण्यासाठी रात्रीचे अकरा वाजले होते. तरी मी वेळ न गमावता आमच्या सौ. सुशिला वहिनींना घेवून पहाटे चार वाजताच परतीच्या प्रवासाला निघालो. आणि तोतलाडोह प्रकल्पावर तब्बल चारशे किलोमीटर जाणे येणे असा प्रवास चोविस तासात केला होता त्यामुळे अत्यंत थकलो होतो. प्रकल्पावर येतो तर माझी केस माझ्या मित्रांनी नागपूरला हलविली होती कारण ती बेबी मुळात रडतच नव्हती. हा धोका नष्ट व्हावा यासाठी माझ्या मित्रांनी बेबीला नागपूरच्या मेयो हॉस्पीटलमध्ये भरती केले. तेथेही ती केस घेण्यात आली नाही. सरकारी डॉक्टर म्हणाले...Sir, Better you shift this baby to any private hospital. Otherwise it's very diffiult to survive this case. तोपर्यंत मी कितीही थकलो असलो तरी नागपूर गाठले होते. मला तेथून माझ्या बेबीची केस मातृसेवा संघ, महाल नागपूर येथे हलवावी लागली. तेथे एक नवीनच डॉक्टर श्री. कोतवाल हे देवासारखे मला भेटले.

ते सुध्दा मला म्हणाले... 'This is a very complicated case, I do my level best to survive your baby but rest will be in the hands of God. मी भितीयुक्त आदराने त्यांना विनंती केली की, Sir, You are the only God to help me at this stage. You please try your level best.

डॉक्टर कोतवालांनी माझ्या बेबीला अथक परीश्रमानंतर वाचवले. लहानशा बाळाच्या नाकातोंडात नळया होत्या. ते दृश्य बिचा-या जन्मदात्रीला ही पहायला मिळत नव्हते. मी मात्र

निरागसपणे ते सर्व पहात होतो. माणूस सकारात्मक असला तर देवही त्यास मदत करतो असे म्हणतात. तिला दुधाचे फिडींग आईच्या शरीराचे होते पण तेही यंत्राव्दारे काढलेले. आईच्या पान्हयाचा स्पर्शही माझ्या कन्यारत्नाला होत नव्हते. एवढी ती दुर्भागी होती. माझ्या लहानशा चिमकुलीला तब्बल एक महिण्यानंतर सुट्टी मिळाली. तिला तोतलाडोह प्रकल्पावर कसे न्यावे हा सुध्दा एक यक्षप्रश्न होता. तो एका गरीब रिक्शावाल्याने सोडवला. प्रथम तो तयार नव्हता पण माझ्या पत्नीच्या तो ओळखीचा निघाला कारण तो तिच्याच गांवचा होता. त्यामुळे हा प्रश्नही सोडवला गेला.

प्रकल्पावर बेबीसह सुखरूप पोहोचल्यानंतर, तिचे संगोपन करून तिला कसे वाढवले याबाबत पुन्हा थोडक्यात पुढील भागामध्ये मी सांगणार आहेच.

****

'Life is full of happiness; be strong and have faith.'- Kareena Kapoor Khan

माझ्या लहानशा चिमकुलीला तब्बल एक महिण्यानंतर सुट्टी मिळाली. डॉ. कोतवालांनी तिला कापसात गुंडाळून दिले. मला तिला घेवून तोतलाडोह या दुर्गम भागात जो प्रदेश नागपूरपासून 72 किलो मीटर आहे. तेथे जायचे होते. कोणीही ऑटोरिक्शा तेवढया दूर जाण्यासाठी तयार होत नव्हता कारण त्यांना तिकडनं येतांना रिकामे वापस यायला लागणार होते. अजून एक अडचण माझ्यासमोर उभी ठाकली होती. मी बायकोला म्हटले, 'आता काय करावे'. ती म्हणाली, 'माझ्या ओळखीचा माझ्या खेडयातील एक महादेव नावाचा मुलगा नागपूरात रिक्शा चालवतो असे मला वाटते'. तो नागपूरात किमान दोन वर्षापासून रिक्शा चालवत असावा असा माझ्या बायकोचा अंदाज होता. नागपूरसारख्या मोठया शहरात जेथे वीस लाखाची लोकसंख्या असेल तेथे केवळ महादेव नावाला शोधणे एवढे सोपे काम नव्हते. मी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. सर्व ग्रूप्सला जेथे रिक्शा थांबायचे तेथे जावू जावून विचारायचो की, कोणी महादेव नावाचा व्यक्ति नागपूरात आहे काय. म्हणतात ना 'ईच्छा तेथे मार्ग' किंवा 'Necessity is the mother of invention'.

माझे प्रयत्न काही अंशी सफल झाले. एकजण म्हणाला... 'साहेब, एक महादेव विदयापीठ परीसराजवळ झाडाजवळ नेहमी उभा असतो'. या महादेवाला शोधण्यासाठी मी तेथे गेलो पण तो नुकताच बाहेर सवारी घेवून गेला होता.

'तो साहेब येथेच येतो' असे तो रिक्शावाला म्हणाला. मी त्याची तब्बल एक तास वाट पाहली आणि तो देवासारखा आला. माझ्या बायकोची मी ओळख दिली. त्याने ओळखले.

' महादेव, आपल्याला तोतलाडोहला माझ्या लहानशा मुलीला घेवून जायचे आहे.'- मी म्हणालो. प्रसंगाचे गांभिर्य लक्षात घेता तो तयार झाला. आमच्या प्रकल्पावर त्यावेळी सरकारी ड्रायव्हर हे चोरून शासकीय गाडयामधले पेट्रोल विकायचे. माझ्याकडे तेथे राजदूत होती म्हणून मी असे पेट्रोल नेहमीच जमा करून ठेवायचो कारण तेथे पेट्रोलपंप नव्हता. माझे हे जमा असेलेले पेट्रोल महादेवला परतीच्या प्रवासात कामात आले. शिवाय मी त्यास न मागता पुरेशे भाडे दिले होते. माझी मुलगी तोतलाडोहला सुखरूप पोहोचली. आमचे सुखाचे दिवस पुन्हा सुरू झाले. त्यानंतरच्या किरकोळ अडचणी आम्हाला संवयीमुळे त्रासदायक वाटल्या नाही.

मुलीला त्यावेळी 'रॅप्टॉकॉस' नावाचे पावडर दिले व माझी मुलगी लवकरच टुणकन फुगली. ती सहा महिण्यात एवढी गोंडस झाली की, माझे मित्र वर्ग तिला दिवसभर खांदयावरच खेळवत असे. असाच एक मित्र जो तिला खांदयावर खेळवत असे त्याचे माझेवर खूपच उपकार आहेत. माझी मुलगी मातृसेवा संघात भरती असतांना हा नागपूरात तात्या टोपे नगरात राहात असे. त्याची माझी फारशी ओळख नव्हती कारण तो नव्यानेच प्रकल्पावर बदलून आला होता. त्याचे नांव प्रभाकर गायकवाड त्याने व त्याचे बायकोने तब्बल 13 किलोमीटर दूर हे हॉस्पीटल असतांना दररोज खाण्याचे डब्याची व्यवस्था केली होती. हे उपकार मी जन्मभर फेडू शकत नाही. त्या वहिनी वास्तविक प्राथमिक शाळेत शिक्षीका होत्या. असेही काही जगात लोकं असतात जे निस्वार्थ बुध्दीने मदत करतात आणि तेही संकटाचे वेळी. हे सर्व मानवी रूपातील देवच असतात.

आता दु:खाचा डोंगर पार झाल्यानंतर मी सुखात जगत होतो. त्यामुळे प्रकल्पावर खूप गंमती घडत गेल्या. त्या हास्यमय जीवनाची थोडीशी झलक मी पुढील भागात सादर करतोच.

****

"The most important thing is to enjoy your life - to be happy. It's all that matters."- Audrey Hepburn

आता दु:खाचा डोंगर पार झाल्यानंतर मी सुखात जगत होतो. त्यामुळे प्रकल्पावर खूप गंमती घडत गेल्या. मित्रांसोबत मौज करण्यासाठी रविवार फिक्स होता. एव्हाना आम्हा सर्व जवळच्या मित्रांचे लग्ने नुकतीच आटोपली होती. सर्वांच्या बायका हया नवीनच प्रकल्पावर आल्या होत्या, मग काय सगळा आनंदी आनंद होता. आम्ही कोण्याही एकाच्या घरी एकत्र जमत असू व सर्वात साधा खेळ म्हणजे 'बीगफूल' खेळत असायचो. खेळतांना आठ जण आणि पत्ते बावन्न. जो 'बीगफुल' झाला त्याचेवर एक किलो मिठाई आम्ही बसवत होतो. नंतर एकत्र जेवण असे मजेत दिवस चालले होते. याच काळात मी जीपचे ड्राईव्हींग शिकलो होतो. प्रकल्पावर टनेलचे काम श्री. आर. जे. शाह यांना देण्यात आले होते. त्यांच्या 'लेफ्ट हँड ड्राईव्ह' जीपवरच मी गाडी चालवायला शिकलो. मला गाडी शिकविली ती डेली वेजेसवर असणा-या मोतीराम ड्रायव्हरने. कंपनीचे फुकट वाहन घेवून आम्ही रविवारी अंबाखोरीला नेहमीच जात होतो.

साईटवर नाय्यर नावचे एक कंपनीचे अभियंता होता. त्यांचे काम व माझी सरकारी कामावर देखरेख. माझी परवानगी लवकर मिळावी यासाठी हा 'नायर' नेहमी मला मलयालम शिकविण्याच्या भानगडीत पडायचा. मला ही 'मलयालम' भाषा शिकण्यात आनंद वाटत होता. तसेही मला बहुभाषेचे वेड आहेच. मी संधी मिळाली की, ती सोडत नसतो. त्या लोकांचे आपापसातील बोलण्यावर माझे बारीक लक्ष असायचे त्यामुळे मला दहा टक्के त्यांची भाषा कळत असे.

'रंड वंडी अवडं पोयो...म्हणजे दोन गाडया कोठे गेल्या एवढे तर कळायचेच. मग ते 'बझारलं पोयी' असे म्हटले की लगेच मला कळत होते की गाडया बाजारात गेल्या आहेत. तर ही भाषेची गंमत करता करता मला ती भाषा लिहिता पण येत होती. आता मात्र विसर पडला आहे. तरी पण नायर सरांनी शिकविलेली एक लहान मुलांची कविता मला अजूनही पाठ आहे. ती सांगतो...

'ओन्नागम कुन्नुमेल, ओराडी कुन्नुमेल,

ओरायिरम किळी कुडूवच्छू...

कुट्टीम् निलाम् किळी ,तामर पै किळी,

तानिरीन्नाड्डुन्न् पोन्नोला'..

आता हे काहीतरी मी फेकलं आहे] असे वाटणे मराठी भाषीकांना साहजिकच आहे. ही कविता तुम्ही कोण्याही मलयालम भाषा जाणणा-या माणसांना गंमत म्हणून विचारा. तुम्हास त्याची सत्यता व माझी अजूनही शाबूत असलेली मेमरी यावर तुमचा विश्वास बसेल. या कवितेच्या अर्थाची उत्सुकताही तुम्हास लागली आहे याची मला जाणीव आहे. अर्थ असा --- 'ओन्नागम कुन्नुमेल, ओराडी कुन्नुमेल, म्हणजे एका पहाडावर दुसरा पहाड आणि दुस-या पहाडावर अनेक पहाड तसेच ' ओरायिरम किळी कुडूवच्छू'...म्हणजे त्यापैकी एका झाडावर ओरायिरम म्हणजहे हजार चिमण्या बसल्या होत्या. 'कुट्टीम् निलाम् किळी ,तामर पै किळी, म्हणजे खोप्यात बसलेल्या सर्व चिमण्यांपैकी एक अतिशय 'तामर' म्हणजे सुंदर पै म्हणजे लहानशी आणि किळी म्हणजे चिमणी,' तानिरीन्नाड्डुन्न् पोन्नोला'.म्हणजे झाडावरील पाळण्यावर झोके घेत होती. असो अशा कितीतरी गंमतीची आठवण मला आजही आहे.

दुसरा नायर सरांचा गुणधर्म असा होता की, आपण सर्वसाधारणपणे आपल्याला आवडणा-या बातम्याच वाचतो पण नाही हे सर काहीतरी विशेष अशी बातमी घेवून यायचे. ते मला एकदा म्हणाले, "सारे (सर), आज 'कॉन्स्टॅटीन चेरनोनकेव्ह' ये रशियाके अध्यक्ष हो गये है... आता मला तुम्ही सांगा की, मला या कॉन्स्टॅटीन चेरनोनकेव्हचे काय काम होते. पण असला विचित्रपणा ते मला नेहमीच सांगायचे. ही गोष्ट 1982 च्या दरम्यानची आहे. माझ्या स्ट्राँग मेमरीतून या गोष्टी अजूनही निघाल्या नाहीत हे या प्रसंगांचे वैशिष्ठय होय. मी त्यासाठीच तर हे सर्व सांगण्याचा उपद्व्याप केला.

पेंच नदीत मात्र पोहण्याचा कार्यक्रम कधीच केला नाही. ती एक पहाडी नदी असून तिचा प्रवाह ईतका तेज होता की, एकदा धरणावरील मध्य भागात स्थित असलेली अख्खी मोठी क्रेन पावसाळयामध्ये कशी वाहून गेली, हे कोणासही कळले नाही. एवढी मोठी क्रेन नदीत गायब व्हावी हे कसे झाले हे शोधण्यासाठी कन्हान नदीपर्यंत शोध घेतला पण कोणासही त्या मोठया क्रेनचा लहानसाही तुकडा सापडू शकला नाही. अजून एक घटना पावसाळयात घडली होती ती मी तुम्हास थोडक्यात सांगतो आणि या भागाला संपुष्टात आणतो.

भर पावसाळयात दोन मजूर दुपारी नैसर्गिक कॉलसाठी नदीच्या मध्यभागी गेल्या होत्या. अचानक नदीला मोठा पूर आला. मध्यभागात उंचवटा होता व दोन झाडे पण होती. त्या तेथेच अटकल्या. रात्रभर पाण्याची पातळी वाढत होती. त्या तशा तशा मोठया हिंमतीने दगडावर चढत होत्या. सर्वांची त्यांना वाचवण्याची धडपड चालली होती पण Every efforts was in vain at that time. दुस-या दिवशी ही बातमी 'हितवाद' न्यूजपेपरला आली की, 'two women

stranded in Pench river'. त्या बाया मात्र एवढया हिंमतबाज होत्या की, जसजसे पुराचे पाणी वाढत होते तसतशा त्या झाडावर चढल्या पण हिंमत हारल्या नाहीत. ईकडे सरकारी यंत्रणा हेलीकॉप्टर बोलवावे यासाठी प्रयत्नशील होतेच पण ती व्यवस्था होवू शकली नाही. शेवटी रात्री बारानंतर पूर ओसरू लागला. तसेही पहाडी नदयांचे पूर हे लवकरच ओसरत असतात. एक रात्र पूर्ण त्या बायांनी तेथेच काढली. दुसरे दिवशी ट्रक टायरच्या सहाय्याने त्यांना सुखरूप बाहेर काढण्यात आले. वाऽरे नशीब गरीबांचे बलवत्तर की, परमेश्वराने त्यांना वाचवले. ही चित्तथरारक गोष्ट माझे जीवनाशी फारशी संबंधीत नाही तरी सुध्दा मी तुम्हाला सांगण्याचा हेतू एवढाच की, "हिमत ये मर्दा तो मदत ये खुदा", या वाक्याची प्रचिती मात्र मला आली.

याच काळात चार वर्षे सर्व्हीस झाल्यावर एक महत्वाची घटना घडली. मी प्रकल्पावर होतो त्यामुळे भावी जीवनासाठी काही तरतूद करावी असे माझ्या मनात कधीच येत नव्हते पण माझ्या पत्नीचे मोठे बंधू श्री. सुभाषराव कोल्हे यांनी मला एक प्लॉट वर्धा येथे घेण्याचे सुचविले. ते पोद्दार या व्यक्तिने वर्धेला नव्यानेच पाडले होते. ते मला किस्तीने मिळणार होते. मी या प्लॉटसाठी होकार दिला व आमच्या जीवनातला पहिला प्लॉट विकत घेतल्या गेला. पुढे तोच विकून मी अकोला परीसरात एक खेमका मेंन्शनमध्ये फ्लॅट घेतला होता. हे श्री. सुभाषराव हयांचे उपकार कधीही विसरू शकणार नाही.

पाहता पाहता प्रकल्पावरचे सात वर्षाचे जीवन संपले आणि आता सरकारी नियमानुसार माझी बदली होणे साहाजिकच होते. तसाही मला तेथे कंटाळा आलाच होता. माझ्या काही मित्रांनी अतिरीक्त पैशाची तडजोड कररून स्वत:ची बदली करून घेतली पण मी आपला जास्तच ईमानदार असल्याने माझी पैसे खर्च करण्याची ताकद नव्हती कारण मी कधीच अतिरिक्त पैसा कमावला नाही. हा माझ्या जीवनातला अशक्त मुद्दा आहे.

मग माझी बदली बिना पैशाने कशी झाली किंवा मी त्या प्रकल्पावरून शिक्षा म्हणून कसा फेकल्या गेलो, हे अर्थातच पुढील भागामध्ये आपणास वाचावयास मिळेल.

****

7. नोकरीची व्यथा

" शासन बदली नित्य बाब ही असते दु:खाची..

नोकरी ही मुळातच कधी नसते सुखाची...-- प्रकाश राऊत

मला सात वर्षे प्रकल्पावर झाली होती. 1984 ला मी बदलीस पात्र होतो. सर्वांनी आपापली पैसे देवून योग्य ती स्थळे निवडून घेतली होती पण मी पडलो साधा अभियंता. "जिसका कोई नही उसका तो खुदा है यारो." या तत्वावर चालणारा मी. एक दिवस अधिक्षक अभियंता टनेलच्या आंत अचानक आले. त्यांनी टेलरेस टनेलवर चालू असलेले कॉंक्रीटचे काम पाहले त्यांना वाळूमध्ये पेबल्स आढळले. ते माझ्यावर जाम चिडले आणि म्हणाले, 'तुम्ही या कार्यक्षेत्रावर काय पहात असता की फक्त झोपा काढता.' मला त्यावेळी याचीही कल्पना नव्हती की, हे मोठे साहेब आहेत. कारण कार्यकारी अभियंत्याच्या वरच्या पदावर असणारे अधिकारी कधीही साईटवर येत नसत. मी फक्त एवढेच बोललो... 'सर, वाळू गाळायला चाळणी मागविली आहे. लवकरच वाळू गाळूनच वापरण्यात येईल.' हे ऐकूण ते जाम संतापले व म्हणाले, 'कोणाशी बोलतो आहेस कल्पना आहे काय तुला?

मला खरंच कल्पना नव्हती. लगेच त्यांनी मला कार्यकारी अभियंत्याच्या माध्यमातून एक लेखी मेमो दिला. व याची परिणती अशी झाली की, माझी त्या तोतलाडोहच्या ॲप्रोच टनेल साईटवरून तातडीने बिना पैशाने बदली झाली. ती सुध्दा खूप लांब म्हणजे अकोला येथे तब्बल 330 किलोमीटरवर. त्याचे विभागीय कार्यालय मात्र अमरावतीला होते. मी तेथे गेलो. माझी गाठ अत्यंत कडक स्वभावाच्या महेंद्रकर साहेबाशी पडली. मला ते म्हणाले, 'बोल तुला काय पाहिजे कारण आपले एक सबडिव्हीजन औरंगाबादला पण आहे'.

आता मात्र मी मानसशास्त्राचा वापर केला. मनात ठरवले की, हे साहेब मला मागितलेले स्थळ थोडीच देणार आहे. आपण लांबचीच जागा मागावी. मी औरंगाबाद मागितले. त्यांना असे वाटले की, याचे कोणी नातेवाईक तेथे असावे असे समजून त्यांनी मला अकोला दिले. माझी सायकॉलॉजीकल आयडिया फलद्रूप झाली. मी अकोला येथे जलविदयुत प्रकल्प उपविभाग क्रमांक 4 ला जॉईन झालो. त्या
ठिकाणी मला शहर मिळाल्याचा आनंद झाला पण मला पुन्हा दोनशे किलोमीटर दूर अशी चिखलदरा साईट देण्यात आली. साईट दूर होती. तेथे मला एक नवीन जलविदयुत प्रकल्पाचे संशोधन करायचे होते. मी आणि माझ्या टीमने मिळून उदंचन योजना (Pumped Storage Scheme) प्रस्तावीत केली. या उपविभागात माझे जीवन खूपच सुखात गेले कारण मला श्री. वसंत चोपडे हे चांगल्या स्वभावाचे उपवि भागीय अधिकारी भेटले. त्यांनी मला लहान

भावाप्रमाणे ट्रीट केले. कधीही जीपमध्ये चिखलदरा जातांना जीपच्या मागे बसवले नाही. यावेळी मी शाखा अभियंता झालो होतो. आता अकोला येथील सुखाच्या गोष्टी सांगण्यापूर्वी तोतलाडोहला माझी कन्या जिचे नांव मी मृदुला ठेवले होते तिच्या जीवनाविषयी थोडेसे सांगतो.

22 एप्रिल 1981 ला मृदुलाचा जन्म कशा पध्दतीने झाला हे मी यापूर्वी आपणास मागील प्रकरणात सांगितले आहेच. पाहता पाहता ती तीन वर्षाची झाली होती. तिला एका लहानशा कॉन्हेंटमध्ये टाकण्यात आले होते. ठुणक ठुणक चालत ती त्या शाळेत जात होती. तिची मॅडम 'कॅरोलाईन लिट्टल' ही ख्रिश्चन होती. एक दिवस तिचे पती 'क्रिस जी लिट्टल' हे मॉरीशसवरून तोतलाडोहला आले होते. त्यांना ईंग्रजीशिवाय दुसरी भाषा येत नव्हती. म्हणून त्यांची माझ्याशी मैत्री झाली. मी थोडाफार ईंगजीत बोलू शकत असे. मला ईंगजीचा छंद आधिपासूनच होता. मी तोतलाडोहला असतांना 'हितवाद' या ईंगजी वृत्तपत्रामध्ये 'लेटर्स टू एडिटर्स' या कॉलममध्ये लिहित असे. माझी लेखकीय सुरूवात तेथूनच झाली होती.

माझा क्रिसशी सहवास आल्यामुळे फॉरेनर कसे ईंग्रजी बोलतात, हे मला कळले. व मी सफाईदार ईंगजी बोलायचे शिकलो. केवळ ऑब्सर्व्हेशन मुळे चांगले ईंग्रजी बोलता येते याचा मला चांगला अनुभव आला. त्यांचे मला मॉरीशस वरून बरेचदा पत्र यायचे. ते नेहमी त्यांचा मुलगा कॉनीरॅडशी ईंगजीतच बोलायचे ते पाहूनच मी अस्खलीतपणे ईंग्रजीत बोलायला शिकलो.

मी मलयालम,मराठी, हिंदी, ईंग्रजी,उर्दु असा काहीसा बहूभाषिक झालो. या प्रकल्पावर मी माझ्या बायकोसोबत चार वर्षे घालविली. संसार नव्यानेच केला. तिचे सहकार्य मला कधीही न विसरता येण्यासारखे आहे. आमच्या घरी त्यावेळी पूर्णवेळ तिने वातीच्या स्टोव्हवर स्वयंपाक केला. घरात जुजबीच वस्तू होत्या. कमी वस्तूतही संसार निट होवू शकतो हे तिने दाखवून दिले. लहानशी मृदुलाला घेवून मी अकोला येथे बदलीवर आलो होतो. मुलीला चंद्रशेखर गाडगीळच्या हिंदू कॉन्हेंटमध्ये के. जी. वन ला टाकले. मी आदर्श कॉलनीमध्ये रहायसाठी एक तीन रूमचे घर भाडयाने घेतले होते. अकोला येथे मला क्वार्टर मिळू शकले नाही.पण चिखलदरा साईट मिळाल्यामुळे मी फारच खूष होतो. या ठिकाणी माझे शालेय जीवन पार पडले होते. मी 1967 ते 1972 असा काळ या शालेय जीवनात आनंदात व मित्रपरीवारात घातला होता त्या बाबीची प्रत्येक आठवण माझी ताजी होणार होती. आता पुढील भाग क्रमांक 21 मध्ये मी चिखलदरा साईटचे जीवन कसे मजेत घालवले ते सांगणार आहेच. तव्दतच माझ्या संसारात झालेली वाढ आणि अत्यंत महत्वाची बाब म्हणज माझ्या व्दितीय मुलाचा अकोला येथे जन्म. या सर्व पुढील आनंदमय जीवनाचे कथन पाहू या पुढील भागामध्ये तोपर्यंत तुम्ही ही सिरीज वाचत रहा. अजून ब-याच गंमती जमती येणार आहेत. काही धोकादायक व रहस्यमय गोष्टी जीवनात कशा घडतात याचे चविष्ट वर्णनासाठी थोडीशी वाट पाहाणे जरूरी आहे.
सर्व वाचकांचे आभार मानून या भागाची मी सांगता येथेच करतो.

"No one can make you happy, untill you are happy with yourself first".- www.yourpositiveOasis.com

बदल्याच्या भावनेने का होईना पण शासनाने माझी बदली अकोला येथे फायनल केली. मला अकोल्याच्या कार्यालयात रूजू होणे आवश्यकच होते. तोतलाडोहला लायब्ररी नव्हती म्हणून मी तेथे लिखाणाला सुरूवात केली होती. आता मात्र मोठया शहरात माझी खूप वाचनाची भूक येथे क्षमणार होती, असे गृहीत धरून मी वाचनालय शोधण्याच्या भानगडीत प्रथम पडलो. मला वाटले की, "The only thing that you absolutely have to know, is the location of the library."- Albert Einstein. या वाक्याची आठवण झाली.

ग्रंथ हा माझा जीवनातला अतिशय आवडता विषय. माझ्या प्रोफाईलवर "ग्रंथ हेच जीवन" असे लिहिलेले आहे. मला अगदी लहानपणापासून पुस्तकांची एवढी आवड आहे की ते मी शब्दात सांगूच शकत नाही, असो माझे प्रेम मात्र लायब्ररीवरच खूप आहे.

मी अगदी लहान होतो तेंव्हा माझे वडील हे प्रायमरीचे मुख्याध्यापक असल्याने त्या शाळेत फार कमी पुस्तके होती पण बाबा जवळच्या शहरातून सायकलने जावून पुस्तके आणायचे व त्यांची वाचनाची हौस पूर्ण करायचे. त्यावेळी मी खूप लहान म्हणजे तिस-या मराठी वर्गात शिकत होतो. वर्ष होतं 1963. मला थोडं थोडं आठवतं की ते एक जाडे पुस्तक वाचत होते. त्यावर लिहिलेले होते,"कात टाकलेली नागीन". माझ्या स्मरणशक्तिनुसार ती कादंबरी श्री.पां.श्रा.गोरे यांची असावी असे वाटते. तेंव्हा पासूनच मलाही वाचण्याची आवड लागली असावी. मी वाचनालय शोधले. वाचनालयाचे नांव होते 'बाबूजी देशमुख वाचनालय'.

वाचनाची थोडी लहानपणीची पार्श्वभूमी सांगायचे असल्यास ती खालीलप्रमाणे.1972 च्या जुलैमध्ये माझे बाबा प्रायमरी मुख्याध्यापक नोकरीतून सेवानिवृत्त झाले व आमची गरीबीची कळा वाढली. मला वाचनाचा खूपच छंद होता पण बाबांनी साधं हिंगणघाट नगरवाचनालयाची फी दिली नाही. त्याकाळात टपरीवर हिंदी पुस्तके वाचावयास मिळायची. चार आणे (आजचे 25 पैसे Outdated coin) दिले की एक हिंदी कादंबरी फक्त एक दिवसासाठी मिळायची. दुसरा दिवस लागला तर जास्त पैसे पडायचे मग काय एक कादंबरी एकाच दिवसात पूर्ण वाचून मी

परत करीत असे. गरीबीही माणसांकडून जास्त वाचन करून घेत असल्याचे प्रत्ययास आले. मी गुलशन नंदा यांचे 'घाट का पत्थर' ज्यावर 'खिलौना' पिक्चर निघाला होता. तसेच "झील के उस पार" अशी जवळजवळ तीस पुस्तके गुलशन नंदाचीच वाचून काढली होती. त्यानंतर रानू हा लेखक माझा आवडीचा ज्यांची "पूजा" ही कादंबरी आजही माझ्या पूर्ण लक्षात आहे. ज्यामध्ये एका नर्सला देवतासमान मानून त्यांनी लिहिली होती. ओमप्रकाश शर्मा, सुरेंद्र मोहन पाठक, राजहंस अशी कितीतरी नावे माझ्या आजही स्मरणात आहेत. आजही त्यांची पुस्तके आहेत पण त्यांच्या नावे दुसरेच लिहीत आहेत. जसे रानूच्या ऐवजी सरला रानू पण ती मजा येत नाही.

गेला तो काळ. गरीबी असूनही प्रचंड वाचनाचा आणि आजचा काळ लक्षात घेतला तरी संगणकांमुळे कितीतरी सुविधा उपलब्ध असून आजची पिढी व्हाट्स ॲप, यू टयूब, फेसबुक, व्टिटर व टीव्हीमध्ये मग्न आहे.

सांगण्याचं तात्पर्य असे की, खरंच वाचनाची आवड असेल तर आजही किंडल रीडर, कोबो रीडर, रीडव्हेअर, न्यूजस्टँड, ॲडोबी रीडर, हेड वे रीडर, ब्लिंकीस्ट रीडर, प्रतिलीपी रीडर असे कितीतरी ॲप्स उपलब्ध आहेत. ज्यामध्ये पुस्तकांचं वाचन तळहातावर होवू शकते.

बाबूची देशमुख वाचनालय म्हणजे माझ्यासाठी 'वाचन साक्षात्कार'. या वाचनालयाची स्थापना 1867 ला झालेली असल्याने या वाचनालयात मला अत्यंत दुर्मीळ अशी पुस्तके वाचावयास मिळाली. हे वाचनालय जगातलं सर्वात स्वस्त वाचनालय असले पाहिजे असे मला वाटते कारण या वाचनालयाची फी पाहून आपणास ही आश्चर्य वाटल्याशिवाय राहणार नाही. या वाचनालयाची फी सन 1985 ला होती 25 पैसे महिणा. बार महिण्याचे केवळ तीन रूपये. पण पाच वर्षाची फी रूपये पंधरा ही एकाच वेळी भरावी लागत असे. तरी सुध्दा ही रक्कम काही जास्त नव्हती. त्यावेळी माझा पगार 1600 रूपये होता व सर्वसाधारण हिंदी पॉकेट बुक्स दहा रूपयाला एक असे मिळत होते. आजही या वाचनालयाची फी फक्त तीन रूपये महिणा अशी आहे.

या वाचनालयाची एक गंमत सांगतो. मला खूप जुनी पुस्तके वाचायचा त्यावेळी छंद होता. तेथे मी " The Complete works of Swami Vivekananda या पुस्तकाची मूळ प्रत जी 1920 ला प्रकाशीत झाली होती ती पूर्ण वाचून काढली होती. मला मोठ्या मुश्किलीने ते पुस्तक देण्यात आले होते. "ईच्छा तेथे मार्ग" या उक्तिनुसार वाचनालयात मला एक वाचन साक्षात्कार झाला. याचा एक गंमतीदार अनुभव मी सांगतो. मला याज्ञवल्क्य ऋषींचे मुळ बृहदारण्यक

उपनिषद वाचायचे होते. वाचनालयाची एक खोली अशी होती की त्यात खूप जाळे लागले होते त्यामुळे कोणालाही त्या खोलीमध्ये जाण्याची परवानगी नव्हती पण मी आग्रह धरून त्या वाचनालयाच्या माणसाला पटवले व मला प्रवेश मिळाला. तो बोलला... "हजारो पुस्तकांमध्ये तुम्हाला खरंच सदर पुस्तक सापडणार आहे कां" ? मी सहज म्हणालो की ईच्छा असेल तर सर्वकाही शक्य असतं. आणि खरंच मी आत जावून, जाळे ओलांडून ज्या पुस्तकाला हात लावला होता तेच पुस्तक याज्ञवल्क्य ऋषींचे मुळ ‘बृहदारण्यक उपनिषद’ निघाले. म्हणून मी त्या वाचनालयाला माझा "वाचन साक्षात्कार" मानतो. ही सत्य घटना आहे यामध्ये जराही अतिशयोक्ति नाही.

असाच प्रसंग अजून एकदा घडला. मला मामासाहेब दांडेकरांचीच म्हणजे शं. वा. दांडेकर यांची ज्ञानेश्वरी वाचायची होती. त्यावेळी माझे जलविदयुतचे उपविभाग कार्यालय हे सेवानिवृत्त जिल्हाधिकारी श्री. देशमुख यांचे बंगल्यात भाडयाने होते. ही गोष्ट अकोला गौरक्षण रोडवरील आहे. पण कर्मधर्मसंयोगाने त्यांचे निधन झाले असल्याने त्यांच्या सुविदय पत्नी श्रीमती सिंधुताई मला बोलल्या की... "जर तुम्हाला खरंच वाचनाची आवड असेल तर मी हा ग्रंथ तुम्हास देतो." पण अट अशी की हा ग्रंथ केवळ पंधरा दिवसात वापस करा. पंधरा दिवसात 1200 पानाचा ग्रंथ वाचून काढायचा म्हणजे माझी अग्नीपरीक्षाच होती. मला आजही आठवते की या ग्रंथाची प्रस्तावनाच 125 पानाची आहे मग तो सुरू होतो. अशा प्रचंड वाचणाच्या आठवणी मी केवळ तुम्हास यासाठी सांगतो आहे की, जीवनात तुम्हाला पण माझ्यासारखी वाचनाची आवड निर्माण व्हावी. मी तो ग्रंथ खरंच पहाटेचा वेळ काढून चवदा दिवसात पूर्ण केला. ईतकेच नव्हे तर हे त्या माऊलीला खरे वाटावे यासाठी दिनांक,वेळ, व पेजेस याचा तपशीलही असलेला कागद त्यांच्या ग्रंथात ठेवला होता.

या वाचनालयातील 310 ग्रंथ मी 1985 ते 1994 या नऊ वर्षाच्या काळामध्ये वाचून काढली होती. म्हणजे सरासरी 34 ग्रंथ एका वर्षाच्या कालावधीत. या अकोल्यात मला वाचनाचे सुख कसे मि ळाले त्याचे सवि स्तर वर्णन या भागात आले आहे. आता पुढील भागमध्ये मी साईटचे जीवन व कौटुंबि क जीवन याची सांगड घालत अकोल्याचे अकरा वर्षे कशी घालवि ली हे सांगेन. तर मित्रांनो माझ्या आत्मकथनाचा पुढील भाग वाचण्यास विसरू नका.

****

"Live for the moments you can't put into the words.- Inspirational Quotes.(Ref:- internet)

अकोल्याचे जीवन मी अकरा वर्षे घालवली. ती सर्व अत्यंत आनंदात. कार्यालयातील सर्व सहकारी अभियंता मित्र फारच चांगल्या स्वभावाचे मिळाले. हा कालावधी जाणवला नाही. काळ कसा निघून जातो तो सुखात असल्यावर कळत नसतो. अल्बर्ट आईन्स्टाइन म्हणतात की, 'प्रेमाचे क्षण लवकर जातात व गरम तव्यावर बसलेला चटका सेकंदासाठी असला तरी तो एक तास बसल्यासारखा जाणवतो'. याच शब्दात त्यांनी त्यांचे बायकोला सापेक्षतेचा नियम समजावून सांगितला होता.

मित्रांमध्ये गोविंद बाजोरिया, सुभाष मोहोकार, अनंत गोरडे. सरोदे, ईत्यादी मित्रांचा सहवास मी कधीच विसरू शकत नाही. एखादया संगीतकाराच्या जोडीत जसा जोडीदार लाभतो तसा मला सुभाष मोहोकार हा मित्र भेटला होता. आमची काम करण्याची जुगलबंदी ईतकी फास्ट होती की, आम्ही दोघे नदी गाळाचा किचकट तांत्रिक अभ्यास व संशोधन अगदी सलग करायचो. त्या काळात संगणकाचा वापर फार केल्या जात नसे त्यामुळे आम्ही दोघे कॅलक्युलेटरवर खूप फास्ट काम करायचो. ईंजिनियिरींगचे काम आम्ही कठीण असूनही हसत खेळत करीत होतो. सुभाष हा तर असा आहे की, कोणत्याही बाबीवर पोट दुखेपर्यंत हसत असे. बाजोरिया ही व्यक्ति आमच्यासाठी विनोदमूर्ती होती. राठोड हया मित्राने तर मला ईतकी मदत केली की अकोल्याला पहिले गॅस कनेक्शन त्यानेच मला दिले पण आज तो या जगात नाही कारण त्याचा अत्यंत कठोर अशा बस दुर्घटनेत मृत्यू झाला. ती एक वेगळीच घटना आहे. तो ही साईटवरून परत येत असतांना. माझ्याकडे थोडीफार कमाई होईल अशी साईट होती पण कोणी कधीही माझा हेवा केला नाही. कारण त्यांना माहित होते की डिपार्टमेंटमध्ये आलेला पैसा हा बाहेरच कोणत्या ना कोणत्या रूपाने बाहेर जात असतो. कालांतराने मी ती साईट सोडली होती व सुखाचे कौटुंबिक जीवन जगलो. एव्हाना माझी मुल्र् गी मृदुला ही कॉन्हेंट सोडून मराठी

शाळेत गेली होती. तिचा कल मराठीकडे फार होता. 1981 च्या तिच्या जन्मानंतर सहा वर्षाने मला सुखी संसारामुळे दि.7.05.1987 ला मुलगा झाला होता. अत्यंत भाग्यवान अशा मुलाने माझ्या पत्नीच्या पोटी जन्म घेतला. मुलाचे पाय पाळण्यात दिसतात असे म्हणतात त्याची जाणीव आम्हा दोघांनाही त्याचे जन्माचे वेळी झाली. त्याचा जन्म डॉ. निकते हॉस्पीटलमध्ये मी आदर्श कॉलनीत असतांना झाला.

तो लहानपणापासून अत्यंत बुध्दिवान असल्याचे जाणवत असे. त्याचे बालपण आम्हाला कसे निघून गेले, हे सुध्दा जाणवले नाही. त्याची एक खासियत होती की, तो कोणाचीही नक्कल लहानपणी हूबेहूब करायचा. मी त्याला या बाबीसाठी नेहमी हटकत असे. एकदा त्याने रिक्शावाल्याची नक्कल, तो कसा रिक्शा चालवतो हे केले होते. तेंव्हा मी म्हटले होते की, गरीबांची अशी चेष्टा करू नये कारण तीच परिस्थिती आपल्यावरही येवू शकते. तो बोलला.. 'कशी काय?' मी म्हटले, 'जर तू अभ्यास केला नाहीस तर तूलाही असाच रिक्शा चालवावा लागेल. तो हट्टी होता. तो शाळेत पण जायचा कंटाळा करायचा. त्याची आई मला वेळ नसल्यामुळे त्याला शिकवत होती आणि तो त्याचे आजीला शिकवत असे. आजी वर जे काही फिरत आहे त्यास पंखा म्हणू नये त्याला एफ ए एन फॅन म्हणावे. या पोराला चांगली शाळा प्रथम मला मिळाली नाही. त्याला साध्या पीकेव्हीच्या छोटयाशा कॉन्हेंटमध्ये टाकले. तेथे चांगल्या दर्जाचे शिक्षण नव्हते. खूप प्रयत्न करून आम्ही उभयतांनी फक्त एक हजार चारशे पगार असतांना चार हजार रूपये त्याचेसाठी काटकसर करून जमा केले. त्याला ज्युबीली कॉन्व्हेंट मध्ये तरी ॲडमिशन मिळावी हा हेतू होता पण तेथे ही अपयश आले. त्यानंतर मी कार्मेल कॉन्हेंटमध्ये त्यास टाकण्याचा प्रयत्न केला. तेथे डोनेशन फार होते. पण शाळा अतिशय दर्जेदार होती. त्यावेळी माझे एक दूरचे नातेवाईक श्री विधळे साहेब हे अकोला येथे तहसील कार्यालयात उपविभागीय अधिकारी म्हणून आले होते. त्यांच्याकडे जावून वारंवार विनंती केली. शेवटी त्यांनी मला माझ्या मुलाला म्हणजे आशयला कार्मेल स्कूलमध्ये ॲडमिशन मिळवून दिली. तो आधीच हूशार असल्यामुळे चांगली प्रगती झाली. काळ थोडासाही सुखाचा आला की, संकटाची नजर त्यास लागत असते असे म्हणतात. ईकडे माझी मुलगी मृदुला सहावीत गेली होती. व आशय दुस-या वर्गात ईंगजी शाळेत होता.

तिकडे साईटवर एक वेगळीच घटना घडली. माझा साईटवरचा चार्ज माझ्या बाबत काही आरोपात्मक रचना करून काढून घेण्यात आला होता. मी स्वत: तसाही त्या साईटवर कंटाळलो होतो. कारण उत्पन्न कमी व जबाबदा-या जास्त. शिवाय दोनशे किलोमीटरवरची साईट

अकोल्यावरून वारंवार अटेंड करणे फार कठीण जात असे. त्यातल्या त्यात तो चिखलद-याचा घाटाचा बसचा प्रवास. काही काळ गेला की, जीवनात बदल हा आश्यकच असतो. माझा चार्ज काढून घेण्यात आला व नेमका त्याच काळात ज्या अभियंत्याने पैशाच्यालोभाने माझी साईट हिसकावून घेतली होती त्याचा केवळ दोन वर्षाच्या काळात मृत्यू झाला. आणि परत ती साईट माझ्याकडेच आली होती.

साईटवर अशा अनेक घटना घडत असतात. एकदा तर मला दातपाडी नदीत सर्व्हे करीत असतांना रायमुन्याच्या काटयामध्ये एका अजगराने एका घोरपडीला पकडून ठेवलेले दृश्य दिसले. माझा लेबर दगडू याने त्या अजगराला विनाकारणच छेडले. प्रकार असा घडला की, त्या अजगराने पकडलेल्या घारपडीला तर बेशुध्दावस्थेत सोडून दिले व चटकन आम्ही सर्व्हे करीत असलेल्या नदीमध्ये उडी घेतली. आम्ही धड वरही जावू शकत नव्हतो कारण नदीचा काठ उंच होता व रायमुन्याच्या काटया भयाण होत्या. नदीतही पळायला जागा नव्हती कारण नदीमध्ये गुढघ्याभर पाणी होते. आमची पळता भूई थोडी झाली. नशीब आमचे की, त्या अजगराला दगडूने दगडाच्या सहाय्याने नेम धरून मारून टाकले. जेंव्हा आम्ही त्या मृत अजगराची लांबी आमच्या सर्व्हे स्टाफने मोजली तेंव्हा ती तब्बल 12 फूट भरली. त्यादिवशी जर दगडूसारखा खमक्या मजूर नसता तर आमची वाटच लागली असती.

यावरून एक गोष्ट सिध्द झाली की. कधीही कोणाविषयी वाईट व तेही खोटे सांगून पैसा मिळविण्याचा प्रयत्न करू नये. आपल्या नशीबात जे असतं तितकंच आपल्याला मिळत असतं. अन्यथा दुर्घटना होण्यास वेळ लागत नसतो.

अजून एक घटना. पावसाळयाचे दिवस होते. दातपाडी नदीला साधारण पूर आला होता. त्यावेळी दातपाडी नदीजवळ बागलिंगा नावाचे गांव होते. तेथे माझा पुतण्या चिं. Pravin हा प्रकल्प पहाण्यासाठी आला होता. आम्ही एका जवळच्या शेततळयाजवळ मनोहारी दृश्य पहाण्यासाठी गेलो असता हया प्रविणला पोहोण्याची ईच्छा झाली. त्याला तेथील खोल पाण्याचा अंदाज आला नाही व तो विनाकारण पलीकडच्या काठावर गेला व तेथून परत येतांना मात्र मध्येच थकला. मग काय त्याने तलावात खाली पाय न पुरल्यामुळे स्वत:चे अंग तलावात सोडून दिले. तो बुडायला लागला होता. बरं झालं जवळच एक गावातील मुलगा अनायासेच त्या तलावात पोहत होता अशा त-हेने त्याचा त्या दिवशी प्राण वाचला. नाहीतर फार मोठा अनर्थ त्या दिवशी घडला असता.

त्यानंतर माझी बदली परत अमरावती येथे शहरात संकल्पचित्र (डिझाईन) ऑफीस मध्ये झाली. मला या ठिकाणी चिखलदरा उदंचन योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम देण्यात आले. मी ते लवकरच यशस्वीरित्या पार पाडले. अमरावतीचे 1995 नंतर जीवन कसे घालवले व मला प्रचंड वाचनाची या जागेवर कशी संधी मिळाली याचे वर्णन अर्थातच पुढील भाग क्रमांक 23 मध्ये येणार आहेच. तोपर्यंत सर्व वाचकांचे पुन:श्च आभार. या ठिकाणी माझे वय चाळीस झाले आहे.

****

' A room without book is like a body without soul'.- Cicero

माझी बदली परत अमरावती येथे शहरात संकल्पचित्र (डिझाईन) ऑफीस मध्ये झाली. मला या ठिकाणी चिखलदरा उदंचन योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम देण्यात आले. मी ते लवकरच यशस्वीरित्या पार पाडले. या कामाव्यतिरिक्त मला ऑफीसमध्ये दुसरे काम नव्हते. मला अतिरिक्त वाचनासाठी खूप वेळ मिळत असे. याचा मी खूप फायदा घेतला.

लगेचच अमरावतीला आल्याबरोबर नगर वाचनालय लावले. या शिवाय सायबर कॅफेवर जावून बरीच पुस्तके गोळा करणे हा तर मला छंदच जडला होता. याच काळामध्ये माझी एका विजय कुळकर्णी नावाच्या मित्राची ओळख झाली. तो आमच्या कार्यालयात येवून प्रायव्हेट टायपींगची कामे घ्यायचा. पण त्याचा एक चांगला गुण असा की, तो कोणालाही स्वत;जवळची पुस्तके वाचायला दयायचा. ईतकेच नव्हे तर एखादा व्यक्ति पुस्तक नक्कीच वाचतो की नाही, याचा सुध्दा आढावा घ्यायचा. म्हणजे थोडक्यात तो पुस्तक घेणा-याला रोज विचारायचा की तुम्ही किती पाने वाचलीत. या त्याच्या चांगल्या गुणधर्मामुळे मी त्याचेजवळ असलेले स्वामी विवेकानंदाचे पूर्ण खंड वाचून काढले. आता तर तो माझा जिगरी दोस्तच आहे.

आमच्या संकल्पचित्र आफीसमध्ये जवळपास अकरा विधवा महिला होत्या. त्यांची सर्वांची मने एकसारखी असल्याने एखादे वेळी काही कारणास्तव कोणी नयनाश्रू गाळले तर सर्वच महिला या अश्रूगाळण कार्यक्रमात भाग घेत असे. प्रत्येक महिलेचं वैशिष्ठय मात्र वेगळे असायचे. मी त्यांना सांत्वन देण्याचा अल्पसा प्रयत्न करीत असे पण ही बाब माझ्या कधीकधी

अंगावर येत असे. मला गाण्याचा छंद होता. मी बरेचदा कार्यालयातच गाणे गुणगुणत असे. ते सर्वांना माझ्या गोड आवाजामुळे खूप आवडत असे. अशातच मला अजून एक मित्र भेटला.

त्यांचे नाव श्री. श्याम कारंजकर. ही व्यक्ति 'हेड ड्राफ्ट्समन' म्हणजे मुख्य आरेखक होती. ईंग्रजीत अगोदर व नंतर मराठीत सांगण्याचा हेतू एवढाच की, 'वज्रचूर्ण' म्हणण्यापेक्षा 'सिमेंट' म्हटलेले बरे असे मला वाटले. हयाची माझ्याशी ओळख पुढे पुढे भारीच झाली कारण तो माझ्या आवाजाची स्तुती करायचा पण त्याचाही आवाज छान होता. तो गाण्याचे लिरीक्स लिहून आणायचा व मी आणि तो सोबतच गाणे म्हणायचो. त्याला लिहायचा एवढा छंद की, एकदा त्याने कार्यालयातच एक हस्तलिखीत साप्ताहिक काढले होते. केवढा त्याचा उत्साह. विनोद बूध्दी तर ईतकी भारी की, तो मला भडकवून दयायचा आणि मी मोकळया मनाने खूप विनोद निर्मिती करत होतो. मग ते विनोद कधी कधी तर सभ्यतेची पातळी पण ओलांडत होती. जशी जशी सभ्यता खाली जात होती तसा महिलांना राग येण्यापेक्षा थोडा थोडा आनंद वाटत असे. याचाच फायदा उचलत मी नंतर महिला मंडळात प्रसिध्द म्हणा की प्रसिध्दला कु लावा पण एकंदरीत डिझाईन ऑफीसचे जीवन मी तब्बल दहा वर्षे खूप आनंदात व अतिवाचनात घालवली. विजय कुळकणी व श्याम कारंजकर यांची मैत्री माझी बदली परत अकोला येथे गेल्यावर तुटेल अशी पुसट शंका मला आली पण ती मैत्री मी बदलून गेल्यानंतरही तशीच नव्हे तर त्यापेक्षाही जास्त घट्ट झाली हे आमच्या मैत्रीचे वैशिष्टय होय. ही मैत्री अजूनही तशीच आहे. 'विजू आला शुक्रवारी' ही आता मी आणि श्याम याचेसाठी म्हण झाली आहे. कारण तो शुक्रवारी आला की, कोठेतरी किमान अंडाकरीचा कार्यक्रम होणार आहे हे जवळपास निश्चितच असते. मग या अंडाकरीला श्याम हळूच मटनाची जोड देतो व तो प्रोग्रॅम यशस्वी होतो. तीर्थ प्राशन ही क्रिया ऐच्छिक व वैयक्तिक असते. माझ्यात असलेले गुण गाणे म्हणणे, बांसरीवादन करणे, हारमोनियम वाजवणे लिखाण करणे, कविता करणे व त्यांना चाली बसवून ती श्यामला गावून बोअर करणे ईत्यादी गुणामुळे व तसेच माझ्या वाचण्याच्या आवडीचा विजूला पण लळा आहेच त्यामुळे आम्हा तिघांची मैत्री अजूनही टिकून आहे.

याच काळात एकदा मी बडोदा येथे काही शासकीय कामासाठी गेला असता एक किस्सा घडला ते सांगतो. अमरावती ते वडोदरा म्हणजे जुनं बडोदा. येथे मला काही शासकीय कामास्तव जायचे होते. प्रवास अचानकच उदभवला होता कारण शासनाची कोणतीही ऑर्डर असो त्याला एकाएकी नाही म्हणता येत नाही. आणि अशा लांबच्या प्रवासाला नेमकं कोणाला पाठवायचे तर माझं नाव नेहमीच पुढं असायचं कारण मीच एकमेव सर्वांना, ईतरांना स्वत:चा

प्रवास टाळायचा असल्यामुळे, हूशार दिसत होतो, तसा मी हूशार आहे हे मला सर्वजण बरोबर पटवून दाखवत होते. पण माझ्या बापानंही कधी वडोदरा पाहलं नव्हतं म्हणून मी वरीष्ठ अधिका-यांना कळकळीची विनंती करत होतो की........"साहेब मला नका पाठवू एवढया लांब......मी कधीच एवढया लांब प्रवास केला नाही आणि मला रिझर्वेशनची प्रोसिजरही नीट ठावूक नाही.

पण कसलं काय मीच बळीचा बकरा ठरलो. मी हे टाळण्यासाठी पुन:श्च प्रयत्न केला आणि म्हटले साहेब.......एवढया लवकर माझी टेक्निकल तयारी पण झाली नाही. मला अभ्यास करावा लागेल. तेंव्हा मोठे साहेब म्हणाले की, "तुला टेक्निकल नॉलेज जरी कमी असले तरी तुझी ईंगजी चांगली आहे म्हणून तुला निवडले". अहो पण सर......." देअर ईज नो एनी कनेक्शन आफ ईंग्लीश वुइथ टेक्निकल नॉलेज.......मग......... तेथे सगळे अधिक्षक अभियंता ईंगजीतच बोलतात. आणि एखादयाने ईंगजीत सुरूवात केली की मग समोरचा माणूस हिंदीत बोलायला सुरूवात करेल....कळलं कां........बक-याला मृत्युचे वेळी पुनर्जन्माचे महत्व सांगावे, तसे मला वाटत होते. शेवटी मी तयार झालो.

वास्तविक मला वडोदरा येथून रेनफॉल डेटा आणायचा होता. पण माझं कोण ऐकणार.......बळीच्या बक-याला एकदा कां हार घातला ......मग त्याच्या मायची दुवा पण लागत नाही. असो.....वडोद-याला CWC म्हणजे Central Water Commision चे ऑफीस आहे.तेथे जाण्यासाठी माझे मित्राने रिझर्वेशन काढून देण्याची मदत केली. आणि ठरल्यानुसार बायकोने दिलेल्या प्रेमाच्या शिदोरीसह, निघालो एकदाचा प्रवासाला. रात्री दहा वाजता चेन्नई अहमदाबाद एक्सप्रेस बडनेरा प्लॅटफॉर्मवर अर्धा तास उशीरा आली. गाडीत जागा घेतली. जवळचा माणूस वडक्कम सारे (सर) असं बोलला....मला तोतलाडोह प्रोजेक्टवर काम केल्यामुळे नायर साहेबांनी कोंचम कोंचम मलयालम शिकवली होतीच त्यामुळे मी सुध्दा वडक्कम म्हणून जागा घेतली . रात्रीची वेळ. समोरच्या प्रवाश्याला झोप येवूनच होती पण मला नेहमीप्रमाणे झोप यायला अवकाश होता. मी झोपणारच ईतक्यात तो लागला घोरायला.

मग मी अर्धवट झोपेतच माझा प्रवास पूर्ण केला. माझे काम वडोद-याला पूर्ण झाले नाही म्हणून मला सूरतला यावे लागले व तेथून रेनफॉल डेटा घ्यावा लागला. मग मी सूरत शहर फिरलो व एक छानशी साडी बायकोसाठी घेतली व स्वत:साठी पण एक डिझाइनचे शर्टपीस

घेतले. अगदी वेळेवर सूरतला यावे लागले त्यामुळे मला अमरावतीचे रिझर्वे शन मिळू शकले नाही म्हणून मग मी ट्रॅव्हल्सचा शोध घेतला. मला चार वाजताची ट्रॅव्हल मिळाली.

मी निघालो परतीच्या प्रवासाला. माझ्यासोबत बसच्या सीटवर एक तरूण पोरगा बसला होता. त्याचे संभाषणावरून मी गेस केले की त्याला दारूची अतिशय आवड आहे. बाजूच्या दोनच्या सीटवर एक सरदार बसला होता. तो प्रवासात भरपूर दारू पित होता. त्याचेकडे एक बम्परच होते. माझे लक्ष व माझ्या पार्टनर पोराचे लक्ष त्याचेकडे सारखे होते. पण काही वेळात माझ्या सीटवर असलेल्या मित्राला डोळा लागला. पण मला बस सारखी हलत असल्यामुळे झोप येत नव्हती. पहाटे चारला बस धुळयाला आली . ड्रायव्हरने सर्वांना पहाटे चहा व प्रार्तविधी साठी बस थांबवली हाती. तेथे माझे पार्टनरने थोडी दारू घेतली व परत अमरावतीकडे बस निघाली. त्याला परत झोप लागली पण मला पहाट झाली असल्यामुळे झोप आली नाही.

धुळयावरून निघालेली गाडी अमरावती आणायची म्हणजे पुन्हा लांबचाच प्रवास तेंव्हा ड्रायव्हरने स्पष्ट सूचना दिल्या होत्या की आता गाडी कोठेही थांबणार नाही. माझे लक्ष सरदारजीकडे गेले. गाडी थांबत नस्ल्यामुळे व सरदारजीला लघुशंका आल्यामुळे त्याची पंचायत झाल्याचे निदर्शनास येत होते. तो वळवळ करत होता. थोड्या वेळाने त्याचा संयम सुटल्यामुळे तो कासावीस झाला होता. शेवटी त्याने त्याचा रिकामा बंपर काढला व त्यातच शंका केली. आणि बॉटल खाली ठेवून दिली. माझे पूर्ण लक्ष त्याकडे होते.

ईतक्यात माझेजवळ बसलेल्या पोराला जाग आली आणि त्याचे लक्ष त्या बॉटलकडे गेले. ट्रॅव्हल्सच्या मंद प्रकाशात बॉटलमध्ये दारू शिल्लक असल्याचा भास माझे पार्टनरला झाला. थोडयाच वेळात सरदारजी जळगांवला उतरले. ते ही त्यांची बॉटल न घेता........

माझे पार्टनर मला बोलला........"काका, सरदारजी बॉटल विसरले"........

झाला प्रकार मला माहित असल्यामुळे मी बोललो की ...."विसरले असतील, तुला काय त्याचे........तो बोलला .....तसं नाही काका, त्या बॉटलमध्ये थोडीशी दारू शिल्लक दिसते......

मी तरी बोललो की काय ती उष्टी दारू घेवून बसलास ....मी ती बॉटल त्याने घेवू नये या उद्देशाने तसे बोललो पण तो एकण्याच्या मनस्थितीत नव्हता ......तो म्हणाला मी ती बॉटल घेवू कां ? असे म्हटल्यावरही मी नाही म्हटले पण त्याने ही ऐतिहासिक "दारूची बॉटल" उचललीच

आणि मग तो अकोला येथे उतरला. हा प्रकार अतिशय बीभत्स असा आहे याची मला जाणीव आहे पण तो सत्य असल्यामुळे मी विनोद निर्मितीसाठी तुम्हास कथन केला..........

आता तो ही "दारूची बॉटल" कधी व कशी पिणार, हे रहस्य तुम्हा वाचकांवरच सोडून ही बीभत्स रसातील घटना या ठिकाणी संपवतो.....

कार्यालयात आप्पा नावाची एक अजून व्यक्ति होती. ती सुध्दा खूपच मजाकी प्रवृत्तीची होती. तो कशा गंमती करायचा हे येथे सांगता येणे शक्य नाही कारण त्यांनी कार्यालय संपल्यानंतर पंधरा मिनिटे या साठी आरक्षित केली होती. थोडकयात सांगायचे तर त्याचे म्हणणे असे होते की, जीवनात कोणत्याच प्रकारचे बंधन नसावे. गोष्टी करतांना भाषा ही आपली नेहमीची रूळलेली असावी त्यात फालतुची कृत्रिम शुध्दता नसावी. जसे मनाला वाटते तसे अगदी मोकळया मनाने बोलावे. मग अश्लीलतेवर जरी बोलायचे असले तरी कोणताही आचपेच न ठेवता मनमोकळेपणाने जीवनाचा आनंद घ्यावा. आप्पा म्हणजे बोलतांना आचपेच न ठेवणारी व्यक्ति. अश्लील जिभेला वाचाशुध्दीची जोड न देता जीवनानंद घेण्यासाठी जिभेचे हाडच मुळात काढून टाकायचा. आता जिभेला हाड आहे किंवा नाही हा भाग गौण आहे. पण आप्पा आमच्यासाठी एक सवोत्कृष्ट अश्लोवक्ता होता. आज आम्ही त्यांना मुकलो आहे कारण ते या जगात नाहीत याचे फार वाईट वाटते. जीवनाचा भरपूर आनंद कसा घ्यावा हे त्यांनीच आम्हाला शिकविले होते.

जीवनात असे खूप प्रसंग असतात जे लिहितांना शब्द अपूरे पडतात पण त्यांचा उल्लेख् मात्र आपण विसरू शकत नाही. या उपविभागात कामाचा ताण नेहमीच असायचा. कामे कमी होती पण कामे आली तर ती घोडयावर बसूनच येत होती. रात्ररात्र काम करावे लागत असे. एक कार्यकारी अभियंता श्री वावरे असे होते की, त्यांना आम्हाला कामाला पळवायला लावायची संवयच होती. असेही दिवस निघून गेले पण आम्ही सर्वांनी कोणतीही काळजी न करता दिवस आनंदात घालविले. महिला कर्मचा-यांच्या गंमती, मी ज्ञान प्रकाशन पुणे प्रकाशीत 'नोकरशाहीतील बाळूच्या गमतीजमती' या पुस्तकापध्ये नमूद केल्या आहेत. त्याची पुनरावृत्ती करण्याची आवश्यकता वाटत नाही. माझे सदर पुस्तक वाचकांना 'ई साहित्य डॉट कॉम' वर मोफत वाचायला मिळू शकते. दुसरे एक महत्वाचे पुस्तक मी 'आजच्या जगात वावरतांना' हे नाशिकला असतांना लिहिले आहे ते सुध्दा

विचक्षण डॉट कॉमवर उपलब्ध आहे. त्या पुस्तकाला तर पश्चिम महाराष्ट्राच्या वाचकांनी खूप प्रतिसाद दिला आहे. आज मला माझ्या वाचन लेखनाचा यासाठीच अभिमान आहे की , माझी प्रतिलीपीवर वाचक संख्या ही 32000 चे वर जात आहे. मला कथा, कविता, विनोदी लेख, काल्पनिक व वैचारिक लेख लिहायचा छंद आहे. मी 'ॲमॅझॉन डाट इन'वर सुध्दा 'किंडल सेल्फ पब्लीशीग' च्या सहाय्याने दहाचे वर पुस्तके लिहिली आहेत. यानंतरच्या पुढच्या भागात मी अकोला येथे कसे दिवस घालविले हे सांगणार आहेच.

8. मुलांची घडण

"The best way to make children good is to make them happy".- Oscar Wilde

अकोल्यावरून अमरावतीला आलो. मी शासकीय कामाच्या दृष्टीने फारच सुखी होतो. कार्यालयात काम होते पण ते तणाववर्धक नव्हते. मुख्य प्रश्न होता, तो माझ्या लहान मुलांच्या भवितव्याचा. लहान मुलगा आशय व माझी मोठी मुलगी मृदुला. लहान दुस-या ईंग्रजी वर्गात ज्ञानमाता शाळेत शिकत होता व मोठी मुलगी सातव्या वर्गात जिल्हा परीषद शाळेत. मुलाची प्रगती दुस-या वर्गापासूनच प्रगतीवर होती आणि मृदुला अभ्यासाच्या बाबतीत साधारण होती. साधारण असण्याचे कारणही फार निराळे होते कारण तिला तिचे शरीर स्वाथ्य साथ देत नव्हते.

अकोला येथे असतांना मी कार्यक्षेत्रावरील व्यस्त कामामुळे फारसे लक्ष देवू शकलो नाही. जे काही परिश्रम केले ते माझ्या सुविद्दय पत्नी सौ. रेखाने. दोन्ही मुलांना घडविण्याचे व त्यांच्या प्रगतीत तिचाच मोलाचा वाटा आहे असे मला जाणवले.

मुलगा आशय हा केवळ हूशारच नव्हता तर तो अभ्यासाच्या बाबतीत अतिशय जिद्दी होता. वर्गामध्ये नेहमी दुसरा किंवा तिसरा नंबर त्याने कधी सोडला नाही. तसाच त्याचा स्वभाव अतिशय नम्र व विनयशील आहे. पाहता पाहता तो नऊ वर्षाच्या काळात दहाव्या वर्गात गेला. बोर्डाचा निकाल लागला. त्याचा मेरीट लिस्ट मध्ये नंबर केवळ तीन मार्काने गेला व तो नाराज झाला. मला मात्र त्याचा खूप स्वाभिमान वाटला. मी त्याची मार्कशीट अनेक जणांना दाखवायचा प्रयत्न करीत होतो. कारण एक दोन मार्काने माझ्या मुलाचे यश गेले असे सांगायची सर्वानाचा आवड होती त्यामुळे ही गोष्ट लोकांना खरी वाटत नसे. माझी, 'आशयची गुणपत्रिका सर्वांना दाखवायची' सवय मोडावी हया कारणास्तव तो एकदा ईतका चिडला व मला म्हणाला...' पप्पा मी मेरीटमध्ये आलेलो नाही, तेंव्हा तुम्ही उगीचच लोकांना हे गुणपत्रक दाखवत जावू नका.'

मी बोललो...,'आरे मला तुझा अभिमान आहे म्हणून मी हे करतो आहे.'

त्यावर त्याने मोठया आत्मविश्वासाने मला उत्तर दिले की, तुम्ही माझी बारावीची गुणपत्रिका लोकांना दाखवा कारण मी बारावीला मेरीट लिस्ट मध्ये येणार आहे. हे पाहून मला अभिमान तर वाटलाच पण ही अहंकाराची भाषा आहे, असे मला क्षणभर वाटले. मी चूप बसलो. संत तुकाराम महाराजांनी म्हटले आहे की, "बोले तैसा चाले, त्याची वंदावी पाऊले". ही म्हण माझ्या पोराने जिद्दीने अभ्यास करून बोललेले खरे करून दाखविले. तो खरंच बारावीमध्ये 94% मार्क्स मिळवून अठरावा मेरीट आला होता. मी माझ्या जीवनात माझे बाबांना जसा आत्मविश्वास दाखविला होता, तोच गुणधर्म याचेत हुबेहूब उतरला होता. एवढे भव्य यश मिळवून सुध्दा तो आजही माझ्याशी कधी अहंकारी वृत्तीने वागत नाही, हीच माझ्या जीवनातली सर्वात मोठी कमाई आहे. मी माझ्या उभ्या आयुष्यभरात ईंजिनियर असूनही माझ्या भोळया पत्नीला कधी 20000 चे वर बँक बॅलन्स दाखवू शकलो नाही. पण हे रत्न मला ईश्वर कृपेनेच मिळाले अशी माझी व माझ्या पत्नीची आजही भावना आहे.

आता प्रश्न उरला होता माझ्या मुलीचा. तिला दहाव्या वर्गात फारसे यश मिळू शकले नाही पण तिची जिद्द सुध्दा तिला विविध क्षेत्रामध्ये प्राविण्य देत गेली. तीला लहानपणापासूनच

नृत्य कलेची आवड होती. ती सातव्या वर्गात असतांनापासूनच कॉलेजमध्ये नृत्य दिग्दर्शक म्हणून काम पहात असे. लवकरच ती बारावी नंतर बी.ए. व नंतर अर्थशास्त्रात एम.ए. करून तसेच डी टॅक्सचा कोर्स करत पुढील जीवनात कशी यशस्वी झाली हे मी पुढील भाग क्रमांक 25 मध्ये सांगणार आहे.

आशय बारावीनंतर कोठे शिकायला गेला. त्याला ईंजिनियरींग शिक्षणात काय अडचणी आल्या हे सर्व अर्थातच पुढील भागामध्ये येणारच आहे. आम्ही उभयतांनी आमची दोन्ही मुले जीवनात काटकसर करून कशी पुढे नेली असा सर्व वृतांत पुढे येणारच आहे.

ऑफीसातील सुखामुळे माझा वाचनाच छंद खूप वाढत गेला. मला फक्त आयुष्यात एक गोष्ट जमली नाही आणि ती म्हणजे उगीच कोणाला मस्का मारत पुढे जाणे, तसेच मदयाच्या आहारी जाणे, वगैरे या माझ्या गुणामुळे पुढे माझी मुलेपण कशी निव्यसनी झालीत अशा अनेक गोष्टी साठी माझी ही मेहनतीने लिहिलेली आत्मकथा आपण नेहमीच वाचावी व ईतरांनाही वाचण्यास आपण प्रेरीत करावे हीच माझी प्रबळ ईच्छा आहे.

****

"Sometimes in life, you have to make decisions that are best for you, not for everyone else". - Love of life quotes.com

माझा मुलगा आशय, हा बारावी बोर्डाच्या परीक्षेत मेरीटमध्ये पास झाला. लहान वय असल्याने सर्व प्रकारचे निर्णय हे मलाच घ्यावे लागतील असे मला वाटले. त्याच्या पुढील भवितव्याचे काय होणार, याबाबत मी साशंक नव्हतोच. याच वर्षी शासनाने सामान्य प्रवेश परीक्षा (CET- Common Entrance Test) सुरू केली होती. त्यातील काही मार्क्स व सीईटी परीक्षेत मिळालेले गुण यावर आधारित अभियांत्रिकी प्रवेश अवलंबून होता. परीक्षा पध्दत नवीन होती त्यामुळे ब-याच मुलांचा गोंधळ उडणे साहाजिकच होते. तशात याचाही गोंधळ थोडासा उडाला हे त्याने कबूल केले होते. पास होण्याची हमी निश्चित नव्हती पण त्याचा आत्मविश्वास व अभ्यासाची सखोलता यामुळे त्याला भरघोस यश मिळाले. अर्थातच आमची कूजबूज सुरू झाली.

संघर्षमय जीवनाची सुरूवात केवळ मीच केली नव्हती तर हया मुलाने सुध्दा जीवनातल्या संघर्षाचे पहिले पावूल उचलले होते. तो म्हणाला..."पप्पा, मी अमरावतीलाच

अभियांत्रिकी महाविदयालयात प्रवेश घेतला तर नक्कीच पहिल्या क्रमांकावर राहील, यात शंका नाही. पण माझे असे मत आहे की, बाहेरच्या दर्जेदार महादियालयात प्रवेश मिळाला तर मला हूशार मुलांशी स्पर्धा करता येईल". याचा हा उत्कृष्ट विचार मला पटला. मला माझ्या वडीलांची या ठिकाणी आठवण झाली. ते नेहमीच म्हणायचे की, स्पर्धा करायची असली तर आपल्यापेक्षा दिडपट हूशार असलेल्या माणसाशी करावी. उदाहरणार्थ, जर कुस्ती खेळायची असेल तर ती दिडपट पहिलवानाशी करावी तरच आपले कसब दिसून येते. हे आजोबांचे वाक्य हुबेहुब आशयमध्ये गुणधर्मासह उतरले होते. आम्ही त्यानुसार जे विकल्प टाकले होते त्यात एक पुण्याचे महाविदयालय टाकले होते. आमची ईच्छा मात्र अमरावतीत ॲडमिशन घ्यावी असा होता, पण म्हणतात ना......"ईच्छा तेथे मार्ग". त्याला सिंहगड कॉलेज, पुणे येथे प्रवेश मिळाला. त्यावेळी कॉलेजची फी होती 37000 रूपये. एवढी रक्कम घेवून आम्ही दोघे ट्रॅव्हल्स ने प्रवास करावयास निघालो. मी प्रवासात एसी गाडी असून मला खूप घाम फुटला होता कारण मी एवढी मोठी रक्कम घेवून कधीच प्रवास केला नव्हता. तसेच यापूर्वी पुणे शहर कधीच पाहले नाही ही सुध्दा भिती मनात होतीच. बस सकाळी सहा वाजताच पुण्याला पोहोचली. पहिला प्रश्न होता प्रार्तविधीचा. काहीही कळत नव्हते की, नेमके या लहान मुलाला घेवून काय करावे. लवकरच एक जवळचे लॉज पाहले. तेथे मुक्काम करायचा नव्हताच. फक्त फ्रेश व्हायचे होते. तरी त्या लॉजवाल्याने दिडशे रूपये चार्ज लावला. बाहेर गावी कसा जास्त खर्च होतो, याचा पहिला प्रत्यय मला आला पण उपाय नव्हता.

ठिक अकरा वाजता कॉलेज गाठले. प्रवेश प्रक्रिया पूर्ण केली. त्याच दिवशी आम्हाला होस्टेलमध्ये प्रवेश घेणे अनिवार्य होते. व त्यासाठी अतिरिक्त फी 20000 रूपये भरावयाची होती. आता अतिशय अडचण निर्माण झाली होती. माझ्या बँकेमध्ये एवढे पैसे नव्हते. मी पुण्याहून माझ्या मित्राला श्रीकुमार याला पैसे बँकेत टाकण्याबाबत विनंती केली व मी ते आयसीआयसीआय एटीएममधून काढून माझे काम पूर्ण केले. हे सर्व सांगण्याचा हेतू एवढाच की, माझ्या जीवनात संघर्ष किती वेळा आला. त्यास होस्टेल मिळाले पण रूम मिळाली नाही कारण त्या कॉलेजच्या होस्टेलचे बांधकाम चालू होते. शेवटी आम्ही सर्व पालकांनी विनंती केली तेंव्हा कोठे आम्हाला एक किलोमीटर दूर असलेले नर्हे कॅम्पसवर जागा मिळाली. मला सारखा विचार येत होता की, हा मुलगा येथून टेकडयावरील कॉलेजवर रोज कसा जाईन. यासाठी मी त्यास दोन वेळा पायीच नेले होते. वास्तविक तो थकत होता आणि मला म्हणायचा... ."पप्पा तुम्ही थकले असाल.".... माझा पैसे वाचवावे हा हेतू त्याचे लक्षात येवू

दिला नाही. बाप मुलासाठी काय करतो हे त्यास कसे कळणार होते. त्याचा प्रवेश कॉलेज व होस्टेलमध्ये व्यवस्थित पार पडला. मी परतीच्या प्रवासासाठी त्याला तेथे ठेवून एकटाच अमरावतीला यायला निघालो. मनात खूप विचार येत होता की हा येथे टिकेल काय. कारण ज्यादिवशी आम्ही प्रवेश घेतला त्याच दिवशी एक, 'पालक व विदयार्थ्यांची सभा' घेण्यात आली होती. त्यात स्पष्ट सांगितले होते की, येथे मेरीटमध्य येणारे विदयार्थी सुध्दा टिकत नाही. त्यांनी या कॉलेजमध्ये फक्त पास होवून दाखवावे. मी यासाठीच चिंतेत होतो. मी व मुलगा अलग झालो हा विरह मला सहन होत नव्हता पण त्याचे भविष्यासाठी हे करणेही मला भागच होते.

ईकडे मोठी मुलगी मृदुला डी टॅक्सला शिकत होती. तिच्या लग्नाचा विचारही मनात घोळत होता. तीचे शिक्षण कला शाखेत झाल्यामुळे तिला अभिंयता नवरा मिळणे शक्यच नाही असे वाटत असे. माणूस प्रत्येक वेळी जीवनात खूप प्रयत्न करत असतो पण आपल्याला वाटते तसे यश मिळेलच याची हमी नसते. जर यश मिळाले नाहीत तर त्यालाच आपण सोयिस्कररित्या 'नशीब' असे नाव देत असतो. आता आशय व मृदुला यांच्या पुढील जीवनात नेमके काय घडणार आहे हे क्रमश: मी पुढील भागात सांगणार आहेच.

****

"“Success is the sum of small efforts being repeated day in and day out.” – Robert Collier

मुलगा आशय पुण्याला शिकायला गेला. पुणे हे असे शहर आहे की, एक तर तेथे मुलं लवकर बिघडतात. बिघडण्याची शक्यता जरा जास्तच. आई वडीलांपासून दूर असलेली मुले त्यांच्याच भरवशावर ठेवावी लागतात. प्रथम वर्षाला गणित हा विषय सर्वांनाच भारी जातो. आशयने अपेक्षापेक्षा जास्त परीश्रम घेतले असतील, ही जाणीव त्याचा निकाल पहाल्यावर मला आला. तो सिंहगड कॉलेजला फर्स्ट यिअर टॉपरची ट्रॉफी घेवूनच सुट्टीमध्ये गावी आला होता. आम्हा उभयतांना खूपच आनंद झाला होता. त्याने त्याची अभ्यासाची चिकाटी शेवटपर्यंत टिकवली व तो 2008 मध्ये अभियांत्रीकी स्नातक परीक्षा पास होवून बी.ई. ची डिग्री घेवून जीवनात यशस्वी झाला. त्याला माझ्या परिस्थितीची जाणीव पुरेपूर होती म्हणून त्याने नोकरी पत्करण्याचा निर्णय घेतला. बी. ई. च्या बेसवर त्यास केवळ 22000 प्रति माहची नोकरी मिळाली. त्यात त्याचे मन रमेना. त्याने टाटा रिसर्च डिझाईन अँड डेव्हलपमेंट सेंटर हे मागवून

घेतले होते. दोन वर्ष सतत अभ्यास चालूच होता. पण आता बापाच्या पैशाला भार दयायचा नाही ही खूणगाठ त्याने मनास बांधली. 'स्वत:च्या बळावर काही जीवनात करावे' असा हेतू ठेवून एका लहानशा खोलीत जॉबसोबत अभ्यास चालू ठेवला. माणसाला यश अपयशाची चिंता न करता सातत्य जीवनात उंचावर नेवून ठेवून शकते याची जाणीव त्याच्या जिद्दी मनाला झाली.

त्याने गेटच्या परीक्षेची तयारी सुरू केली. प्रथम त्यास पाहिजे तसे यश प्राप्त झाले नाही. नंतर पुन्हा प्रयत्न केल्यावर त्याने गेटची परीक्षा पास केली तेही चांगले पर्सेंटाइल मिळवून. त्याला वाटले आपल्याला भारतातल्या सहा टॉप आय आय टी मध्ये प्रवेश मिळेल पण ही त्याची ईच्छा पूर्ण झाली नाही. मग काय अजून प्रयत्न सुरूच होता. ईतक्यात त्यास कळले की, ट्रिपल आय टी हैदराबाद, एक ऑल ईंडिया लेव्हलची परीक्षा घेणार आहे. पण यात अडचण अशी होती की, जागा केवळ 70 च होत्या. मला यातले काहीच माहित नसतांना त्याने ठाणे येथे जावून ती परीक्षा तातडीने दिली. काय आश्‍चर्य की, ज्याला मनापासून जीवन उंचावर न्यायचे असते त्यास वरची जागा नेहमीच रिकामी असते. ईंग्रजीत असे म्हणतात की, There is always a room at the top. ही प्रचिती त्याला आली आणि त्यास ट्रिपल आय टी हैदराबादला एम. टेक. साठी प्रवेश मिळाला. प्रवेश मिळेपर्यंत ही बाब त्याने माझेपासून लपवून ठेवली होती कारण त्याला, माझ्यावर पैशाचे बर्डन टाकायचे नव्हते. त्याने स्वत:च्या दोन वर्षाच्या शिल्लकीवर त्या कॉलेजमध्ये प्रवेश घेतला.

जीवन किती जलद गतीने पास होते, ते त्याला कळले सुध्दा नाही व तो दोन वर्षाच्या काळामध्ये एम टेक झाला. तेथे त्याचा हूशार मित्र मैत्रिणींचा गट तयार झाला. अनेक हूशार मित्रांना चांगल्या कंपन्या मिळाल्या परंतू याला मात्र, 'यात्रा डॉट कॉम' मध्येच नोकरी करावी लागली. जो आयुष्याची वाटचाल प्रचंड वेगाने पार करण्याचा प्रयत्न करीत असतो आणि तेही खूप जिद्द ठेवून, त्याला यशाचा डोंगर पार करणे फार सोपे वाटत असते. त्याने या कंपनीमध्ये आधीच सांगितले होते की......"मी फार काळ तुमच्या कंपनीत काम करणार नाही."

झालेही तसेच..... त्याने सहा महिण्याच्या कालावधीत ती यात्रा कंपनी सोडली. त्यास कॉनीलॅब या कंपनीने भरघोस पॅकेज देण्याचे कबूल केले. पण त्याची ईच्छा अजून एखादी नामांकित कंपनी मिळावी अशीच होती. त्याला याची पूरेपूर जाणीव होती की, अशा नामांकित कंपन्याचे ईंटरव्ह्यू फार कठीण असतात, तरी त्याने जोरात तयारी सुरू केली. त्याला एका

नामांकीत कंपनीत नोकरी मिळाली. तव्दतच पॅकेजही भरपूर मिळाले. पॅकेज आणि कंपनीचे नाव मुद्दाम गुपित ठेवत आहे. त्याचे आणि माझे स्वप्न पूर्ण झाले. तो विदयाविभूषीत झाला पण मला व त्याच्या आईला न विसरता स्वभावातला विनयशीलपणा (Modesty) कायम ठेवला, ही आम्हा उभयतांना जमेची बाजू आहे. सर्वसाधारणपणे ज्ञान, गुण, बळ, ध्येय ईत्यादी प्राप्त झाल्यानंतर कोणालाही अहंकाराचा स्पर्श अलगद न कळत होवून जात असतो. पण माझे मुलाचे बाबतीत हे घडले नाही. खरोखरच "विद्या विनयेन शोभते", हे वाक्य आशयने अंगीकारल्यामुळे आज तो यशाच्या शिखरावर आरूढ झाला आहे.

आज तो फॉरेन कंट्रीमध्ये त्याची प्रेमळ पत्नी पल्लवीसह वास्तव्यास आहे. त्याचा प्रेमविवाह असल्यामुळे ही बाब गुपित ठेवण्यात येत आहे. या काळात माझ्या मुलीचे विवाहाचे वय झाले होते त्यामुळे मी पुढील भागात तिच्या लग्नाबाबत काही प्रसंग कथन करेन. माझी मुलगी मृदुला ही कशी भाग्यवान ठरते ते सर्व पुढील भागात. तोपर्यंत माझी ही जीवनाची कहाणी आपण आवर्जून वाचत राहावे या सदिच्छेसह हा भाग आपल्या आभारासह संपुष्टात आणतो.

****

9.मुलगी मृदुला व तिचे आयुष्य

"Marriage is made out to be so important for girls but the focus has to shift at some point from marriage to the real challenges of life which are the same for women and men, so we have to prepare our girls just the way we prepare our boys."- Kangana Ranaut.

माझी मुलगी मृदुला, ही आता लग्नासाठी योग्य वयाची झाली होती. मुलीचे आयुष्य हे एकदाच घडत असते. लग्न हा असा सोहळा आहे की, अगोदर येणा-या मुलाबाबत आपल्याला फारशी कल्पना नसते. तो एक मुलीच्या भाग्याचाच खेळ आहे. एक स्थळ आले होते, तो मुलगा मध्य प्रदेशात नोकरी करीत होता त्यामुळे मला एवढया दूर मुलीला पाठवायचे नव्हतेच. त्या स्थळाला मी फारसा प्रतिसाद दिला नाही. आजकाल नोकरीची मुले मिळणे जवळपास दुरापास्त झाले आहे.

एक स्थळ तिच्या दहाव्या वर्गातल्या मैत्रिणीने सुचविले होते. कृषी केंद्राचा साधा व्यवसाय त्या मुलाने नुकताच टाकला होता. दुकान खूप मोठे नव्हते. तो मुल्र गा जेंव्हा माझ्या मुलीला पहाण्यासाठी आला त्यावेळी तो दिसायला सुंदर आणि सुडौल शरीरयष्टीचा असल्यामुळे माझा कल त्याचेकडे वळला. मुलाची व त्याच्या नातेकाईकांची संपूर्ण पहाणी झाली. आणि त्यांचाही कल आमचेकडे झाला. मनात वेगळे विचार येत होते की, कोणत्याही धंदयामध्ये रिस्क फॅक्टर फार असतो. तो व्यवसाय चालला तर ठिक आणि नाही चालला तर काम ठप्प होईन, असे मला वारंवार वाटत होते. माझ्याजवळ या मुलाशिवाय दुसरा चांगला पर्याय दिसत नव्हता म्हणून मी या स्थळाला घर दार पाहल्यानंतर होकार दिला.

पाहणीच्या वेळी एक गमतदार किस्सा माझ्या मुलीने घडविला. तो गंमत म्हणून पुढे सांगतो.

****

स्त्री जीवना तुझी कहानी,
तुझीच राहील मनमानी ।
तू जशी ती दुनिया सारी,
देव तुझ्यासम, तुज कोण टाळी.......।।

आज मृदुला माझी मुलगी जरा खूषच होती... तीला पहायला पहिल्यांदाच कोणीतरी पाहूणे येणार होते. पाहूणा म्हणून येणारा मुलगा कसा असेल, याचा ती मनातल्या मनात विचार करीत होती. ती अर्थशास्त्रात पारंगत झाली होती व तीचे डि. टॅक्सचे फायनल वर्ष होते. तसं तीचं लग्नाचं वय झालं नव्हतं पण मुलीची जात, त्यामुळे लवकरच लग्न जुळलं तर फारच उत्तम, या विचाराने मी पाहूण्यांना पहाणीसाठी होकार दिला होता.

पाहूण्यांची येण्याची वेळ दुपारी दोन वाजताची ठरली होती. दिवस होता 20 फेब्रुवारी 2005. ही तारीख येणा-या मुलाने म्हणजे सचिन गरपाळ यांनी मुद्दामच ठरविली होती कारण या दिवशी त्यांचा वाढदिवस होता.तो अगदी जवळच्या मित्राजवळ गेला आणि म्हणू लागला......

"काय रे अमोल, आज तसाही रविवारच आहे आणि माझा वाढदिवस पण आहे तर आपण हा वाढदिवस वेगळया प्रकारे साजरा करूया कां"............अमोल आश्चर्यचकीत झाला व बोलला...

"असं काय विशेष करणारआहेस तू आजच्या दिवशी?

अरे आज विशेषच आहे. आज मी मुलगी पहायला जायचे ठरविले आहे. तारीख पण मी मुद्दामच ही घेतली आहे तेंव्हा तू लवकर तयारी कर कारण आपल्याला दोनपर्यंत अमरावतीला पोहोचायचे आहे. आऽरे ,शहरातली मुलगी आहे आणि ते ही ईंजिनिअरची. जावून तर पाहू. आज नेमक्या वाढदिवसाच्या दिवशीच आपलं नशीब अजमावून पाहू म्हणतो.

पाहणी पहिल्यांदा असली की, प्रथम आई वडील मुलाला व मित्रालाच पाठविण्याची प्रथा आहे या विदर्भात. दोघेही मारूती व्हॅन घेवून अमरावतीला येतात. जातांना ठरल्यापेक्षा अर्धा तास उशीर होतो. तिकडे मी येणा-या पाहूण्यांसाठी पूर्ण तयारी करून वाट पहात असतो. दुपारी 2.30 वाजता पाहूणे येतात. पाहतो तर फक्त मुलगा आणि त्याचे मित्रच व्हॅनमध्ये दिसतात. मुलीची तयारी पण झालेली असते.मुलीला संभाव्य प्रश्नांची उत्तरे तिच्या आईने समजावलेली

असतात आणि विशेष म्हणजे अवांतर काही मोकळेपणाने बोलू नकोस हे पण तिच्या आईने समजावलेले असते. मृदुला ही अतिशय मोकळया स्वभावाची असते. तीला कोणतीही गोष्ट लपवून ठेवण्याची सवय नसते. जे बोलायचं ते अगदी मोकळेपणाने मग त्याचा परीणाम काहीही होवो.

बैठक बसलेली असते. मुलीला ठराविक प्रश्न विचारल्या जातात. त्यानंतर काही प्रश्न मुलीच्या वडिलांनी मुलास विचारावे अशी अपेक्षा ठेवून, नवरा मुलगा प्रतिक्षेत असतो पण मी आलेल्या पाहूण्या मुलास काहीच विचारत नाहीत कारण ते जरा मितभाषी असतात. शिवाय मुलगा दिसायला सुंदर असल्याकारणाने, विशेष प्रश्न त्यांना विचारण्याची मला गरज वाटली नाही. पुढील बैठकीत विचारू, असे ते मला वाटते. त्यामुळे नव-या मुलास थोडसं आश्चर्य पण वाटतं. तो विचार करतो की आपण दिसायला सुंदर असून सुध्दा इंजिनिअर साहेबांनी कोणतेही प्रश्न कां विचारले नाहीत . आपल्यात काही कमी पणा तर त्यांना आढळून आला नसेल..........असा विचार त्याचे मनात चालूच होता.

प्रश्न संपले असं गृहीत धरून पाहूण्यांनी मृदुलाला जायला सांगितले पण मृदुला मोकळया स्वभावाची असल्याने, तीने नव-या मुलाकडे धडधाकट नजरेने पाहून व सचिनचे मित्राकडेही सरळ नजर मिळवून म्हटले की , घरात जाण्यापूर्वी मला एक गोष्ट स्पष्टपणे याच बैठकीत सांगायची आहे,ती अशी की, माझे माझ्या मित्रावर अतिशय प्रेम आहे. आणि तो आमच्या फ्लॅटमध्येच राहतो तेंव्हा जर तुम्हा दोघांची संमती असेल तर मी आताच त्याला तुमच्या समोर बोलावून घेतो म्हणजे तो तुम्हास पाहील व मला लग्नासाठी निर्णय घेणे सोयीचे होईल.

असे एकल्याबरोबर, मुलीला पाहण्यासाठी आलेला पाहूणा मुलगा व त्याचा मित्र एकमेकाचे चेह-याकडे आश्चर्याने पाहू लागले. तसा त्यांचा चेहरा पांढरा फटक झाला होता. पण मुलीच्या स्पष्टतेपुढे त्यांचा काही ईलाज नव्हता.

दोघांनीही क्षणभर विचार केला आणि म्हटले ...."नाही नाही तसं काही नाही, आपण अतिशय स्पष्ट वक्त्या आहात व आपली गुणवत्ता पण आमच्या पेक्षा जास्त असल्यामुळे असा स्पष्टपणा लग्नाआधीच सांगितलेला बरा असतो".

मृदुला मनोमन खूप हसली........तीचं हास्य थोडं ओठाबाहेरही आलं होतं..........

तर मग मी त्याला लगेच बोलावते कारण तो माझ्या फ्लॅटमध्ये, खालीच ग्राउंड फ्लोअरला राहात असतो. ती लगेच मला म्हणते ...."पप्पा त्यास फोन करा'....

मी बोललो ....."अगं कशाला त्याला तू या ठिकाणी बोलावतेस"?

"नाही नाही प्रतिकला बोलवाच तो माझा जिगरी दोस्त आहे" मृदुला बोलली .... "त्याचे शिवाय मी लग्नाचा निर्णयच घेवू शकत नाही. मग नाईलाजाने इंजिनिअर साहेब प्रतिकच्या वडीलांना फोन करतात व म्हणतात की ...."अरे नितीन, तुझ्या मुलाला प्रतिकला माझ्या फ्लॅटमध्ये चहा पोहे खायला पाठव. आमचे कडे मृदुलाच्या पाहणीसाठी पाहूणा मुलगा सचिन आला आहे.

क्षणभ-यात प्रतिक वरच्या फ्लॅटवर येतो. आणि पाहूण्यांकडे टक लावून बघतो. आणि काय आश्चर्य पाहूणा मुलगा आश्चर्यचकीत होवून जोरात हसतो........आणि म्हणतो हा तुमचा मित्र आहे कां..........फार गोड मित्र आहे हो तुमचा........

वाचकहो,........ हसण्याचं कारण तुम्हाला कळणार नाही कारण मृदुलाचा जिवलग मित्र प्रतिक हा केवळ सात वर्षाचा मुलगा असतो...............

आणि मृदुलाचे लग्न सचिनसोबत दिनांक 11.05.2005 ला सुखरूप पार पडते. आज दोघेही अतिशय आनंदात व अपार सुखात वावरत आहेत.............

सर्व औपचारिकता पूर्ण झाली व माझ्या मुलीचे लग्न या मुलाशी 2005 मध्ये पार पडले.

एक वर्षाचा काळ निघून गेला. सर्व व्यवस्थित सुरू होते. व्यवसायाची भरभराट होत होती. आम्ही दोघेही उभयता अतिशय आनंदी होतो. ईतके चांगले स्थळ मिळाल्याचा आनंद गगनात मावेनासा झाला. "लग्नाच्या जोडया जणू स्वर्गातूनच जमून येतात", असे वाटायचे. आयुष्यात माणसाला काय हवे असते. आपल्या मुलाबाळांचे सुख हेच मात्यापित्यासाठी स्वर्ग सुख असते. 'स्वर्ग हा आकाशात नसून तो या पृथ्वीवरच असतो' याची जाणीव झाली. "मनात असता तारे मग मी पाहू कशाला नभाकडे" अशी माझ्या मुलीची अवस्था होती. सुखाचा उतार मात्र जीवनात फार काळ टिकत नसतो व लगेच दु:खाच्या डोंगरावर चढण्याची तयारी प्रत्येकालाच या जीवनात करायची असते.

जीवनातला प्रथम धक्का मृदुलाला बसला आणि तो म्हणजे पहिले 'मिसकॅरेज'. गर्भाची वाढ नीट झाली नव्हती त्यामुळे तिच्या पदरी अपयशाचे पहिले पावूल पडले. ती फार दु:खी झाली होती. तिचे सांत्वन करण्यास कोणाजवळही शब्द उरले नव्हते. सासरची मंडळी अतिशय प्रेमळ होती तसेच पैशाची पण कमतरता नव्हती. पण श्रीमंती आणि दुर्घटनेचा सुतमात्रही संबंध नसतो. हा सर्व नियतीचा खेळ आहे, असे सर्वांना वाटले. हा काळ हळूहळू सर्व विसरायला लागले.

तीन चार वर्षाचा काळ असाच निघून गेला. ग्रामीण भागात लग्न झाले की, 'मुलंबाळ लवकरच व्हावी' असा गैरसमज असतो. अशा गैरसमजामुळे नवीन दाम्पत्याला काय यातना सहन कराव्या लागतात ते असे कपलच सांगू शकतात. जावई सचिनराव हे आधुनिक विचाराची व्यक्ति असल्याने माझ्या मुलीला या बाबीचा काहीही त्रास झाला नाही. जीवनातले काही त्रास असे असतात की, ते आपण स्वत:हून स्वत:ला लावून घेवून स्वमनाला विनाकारणच दु:खी करत असतो. तसेच झाले मृदुलाला, हा आघात असहय होत गेला आणि एखादे मुलं हवेच असा आग्रह ती धरून बसली. यश जसे आनंद देवून जाते तसेच अपयश पचविण्याची शक्ति ही सुध्दा निसर्गातूनच प्राप्त करावी लागते. मला या ठिकाणी एक ईंग्रजी वाक्य आठवते. असे म्हणतात की, "You are never given a wish, without also being given the power to make it true." याचा अर्थ "आपणास अशी कोणतीच ईच्छा दिल्या गेलेली नाही की, जी परीपूर्ण करण्यास निसर्गाने आपणास शक्ति दिलेली नाही." असो, अशा जीवनात येणा-या अनेक संकटांना तोंड देणे हेच तर खरे धैर्याचे काम आहे. ती या दु:खातून कशी सावरते व तिला तिच्या जीवनात यापुढे कसे यश मिळते, अर्थातच ही कहाणी मी पुढील भाग क्रमांक 30 मध्ये थोडक्यात सांगेन.

संघर्षमय जीवनाच्या या माझ्या कथनातून आपणास वारंवार निश्चितच प्रेरणा मिळत असावी, असा माझा या लेखनाचा हेतू आहे.

****

10.माझे प्रमोशन

"we have to prepare our girls just the way we prepare our boys."- Kangana Ranaut.

मृदुलाच्या जीवनात जे आघात झाले, ते मी थोडक्यात मागच्या भागामध्ये सांगितले आहे. बाळाच्या आशेमध्ये ती नेहमी दु:खातच राहू लागली. हे मला पहावले नाही. मध्यंतरी माझी बदली अकोल्याहून गडचिरोली येथे झाली. तेथील नक्षल्यांच्या भागात मी नोकरी स्विकारली त्यामुळे की काय मला त्या विभागीय कार्यालयातून एकदम 'उपविभागीय अधिकारी' म्हणून प्रमोशन मिळाले. तसाही मी या पदासाठी पात्र होतोच. तिच्या दु:खाचे निरसन व्हावे यासाठी मी प्रयत्नशील होतोच पण मध्येच हे प्रमोशनचे 'आवडते भूत' माझ्या मागे लागले.

प्रमोशनचा आनंद तर झालाच पण माझ्या कडक स्वभावामुळे, मी यासाठी योग्य जागा मिळावी, असा काहीही प्रयत्न केला नाही. तशी माझी तयारी महाराष्ट्रात कोठेही नोकरी करावी, अशी होती तरी सुध्दा काही प्रयत्न करावे या हेतूने मी मुंबईला मंत्रालय गाठले. माझे कोणीच ओळखीचे नसल्यामुळे मी जागा कोणती मिळेल याची चिंता केली नाही. तिकडे मुलीची व्यथा आणि ईकडे माझी धावपळ एकाच वेळी आली. मुलगा पुण्याला नोकरी करीत होता. त्याचे वेगळे ध्येय तो पार पाडत होता. हे मागील भागात आले आहे.

सगळया बढती मिळालेल्या अभियंत्यानी अमरावती हीच सोयीची जागा पटकावली आणि मी बिचारा ईमानदार प्राणी, कधी कोणाला लाच न देणारा, अशा व्यक्तिला नागपूर झोनच्या बाहेर फेकणार नाही तर शासनाचे नवलच. मध्यंतरी मला हा सुगावा लागला की, 'उपविभागीय अधिकारी' बढतीसाठी व योग्य जागेसाठी किमान एक लाख रूपयाची जुळवाजुळव करून मध्यस्थिला गाठल्यास मला अमरावती मिळू शकते. पण मी पडलो 'पब्लीक स्कूलचा आदर्श विदयार्थी'. माझ्या सारख्याला हीच शिक्षा योग्य होती, असे मलाही वाटले. शासनाच्या पारदर्शक म्हणणा-या नियमानुसार मला औरंगाबाद झोन देण्यात आले. आता तेथे तरी प्रयत्न करावा असे वाटले व मी औरंगाबाद रात्रभर प्रवास करून गाठले. मोठया साहेबांना भेटलो. आमचे सर्वात मोठे साहेब म्हणजे पाटबंधारे विभागात 'मुख्य अभियंता'. त्यांनी किमान माझ्यासारख्या सामान्य माणसाशी बोलून औदार्य दाखवले. ते म्हणाले......"तुम्ही तर गडचिरोलीवाले तुम्हाला जवळ पडावे म्हणून मी तुम्हास उमरखेड जिल्हा यवतमाळ हे पैनगंगा प्रकल्प दिले आहे. मी आश्चर्याने तोंडात बोटे घातली की, बदलीवर मला अकोल्यावरून

गडचिरोलीला फेकायचे आणि गडचिरोलीवाले म्हणून उमरखेड सारखे अपेठी गांव दयायचे यापेक्षा उत्कृष्ट न्याय मला शासन देवूच शकले नसते, याची मला पुरेपूर जाणीव होती. या सर्व गंमती दु;खद व खोचक असल्या तरी मी मात्र शांत चित्ताने हे सर्व सहन करून शासन नोकरीत आनंद घेत होतो ही माझी नित्याची प्रवृत्ती झाली होती. पुढे मला नाशिक मिळाल्यानंतर मी हे सर्व वर्णन 'नोकरशाहितील बाळूच्या गमतीजमती' या पुस्तकात नमूद केल्या आहेत. हे पुस्तक ज्ञान प्रकाशन पुणे यांनी छापले आहे. सदर पुस्तक ई साहित्य डॉट कॉमवर पण मोफत वासण्यासाठी उपलब्ध आहे तसेच Archive.org वर पण काळजीपूर्वक शोधल्यास आपणास मोफत डाउनलोडसाठी मिळू शकते. चला तर मग औरंगाबादवरून उमरखेडला. माझी ईच्छा तेथे जाण्याची मुळीच नव्हती म्हणून परत एकदा प्रयत्न करावा असे वाटले. आता मोठया साहेबांशी परत परत बोलणे म्हणजे महाशिव्या खाणे हा प्रताप मला करायचा नव्हता. मी एका त्याच कार्यालयातील वरीष्ठ लिपिकाला पकडले. त्यास थोडा मस्का मारला. म्हणतात ना... 'अडला नारायण गाढवाचे पाय धरी'. मी स्वत:ला नारायण समजण्याईतका भाग्यवान तर नाहीच पण जे काम भगवान करू शकत नाही ते असे सामान्य माणसे करू शकतात या मताचा मी आहे शिवाय यांचा रेटही कमी असतो. बस या कर्मचा-याला पकडले. त्यांनी मला एक सुमार्ग सांगितला......सर आपण येथे श्री. तांबी सरांना भेटा ते या कार्यालयात चांगल्या स्वभावावे कार्यकारी अभियंता आहेत. बदकांच्या कळपात एखादा राजहंस भेटावा असे मला वाटले. ठरल्याप्रमाणे मी त्या कर्मचा-याला घेवून श्री. तांबी सरांना भेटलो. या अधिका-याची वेगळीच व्यथा मला त्यांचे घरी आढळली. त्यांचा एक मुलगा मतिमंद अवस्थेत मला दिसला. मला वाटले ...यांचे जीवनात तर माझ्या जीवनापेक्षाही जास्त दु:ख आहे. हे तर माझ्यावर फारच चिडतील. म्हणून मी बोलण्याची सुरूवात ही वेगळीच केली.

"सर, मी पब्लिक स्कूलचा विदयार्थी आहे. माझे मंत्रालयात कोणीच ओळखीचे नाही म्हणून मला औरंगाबाद झोन मिळाले आहे आणि आता तर मोठया साहेबांनी मला उमरखेड दिले आहे. मी फार व्यथेत आहे सर".

त्यांनी शांततेने मला न्याहाळले. माझ्या डोळयातला प्रामाणिकपणा त्यांनी पाहला. ते प्रथम काहीच बोलले नाही. माझ्यासाठी लवकरच चहा करण्यात आला. ते चहा घेतांना थोडे हसले व म्हणाले.... "आऽरे मी सुध्दा औरंगाबाद पब्लीक स्कूलचाच विदयार्थी आहे. आपण पब्लिक स्कूलमध्ये बंधुभावाचे प्रेम निर्माण केले आहे तेही जातपात विसरून. मी थोडयाच वेळात ऑफीसला येतो. आणि मग बघू काय करायचे ते. आता तर मला शाळा मित्र भेटणे

म्हणजे माझ्या जीवनातला हा तिसरा देव होय. मी माझ्या या आत्मकथनामध्ये वारंवार देवाचा उल्लेख करीत असतो पण तुम्हास माहित आहे, मी वैज्ञानिक मताचा असल्यामुळे त्या ईश्वराला मानत नाही जे सर्वसामान्य मानतात तर माझा ईश्वर हा माणसात दिसणारा आहे. तो अदृश्य ईश्वर माझ्या काहीच कामाचा नाही. आम्हाला आमच्या शाळेत "उध्दरावा स्वये आत्मा" हेच शिकविले आहे. औरंगाबाद ही शाळा औरंगाबाद झोनची होती. पण त्या काळात अशा शाळा महाराष्ट्रात चारच होत्या त्यामुळे आमच्या एकमेकांच्या शाळेत व्हीजीट व्हायच्या. केवळ पब्लीक स्कूल हा शब्दच आजही आमच्या साठी एक 'ईश्वरीय आशिर्वाद' आहे.

ते ऑफीसला आले आणि कोणतीही अपेक्षा न करता मला त्यांनी माझ्या आवडीचे नाशिक हे स्थळ दिले. आणि तेही मुख्य अभियंता कार्यालय, उत्तर महाराष्ट्र प्रदेश नाशिक. मोठया कार्यालयात उपविभागीय अधिकारी ही जागा मिळणे माझ्यासारख्या पामराला फारच कठीण होते. हे माझे अहो भाग्य की, लवकरच मला नऊ खोल्याचा सरकारी बंगला म्हणजेच गंगोत्री बंगला राहाण्यासाठी मिळाला. गडचिरोली ते नाशिक 'ऑन प्रमोशन' हा माझ्यासाठी शाप वाटत असला तरी तो मी देवाचा प्रसाद समजून स्विकारला. मला तब्बल 75000 रूपये शासनाने बदली भत्ता दिला. मला नवल वाटले की, आपण विनंतीने जवळचे ठिकाण मागून शासनाचे पैसे वाचविण्याचा प्रयत्न करतो त्यावेळी ते मिळत नाही आणि शासन आपणास पनीशमेंट म्हणून खूप दूर फेकतात आणि शासन बदली भत्याच्या नावावर नियमानुसार स्वत:चे नुकसान करून घेतात. असो ही बाब नित्याचीच आहे. या भागात मी मुलीच्या यशाची कथा घेवून येणार होतो आणि माझीच व्यथा तुम्हाला सांगणे मला भाग पडले. तर वाचकांना पुढील भाग क्रमांक 31 मध्ये मुलीला जे भाग्यवान कन्यारत्न प्राप्त झाले ती कहाणी घेवून येईलच. पुढील भागात नाशिकच्या गंमती येतीलच.

****

11.मुलीचे यश

“माणसाचे जीवन हे संघर्षमय असले तरी, त्यातूनही जीवनात आनंद घेत राहणे हाच माणसाचा स्वभाव असायला पाहिजे,या मताचा मी आहे.”- प्रकाश राऊत

गडचिरोलीहून नाशिकला ट्रान्सफर झाली याचाही मी आनंद मानला. माझ्याकडे एक लहानशी मारूती कार होती त्यात मी जुजबी सामान घेतले व पत्नीसह निघालो. सकाळी पाच वाजता निघालो असेल. नागपूरला जातांना रस्ता विसरल्यासारखे झालो व भलतीकडेच एक कि.मी. भटकलो. बरं झालं तेवढया सकाळी दोन व्यक्ति भेटल्या व मला योग्य रस्ता दाखविला. मनात घाबरलो होती की, हे नक्षल तर नसावेत. ते अक्राळ विक्राळ दिसत होते.

चारशे चाळीस कि.मी.चा प्रवास आटोपून मी अकोला पोहोचलो. प्रवासात फार थकलो होतो कारण मीच स्वत: ड्रायव्हिंग केले होते. अकोला मुक्कामानंतर परत दुस-या दिवशी सकाळी सहा वाजता नाशिक जायला निघालो. जळगांवच्या दरम्यान कार पुसटशी एका ट्रकला लागली की काय माझ्या गाडीचा उजव्या हातावरचा आरसा पुर्णपणे तुटून बाहेर पडला. गाडीमध्ये मागच्या सीटवर खचाखच सामान भरले होते त्यामुळे मागील काही दिसत नव्हते. आजच्या प्रवासात एक ठोकर रस्त्यातल्या मुंगुसाला पण लागली. मला वाटले आजचा प्रवास जरा अपशकूनीच वाटतो. जळगांवला आरशाचा कांच बसवणे अत्यावश्यक वाटले. तेथे एक तास मारूती शो रूममध्ये विनाकारण गेला.

जळगांववरून निघत नाही तोच गाडी एका चौकात ट्रॅफीक पोलीसाने अडवली. तो म्हणाला....”साहेब गाडीत लगेज जरा जास्तच झाले आहे”. मी बोललो..’मी शासनाचा वर्ग दोन अधिकारी आहे. कृपया शासनाला सांगा की, कर्मचा-यांच्या बदल्या ईतक्या लांब करू नका. मी काय करणार मला जुजबी सामान नेणे तर आवश्यकच आहे नां!’ त्याचे समाधान झाले कारण तोही एक शासनाचाच शिपाई होता. शिवाजींची आग्र्याहून सुटका व्हाही, तशी दंडाविना माझी सुटका झाली.

शेवटच्या टप्प्यावर मात्र मी खूप थकलो होतो. मला झोपपण लागत होती. स्टेअरींगवर झोपणे म्हणजे एकासोबत दुस-याचा घात होवू नये म्हणून मी एका टपरीवर पांचट चहा घेतला. क्षणभर माझी झोप मोडली व नाशिक गाठले सायंकाळी सात वाजता. सरकारी 'गंगोत्री बंगला' माझी वाटच पहात होता. 1960 ला बांधला असावा, अशी त्याची परिस्थिती होती. पण रोडवर असल्यामुळे त्यातही मी आनंद मानला. नाशिकचे वातावरण ईतके सुंदर होते की, मी विदर्भातून तेथे प्रथमच गेलो असल्याने मला हिमालयातच आल्यासारखे वाटले. आमच्या कडे खूप उष्णता आहे व तेथे फारच गोड वातावरण होते. आल्हाददायक वातावरणाचा पहिला अनुभव अवर्णनीय असा होता. त्याचे वर्णनापेक्षा त्या नाशिकचा अनुभव प्रत्यक्ष तुम्ही घ्या. कोठे 47 डिग्री तापमान व तेथे तर 40च्या वर कधीच तापमान जात नाही असे मला एका अनोळखी माणसाने सांगितले.

नाशिकला मी शासन सेवेसाठी कामावर रूजू झालो. सगळं जीवन कसं आनंदी चाललं होतं पण मला वारंवार माझ्या कन्येची आठवण येत होती. तिच्यावर दोनदा बाळाचे अपयश पदरी पडले होते. ते मला भावत नव्हते. मी तिला तिस-या गर्भाचे वेळी मुद्दाम नाशिकला बोलावून घेतले. कितीही म्हटले तरी आईचे प्रेम हे आईच देवू शकते. सासू सासरे कितीही चांगले मिळाले तरी ती माया मुलीला तिचे सासरी मिळत नाही, असे माझे मत आहे.

तिला तिच्या ईच्छेनुसार माझे जावई श्री. सचिनराव यांनी माझेकडे आणले. चांगल्या डॉ. ची शोधाशोध झाली. डॉ. रणजीत मेहता यांचे नाव सर्वांनी सूचविले. मी तो दवाखाना पाहला तेंव्हा एवढी गर्दी होती की, नंबर मिळणे दुरापास्त झाले. तरी मला तेथे कन्येसाठी उपचार घेणे भागच होते. डॉक्टर म्हणाले... "तुमच्या मुलीची केस फारच गुंतागुतीची आढळते आहे. मी सांगणा-या सूचनांचे तुम्ही तंतोतंत पालन केले तरच अशा केसेस माझ्याकडे 95 % यशस्वी होतोत. तसेच या बाबीसाठी खर्चही फार लागण्याची शक्यता आहे. तयारी असेल तर बोला". मी क्षणभर विचार केला आणि होकार दिला. सचिनराव जावई पण या गोष्टीसाठी अंतिम उपाय म्हणून तयार झाले होते. पैशाची चिंता यावेळी मात्र मला व जावयांना वाटली नाही. कारण आम्हा दोघांचीही परिस्थिती ठिकठाक होती. माझी कन्या मृदुला ही तर इतकी तयार होती की, जणूकाही विषाची परीक्षाच तिला दयायची आहे.

नेहमी दवाखान्यात जाणे व डॉक्टरांच्या अत्यंत कठिण अशा अटीची मान्यता स्विकारणे हा सर्वांसाठी यक्षप्रश्न होता. अटी ईतक्या भारी की, तिला रोजच एक इंजेक्शन स्वत:चे हाताने घ्यावे लागायचे. या व्यतिरिक्त एक्स्ट्रा दोन इंजेक्शन वेगळेच. तिच्या जीवाची ही अग्नी परीक्षाच

होती. जसे जसे दोन महिण्याचा कालावधी सरकत होता तसेतसे श्री. सचिनराव यांनाही वाटत होते की, यावेळी तरी हिला बाळाच्या स्वप्नाचे सुख मिळेल की, नाही. पण प्रयत्नांती परमेश्वर असे चालले होते. सचिनराव तर निश:द्ब झाले होते. त्यांचे मात्र पुलगांववरून रेल्वेने येणे जाणे दर आठवडयाला चालू होते.

याच काळात एका लहानशा मांजराच्या पिल्याने आमच्या बंगल्यात प्रवेश केला. मी लाडाने तिला दूध पाजले. मांजर पुढे पुढे माझ्या एवढी अंगावरची झाली की, कॉलनीतील लहान मुले मला ‘मांजरीचे पपा’ म्हणू लागली. मला ही त्यात काही वावगे वाटत नव्हते कारण जशी माझी कन्या तशी ती होती. तिचे लडिवाळ खेळणे व माझ्या मुलीचे जवळ असणे आम्हा उभयतांना खूप आनंद देत होते. ईकडे मांजरीच्या पिल्याची वाढ व तिकडे कन्येचा गर्भ सारखा वाढत होता. याआधी दोनदा माझ्या कन्येला जे अपयश आले ते यावेळी येणारच नाही असा आम्हा दोघांचाही आत्मविश्वास होता. पहाता पहाता दिवस निघून गेले. दिनांक 7.05.2013 ला एक गोंडस कन्यारत्न आम्हाला यशस्वीरित्या मिळाले. हा असा तिच्या जीवनातला सर्वात मोठा क्षण होता. ती व जावई ईतके आनंदी झाले की, या कालावधीत झालेला त्रास व पैशाचा विनियोग ते पार विसरून गेले. याच काळात मृदुलाचे सासरे श्री. आर. बी. गरपाळ व सासूबाई

नलिनीताई सर्व नातेवाईकांसह नाशिकला आले होते व जवळपास त्यांनी सात दिवस तेथे मुक्काम केला. हे सर्व मृदुलाच्या प्रेमापोटी. साधारणपणे दिड दोन लाख रूपये खर्च झाले असावेत, म्हणून मी सिझेरीनचा खर्च आनंदाने दिला. बरेचदा जीवनात पैशापेक्षा सुखाला जास्त महत्व असते हे सर्वांच्याच लक्षात आले. अशाप्रकारे नाशिक आम्हाला भाग्याचे ठरले. लहान बाळाचे म्हणजे मुलीचे नांव माझ्या मुलाने म्हणजे ‘आशय’ ने चार्वी असे ठेवायचा आग्रह केला. ते नांव सर्वांना आवडले. पण मी मात्र तिचे नांव ‘श्रुंगी’ असे ठेवले होते. या नावावर शेवटी डॉ. रणजीत मेहता सुध्दा म्हणाले की, हे नांव फार जुने आहे. शेवटी चार्वी हे नांव फायनल झाले. डॉ. रणजीत मेहता यांचे अथक प्रयत्न व ‘सप्तश्रुंगी देवी’ ची तसेच ‘नवशा गणपती’ ची कृपा आम्हा दोन्ही कुटुंबांना लाभी ठरली हे आता वेगळे सांगायची आवश्यकता नाही.

माझ्या जीवनातले काही प्रसंग विशेषत: 1998 चे सांगायचे राहून गेले आहे. त्याकाळात मी व माझ्या पत्नीने काही शैक्षणिक प्रगती केली. तसेच मी योगवर्ग घेण्यात केवळ यशस्वी झालो नाही तर अशा प्रकारच्या लोकसेवेत अमरावतीमध्ये मी कसा प्रसिध्द झालो हे अर्थात पुढील भागामध्ये घेवून येतो आहे.

****

12.माझी जनसेवा व प्रसिध्दी

“The highest result of education is tolerance” – Hellen Keller

1995 ला अमरावतीला आलो. 1996 च्या जानेवारी महिण्यात मला शासनाने सहा महिण्याच्या ट्रेनिंगवर औरंगाबादला पाठवले. मुलगा आशय केवळ नऊ वर्षाचा होता. तो ज्ञानमाता कॉन्हेंटमध्ये तिस-या वर्गात नुकताच गेला होता आणि मला बायकोला सोडून औरंगाबादला जावे लागले. ट्रेनींग नव्हतेच ते. तो शासनाचा Diploma in water and Land management पदविका कोर्स होता. त्यावेळी असा नियम निघाला होता की, असा कोर्स करणे सर्व अभियंत्यांना अनिवार्य होते. त्यात माझाच नंबर लागावा हे माझे दुर्भाग्य होते. पण शासनात झालेल्या काडया करणा-या कर्मचा-यासाठी अशी कोणाला शिक्षा दयावी ही एक पर्वणीच असते. असो. मी यशस्वीरित्या तो पूर्ण केला. सहा महिण्याचे कालावधीत मला दर दुस-या शनिवारी व रविवारी मुलांच्या भेटीचा योग येत होता. मी 73% घेवून तो पूर्ण केला. मुलगी मृदुला तेंव्हा आठव्या वर्गात जिल्हा परीषद कन्या शाळेत शिकत होती. मी तिच्याकडेही फारसे लक्ष देवू शकलो नाही. त्याचा परीणाम काय झाला हे मी मागील भागात सांगितले आहेच.

वर म्हटलेले ‘हेलेन केलर’ या लेखिकेचे म्हणणे खरे ठरले व अशा उपरोक्त हायर एज्युकेशनमुळे माझी सहनशक्ति (Tolerence) वाढली होती, हे तितकेच खरे आहे. मी अभियंता असलो तरी मला कला शाखेची आवड असल्याने यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्तविदयापीठाची बी.ए. परीक्षा देण्याची हुक्की आली. मी रितसर ओपन युनिव्हरसिटीच्या परीक्षेला बसलो. प्रथम वर्षात प्रथम श्रेणीत पास झालो म्हणून मी दुस-या वर्षाला मानसशास्त्र व ईंग्रजी साहित्य हा विषय घेतला. ईंग्रजी विषयात मला गोडी निर्माण झाली त्याचे अजून एक महत्वाचे कारण आहे. मला एका अठ्ठावीस वर्ष वयाची शुक्ला मॅडम शिकवायला होती. वर्ग हा केवळ रविवारी असायचा कारण मुक्त विदयापीठात रोजचे वर्ग नसून केवळ मार्गदर्शनासाठी

रविवार ठरविला असायचा. आनंददायक गोष्ट अशी की, लिटरेचरला मी एकच विदयार्थी होतो. बस फक्त ‘ती आणि मी’ असा संगम होत होता. तिला माझ्याबाबत काय आकर्षण वाटले मला माहित नाही पण तिने माझा सरकारी क्वार्टरवरचा फोन नंबर मागितला. मी त्यावेळी नुकताच एक लँडलाईन फोन घेतला होता. मी मोठया आनंदाने 07212662392 असा क्रमांक तिला दिला. तिनेही तिच्या घरचा नंबर मला दिला. मी ही बाब मुद्दाम तुम्हाला मनोरंजन मिळण्याचे हेतूने सांगत आहे. वास्तविक माझी ईंग्रजी ही आधीपासूनच चांगली असल्याने, तिला मला शिकवायला किंवा मार्गदर्शन करण्यासाठी फारसा त्रास घ्यावा लागला नाही. पण मला एका गोष्टीचे फार नवल वाटत असे, ते असे की, मी तिच्यापेक्षा दहा वर्षाने मोठा होतो तरी तिने मला असा धडा शिकवायला घेतला की , ज्यामध्ये एका बेचाळीस वर्षाच्या माणसाचे सोळा वर्षाच्या मुलीशी प्रेम जडते. मी असे शक्य नाही या विषयावर बोलत असे व ती मात्र असे घडू शकते असा उपदेश माझ्यासारख्या मोठया माणसाला करत होती. एक पासून तर पंचेवीस ईंग्रजी धडे अभ्यासक्रमात होते मग रँडमली याच धडयाची निवड तिने कां करावी, याचे नवल वाटायचे. असो ..माझा अभ्यासीय प्रवास मोठा आनंदात घडत होता. मी त्यांचेकडे जावून काही ईंग्रजी पुस्तके अवांतर वाचनासाठी आणली होती. त्यातली काही पुस्तके मला आवडल्यामुळे मी चक्क ती दाबली असे म्हणावयास हरकत नाही. पण तिला त्याचे काही सोयरसुतक नव्हते. तिला मी थोडयाफार प्रमाणात आवडत असावा, असा माझा गोड गैरसमज आहे. कालांतराने मी बी.ए. मानसशास्त्र व ईंग्रजी साहित्यासह प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झालो. मला पदवीधर होण्याच्या आनंदापेक्षा चांगली शिक्षिका मिळाली हाच आनंद जास्त वाटत होता. अशा क्षणिक मिळणा-या सुखात वाहून जावू नये अशा प्रकारचे टॉलरन्स पण मी या शिक्षणातून शिकलो.

मला जीवनात काहीना काही वेगळे करण्याची संवयच आहे. मग मी विचार केला की, लहानपणी मी जिमनॅस्टीकमध्ये प्राविण्य मिळविले होते त्याचा काही या वयात उपयोग होतो काय. मी योगा शिकण्याचे ठरविले. लगेच योग विदयाधाम नाशिक येथे जायचे ठरविले. त्यावेळी मी अमरावतीत कार्यरत होतो. ही गोष्ट मी आपणास 1998 ची सांगत आहे त्याचा नंतरच्या नाशिक ट्रान्सफरशी काही संबंध नाही. मी एक महिण्याची सुट्टी केवळ योगा क्लास करण्यासाठी घेतली व नाशिक गाठले. तेथे नाशिकचे योगविदयापीठ कुलगुरू श्री. मंडलीक सरांची भेट घेतली. पहाता पहाता मी तो कोर्स एक वर्षात पूर्ण केला. योगप्रवेश, योगपरीचय व योगशिक्षक असा कोर्स पूर्ण करूनच मी अमरावतीला आलो. आणि समाजसेवा या हेतूने मोफत योगवर्ग अप्पर वर्धा कॉलनीच्या हॉलमध्ये सूरू केले. वर्ग ईतके लोकांना आवडले की

मी लवकरच अमरावतीमध्ये योगशिक्षक म्हणून प्रसिध्द झालो. तव्दतच मी योग या विषयावर व्याख्याने देवू लागलो. मी नांदुरा, कळंब, अमरावती परीचारिका ट्रेनिंग ईत्यादी ठिकाणी व्याख्याने दिलीत. त्याचा परीणाम असा झाला की, मला शासकीय तंत्रनिकेतन अमरावतीला योगवर्ग शिकविण्याचा योग आला. त्या विदयार्थ्यांना दोन केडिट गुण मिळायचे व मला चाळीस रूपये एका पिरीयडचे मानधन मिळत होते. हा आनंदही मी जीवनात घेतला. सांगण्यासारखे बरेच काही आहे. मी मध्यंतरी उर्दू शिकण्याचाही प्रयत्न केला आहे. कारण मला विविध भाषेची आवड आधीपासूनच आहे हे माझ्या तोतलाडोह प्रसंगामध्ये मी वर्णन केले आहे. असे बहूरंगी व्यक्तिमत्व असल्यामुळे तुम्हालाही माझे आत्मकथन वाचण्यात मजा येत असेल तर मी पुढील भागामध्ये बाँसरी आणि कॅसिओ वाजवायला कसा शिकलो हे अर्थात पुढे सांगणारच आहे. तर मित्रांनो पुढील भागाची आवर्जून वाट पहा.

****

13.शासन सेवानिवृत्ती

आयुष्याचे शासन सेवेतील शेवटचे क्षण 2010 पासून नाशिकला गेले. तेथे माझी कन्या मृदुला हिला कन्यारत्न प्राप्त झाले. हे मागील भागात आले आहे. नाशिकच्या कार्यालयात मला हायर ऑफीस असल्यामुळे फारसे काम नव्हते. त्याचाच फायदा घेवून मी एक पुस्तक लिहायचा प्रयत्न केला. ‘नोकरशाहितील बाळूच्या गमतीजमती’ हे पुस्तक ज्ञान प्रकाशन पुणे यांनी छापले. या पुस्तकात मी सरकारी नोकरीतील ब-याच गमती लिहिल्या आहेत. याची प्रत वाचकांना मोफत वाचावयास मिळावी यासाठी ई साहित्या डॉट कॉमवर सुध्दा अपलोड केले आहे. रॉबीन शर्मा म्हणतात की, माणसाने तीन गोष्टी जीवनात करायला पाहिजे. एक तरी झाड लावणे, एक स्वत:चे मूल असणे व किमान आयुष्यात एक पुस्तक लिहिणे.

या उक्तिनुसार माझे पुस्तकाचे काम पूर्ण झाले. दुसरे महत्वाचे काम म्हणजे मी याच काळात आडवी बाँसरी वाजवायची प्रॅक्टीस केली. मला लहानपणापासून उपजतच बासरी वाजविता येत होती. पण मी उभी बाँसरी वाजवायचो. आता क्लासिकल शिकावे या हेतूने मी एक दोनशे रूपयाची बाँसरी विकत घेतली. सुरूवातीला काही दिवस तर मला त्याची फुंकरही जमत नव्हती. हळूहळू मला ती बाँसरी वाजवता येवू लागली. मी एक दोन माझे व्हिडिओ यु टयुबवर पण अपलोड केले आहेत.

नाशिकला माझ्या बंगल्यावर जी मांजर होती. ती अतिशय लाडकी झाली होती. पण काळाने तिलाही आपलेसे केले तेंव्हा मला खूप दु:ख झाले होते कारण तिच्यासाठी मी व्हिस्कस कंपनीचा खाऊ आणत होतो. तो तिला खूपच आवडायचा. तिचे लडिवाळ व्हिडीओ अजूनही माणे संगणकात सुरक्षित ठेवले आहे. माझा स्वभाव थोडासा गंमतीदार असल्यामुळे माझ्या कार्यालयातील स्टाफचे सुध्दा माझ्यावर खूप प्रेम होते. नाशिकचा साडे चार वर्षाचा काळ कसा निघून गेला हे मला कळलेच नाही. आमच्या कार्यालय परिसरात एक सार्वजानिक वाचनालय होते त्याचा मी चार वर्षात खूप उपयोग घेतला. तसेच ‘व्यासपीठ’ नावाचे मासिक निघायचे त्यातही मी लेख लिहित असे. नाशिकला असतांना मला प्रसिध्द लेखक श्री. भालचंद्र नेमाडे यांनाही पाहण्याचा योग आला होता.

फारच महत्वाची घटना म्हणजे माझे पब्लीक स्कूलचे मित्र श्री. रविंद्र जाधव हे त्यावेळी नाशिक ला कमिशनर होते. त्यांचा सहवास तर फारच आनंददायी वाटत होता. आम्ही दोघेही

कान्हेरे मैदानमध्ये रोज फिरायला येत होतो. तसेच आमचे दोघांचेही सरकारी बंगले जवळ जवळच होते. ते क्षण अविस्मरणीय आहेत. एकंदरीत नाशिकचे जीवन फारच आनंदात गेले. सेवानिवृत्तीनंतर मी अमरावतीला स्थायी झालो कारण मी येथे आधीच एक फ्लॅट घेवून ठेवला होता.

मी नाशिकवरून 30.11.2013 ला रिटायर्ड झालो. सर्व मित्रांचा सहवास सोडतांना मला ईतके वाईट वाटले की, निरोप समारंभातच माझे डोळे पाणावले. सर्वांना स्नेहभोजन दिले. परत यायला निघालो पण तत्पूर्वी मला वाटले मुलाकडे हैदराबादला पंधरा दिवसासाठी जावून यावे. आता तर सेवानिवृत्तीमुळे मी रिकामाच होतो. कार घेवून हैदराबादला गेलो. तेथे दोन दिवस राहात नाही तर लगेच एक विचित्र घटना घडली. माझ्या बंगल्यात चोरी झाली. नऊ खोल्याच्या बंगल्यात चार कुलुपे लावली होती. ती सर्व चोरांनी तोडली. त्योना वाटले असेल की, या साहेबाला रिटायर्डमेंटचे खूप पैसे मिळाले असतील आणि ते यांच्या बंगल्यात असतील. पण त्या मुर्खाला हे कळले नाही की, शासनाचे पैसे हे चेकने अकाउंटला जमा होत असतात. त्याने एथेच्छ विहार केला आणि दोन आलमा-या फोडल्या. बिचा-याला काहीच सापडले नाही. माझ्या जवळ सोन्यानाण्यापेक्षा पुस्तकांचाच भंडारा त्यास दिसला. व तो मग साधे भांडेकुंडे घेवून पळाला. माझ्यासारख्या ईमानदार ईंजिनियरजवळ चोरी करून तो खूप पस्तावला असेल असे मला वारंवार वाटायचे. एका पुस्तकात एक सोन्याचा गोफ लपविला होता तेवढा सुरक्षित राहला. एकंदरीत फारसे नुकसान झाले नाही. मला जिन व्हॅलजीनची गोष्ट आठवली. बिचारा जिन व्हॅलजीन एकदा बिशॉपच्या घरी भल्या पहाटे चोरी करावयास गेला असता बिशॉपने त्याला रात्रभर आराम करण्यास सांगितले. तो भल्या पहाटे उठला व चोरी करायला लागला. तेंव्हा बिशॉप त्यास म्हणाला की, आरामात तुला काय हवे असेल ते तू नेवू श्कतोस. अशी घाई करू नकोस जरा पहाट तर होवू दे. असेच मला ही वाटले की, हाच चोर जर मी असतांना आला असता तर माझ्या बायकोने त्यास सुग्रास भोजन दिले असते व मी त्याला हव्या त्या वस्तू दिल्या असत्या. मी जेंव्हा सामान घेवून आलो तेंव्हा आम्ही उभयतांनी कॉलनीतील लोकांना पुष्कळ वस्तू वाटल्या. असो . शासनसेवा संपली आणि आनेद आणि दु:खाचे मिश्रण झाले. आनंद यासाठी की, मी शासन कटकटीतून सुटलो आणि दु;ख यासाठी की, मला सर्व स्टाफला सोडून यावे लागले. शिवाय नाशिकचे ते अतिसुंदर थंड वातावरण. ते आता यापुढे मिळणे नाही.

अमरावतीचा काळ कसा जात आहे हे सांगण्यापूर्वी मी परत एकदा माझ्या मुलाच्या पुढील जीवनाची छोटीसी कहाणी घेवून भागामध्ये आपली भेट घेईलच. आभार.

****

14.आशयचे भवितव्य

“You can have friendship and youcan have love, but it’s only when you have both together that it will be a great love”.- Picture Quotes.com

“ एखादयाशी मैत्री असावी, एखादयाशी प्रेम पण असावे.पण जेंव्हा की, मैत्री आणि प्रेम असे दोन्ही असेल तरच त्याला खरे प्रेम म्हणावे”.- पिक्चर कोट्स डॉट कॉम.

2013 ला झालेल्या माझ्या सेवानिवृत्तीनंतर मी व माझी पत्नी माझा मुलगा आशय याचेकडे, त्याचे आग्रहास्तव एक महिणा राहाण्यासाठी हैदराबादला गेलो. माझा मुलगा तेथे एकटाच राहात होता. मी बाँसरी वाजवून माझे मनोरंजन करीत असे. माझ्या घरी अर्थात त्याचे भाडयाचे घरी नेहमी त्याची एक मैत्रिण वारंवार येत होती. मुलगी दिसायला सुंदर होती. तिचा स्वभाव पण अतिशय चांगला होता. ती सुध्दा याच्यासारखी एम.टेक. झाली होती. दोघांचे एकमेकांना मदत करणे, त्यांचे एकमेकाशी आढळून आलेले स्मितसंबंध यावरून त्या दोघांची घट्ट मैत्री असल्याचे दिसत होते.

हे दोघेही वेगवेगळया नामांकित कंपनीमध्ये काम करायचे. कालांतराने कळले की, तिचे नांव ‘पल्लवी’ असे आहे. एक दिवस अचानक त्याचा मला अमरावती आल्यानंतर फोन येतो की, ‘पप्पा, तुम्हाला पल्लवी कशी वाटते.’ मी त्याला काय म्हणायचे हे समजून गेलो. मैत्रीचे रूपांतरण प्रेमात झाले असावे अशी खात्री वजा संशय मनात आला. दोघेही स्वभावाने विनयशील असल्यामुळे दोघांनीही आपापल्या पालकांची परवानगी घेतली व ते 20 जानेवारी 2017 ला प्रेमबंधनातून विवाहबंधनात सर्वांच्या मर्जीने सुखमय वातावरणात भावी जीवन-प्रवेश घेते झाले. दोघांचेही टयुनींग चांगलेच जमले. केवळ एक वर्षाच्या कालावधीतच दोघांनीही काटकसरी संसारातून एक घरकूल हैदराबाद येथे उभे केले. आम्हाला ते दोघे स्वपायावर उभे झाल्यामुळे अत्यानंद झाला. तिचे वडिल शासनाच्या अभियांत्रिकी महाविदयालयात अमरावती येथेच प्राध्यापक पदावर असल्याचे आढळले. ती घरची सधन असूनही तिच्यामध्ये अहंकाराचा

लवलेशही आढळून आला नाही. दोघांचाही संसार सध्या अत्यंत आनंदाने भारत देशाबाहेर विदेशात सुरू आहे. दोघेही बाहेर देशात असून त्यांचा रोज आम्हाला, तसेच आमच्या व्याह्यांना दूरध्वनीवरून किंवा दृश्यध्वनीवरुन संपर्क होत असतो. आम्ही उभयंतांनी मुलगा व मुलगी या दोघांनाही मोठया कष्टमय जीवनातून घडविले याची जाणीव दोघानांही आहे. हीच फार मोठी जमेची बाजू आहे. हीच आमची सर्वात मोठी संप्पती आहे, असे आज वाटते.

गीतेमध्ये म्हटले आहे की, “विद्या विनयेन शोभते”, या उक्तिनुसार माझा मुलगा, सून,पल्लवी, माझी मुलगी मृदुला आणि आमचे एकमेव लाडके जावई श्री. सचिनराव ही सर्व मंडळी आमचा ‘लव्हींग हार्ट’ चा गट आहे. तद्वतच माझे मुलीकडचे व्याही श्री. आर. बी. गरपाळ आणि मुलाकडचे व्याही श्री. प्राध्यापक डॉ. अशोक मतानी सर ही सर्व मंडळी अतिशय आदरणीय असून आम्हा उभयतांसाठी एक सुवर्णपर्वणीच आहे, असे नेहमी वाटते.

मतानी सरांचे एक वैशिष्ठय असे की, ते अत्यंत धार्मिक प्रवृत्तीचे असून ते नेहमी दान करण्यात अग्रक्रमी असतात. कोणतेही मंदीर असो, की एखादा गरीब व्यक्ति असो वा व्याही संबध असो ते कसे निभवावे हे त्यांना फारच चांगले माहित आहे. हा त्यांचा गुण सर्वसामान्यांना जीवनात पाळणे हे अतिशय कठीण काम आहे. प्रत्येक महिण्यात बालाजीचे दर्शन असो की मग शिरडीचे साईबाबांचे दर्शन असो ते नित्यनियमाने जात असतात.

माझे सध्याचे सेवानिवृत्तीचे जीवन हे अत्यंत समाधानाचे व सुखाचे जात आहे. मला कोणत्याच प्रकारजी काळजी नाही म्हणून तर मी ही जीवनाची आत्मकथा लिहू शकत आहे.जीवन यशस्वी होण्यासाठी सर्वांचे संबंध चांगले असणे ही योगायोगाची बाब असली तरी ब-याच अंशी ते आपल्या स्वभावावर अवलंबून असते असे मला वाटते.

प्रचंड वाचनातून होत असलेला ज्ञानप्रवाह, चांगल्या स्वभावातून निर्माण होत असणारा लोकसंबंध, जीवनात सुयोग्य पत्नीचे सहकार्य, मुलाबाळांचा विनयशीलपणा, या सर्व बाबी भाग्यवंतांनाच लाभतात. तसेच चांगले आरोग्य ही सुध्दा ईश्वराचीच कृपा आहे. जीवनात अहंकार नसेल तरच या सर्व गोष्टी शक्य होतात. ही माझी भावना आहे. संघर्षमय जीवनप्रवाहातुन सुखमय जीवनप्रवाहात प्रवेश मिळणे यालाच आपण भाग्य म्हणतो पण हे भाग्य मिळविण्यासाठी जे अहोरात्र प्रयत्न करावे लागतात. त्यातूनच अशी प्राप्ती होत असते हे त्रिवार सत्य आहे.

पुढील भागामध्ये जीवनात वाचनाचे काय महत्व आहे ते मी माझ्या अनुभवावरून सांगण्याचा प्रयत्न करेन. साठविलेली पुस्तके पुढील पिढीच्या कामातही येवू शकतात. काळ कितीही बदलला तरी ज्ञान हे कधी जुने होत नसते. म्हणूनच तर ईंटरनेटच्या जाळयावर फार जुनी अशी दुर्मिळ पुस्तके डिजीटल स्वरूपात साठविलेली आहे. तर बघु या पुढील भागाची माहिती आपणास किती रोचक वाटते ती.

****

15.वाचनाची आवड

" Reading is like breathing in, writing is like breathing out."- Pam Allyn (Ref: Picture Quotes.com)

सेवानिवृत्त झाल्यानंतर मी जीवनाचे सिंहावलोकन केले असता असे आढळले की, माझे संपूर्ण आयुष्य हे मी वाचनात घालविले आहे. मी वाचनाचा छंद फारच जोपासला आहे. अगदी लहानपणापासून तर आतापर्यंत मी जवळपास एक हजारचे वर पुस्तके वाचली आहेत. लहानपणी माझे मोठे बंधू श्री. किशोर यांनी मला ईंग्रजी वाचनाची संवय लावली होती. ते मला ईंग्रजीत पत्र लिहित असे. माझ्या वडीलांचे दोन गुणधर्म माझ्यात उपजत उतरले. एक म्हणजे वाचन नियमीत करणे व संगीतात आवड. ते उत्तम हारमोनियम वाजवित असे. व भजन पण म्हणायचे. कालांतराने त्यांचे कान गेले व त्यांनी हा हारमोनियम वाजविणे सोडून दिले. ते उत्तम प्रकारचे मल्लखांब पटू सुध्दा होते त्यामुळे मी लहानपणापासून जिमनॅस्टीक पटू झालो होतो.

वाचन, लिखाण, कविता करणे, त्यांना चाली लावणे, योगामध्ये रूची, व्याख्याने, अभियंता होणे असे बहूरंगी माझे जीवन घडले आहे. कला शाखेतही पदवी मिळविणे ईत्यादी. वर दिलेल्या कोटेशननुसार वाचन आणि लिखाण माझे श्वास प्रश्वास झाले आहे. वयाच्या सतराव्या वर्षापर्यंत मी ह.ना.आपटे, गो.नि.दांडेकर, साने गुरूजी, रविंद्रनाथ टागोर,प्रेमचंद, गुलशन नंदा, सुरेंद्र मोहन पाठक, रानू, वि.स.खांडेकर,प्र.के.अत्रे,पु.ल.देशपांडे,राम गणेश

गडकरी,स्वामी विवेकानंद,नवीन लेखकात व.पु.काळे,अच्युत गोडबोले, मोहन आपटे, विश्वास पाटील, शिवाजी सावंत, भालचंद्र नेमाडे अशी कितीतरी मराठी लेखकांची पुस्तके जीवनात वाचून काढली. त्यांनतर वय वाढल्यानंतर तर ईंग्रजी लेखकांमध्ये ईरव्हींग वॅलस, सिडने शेल्डॉन, फ्रेडरिक फोरसिथ, जेफ्रे आर्चर, ओशो, जे कृष्णमूर्ती, सिग्मंड फ्राईड, सिसेलिया अहेर्न,जेम्स पॅटरसन असे कितीतरी ईंग्रजी पुस्तके केवळ वाचलेली नाहीत तर त्याचा हार्ड कॉपी व डिजीटल कॉपींचा संग्रह माझे कडे आहे. मी सध्या किंडल या अप्लीकेशनवर पुस्तके वाचत असतो. याशिवाय कोबो रीडर, मायक्रोसॉफ्ट रीडर, कॅलीबर रीडर, ॲडोब रीडर, सुमात्रा पिडीएफ असे अनेक प्रकारचे रीडर्स माझ्या संगणकावर आहेत. विविध प्रकारचे विश्वकोशही मला जमविण्याचा छंद आहे. त्यात ब्रीटानिका एनसाक्लोपिडीया, मायक्रोसॉफ्ट एनसायक्लोपिडीया, मराठी विश्वकोशाचे चार हार्ड कॉपी खंड व डिजीटल कॉपीमध्ये तर सर्व नऊ खंड माझे संग्रही आहेत. मला नाशिक कार्यालयात एका अभियंतयाने एक प्रश्न विचारला होता की, सर आपणास वाचतांना कंटाळा येत नाही काय? हा प्रश्न श्री. किरण चौधरी शाखा अभियंता याने विचारला होता. याचे उत्तर असे की, मला वाचण्याचा कधीच कंटाळा येत नाही. भाषा कोणतीही असो मराठी, ईंग्रजी, हिंदी मी एकदा हातात पुसत्क घेतले की ते वाचून पूर्ण करतोच. हे सर्व लिहिण्याचा हेतू केवळ एवढाच आहे की, आजकालच्या पिढीने त्यांचा कल वाचनाकडे करावा. याची मला जाणीव आहे की, सध्याचे युग हे दृकश्राव्य माध्यमाचे आहे तरी सुध्दा वाचन कल हा हवाच. गीतेमध्ये असा उल्लेख आला आहे की, “न हि ज्ञानेन सदृशम् पवित्रमिह विदयते.” याचा अर्थ ज्ञानासारखे पवित्र या जगात काहीच नाही, हेच मला सांगावयाचे आहे. या लेखात आत्मप्रौढीचा भाग आहे असे वाचकांनी चुकुनही समजू नये. या सर्व सत्य बाबी मी लिहिल्या आहेत.

पुस्तके जुनी असो वा नवीन ती कशी गोळा करावी हा सुध्दा एक जीवनात खूप महत्वाचा भाग तसेच कला आहे. पुस्तक जमविण्याचे कलेबाबत सहसा कोणी मार्गदर्शन करीत नाही. व आजकाल तर हया गौष्टी कोणाला रूचत पण नाही तरी सुध्दा मी काही मार्गदर्शन पुढील भागामध्ये करीन.

****

16.माझा सेवानिवृत्तीनंतरचा काळ

मागील भागात मी भरपूर वाचन केले आहे हे सांगितले आहे. पण पुस्तके जमविण्याची कला मी कशी जोपासतो ते या भागात कथन करण्याचा विचार आहे. सर्व प्रथम आपण हार्ड कॉपींचा विचार करू. सध्या तरी पुस्तकांच्या गोपनीय धोरणानुसार सर्व पुस्तकांच्या हार्ड कॉपीज या मार्केटमध्ये महाग वाटतात. सर्वसाधारणपणे चारशे पानाचे पुस्तकाची किंमत ही साडे तीनशे रूपये असते.आपण पुस्तक वाचले की, ते जर कोणाला वाचायला दिले तर ते वापस कधीच येत नाही हा सर्वांचाच अनुभव आहे. आपल्याजवळचे पुस्तक तर कोणी विकत घेण्याची शक्यता नगण्यच असते. मग नाईलाजास्तव ते एकतर जवळ संग्रही ठेवावे लागते किंवा एखादया लायब्ररीत दयावे लागते. ही झाली संग्रहाची व्यथा पण त काहिही असो एकंदरीत असा साठा करणे, हे पुढच्या पिढीच्या दृष्टीने मला महत्वाचे वाटते.

असा अनुभव आहे की, मराठी पुस्तके सहसा भंगारमध्येही मिळत नाही त्यामुळे मी माझा कल ईंग्रजी कडे वळवला. सुरूवातीला मी गोरखपूर प्रकाशनची पुस्तके जमवायचो कारण एकतर ती स्वस्त असतात. ईंग्रजी पुस्तके रस्त्यावर कमी दरात मिळतात. मला मोहन आपटे व निरंजन घाटे यांची पुस्तके खूप आवडायची म्हणून मी ती विकतच घेत असे. तसेच व.पु. काळे हे लेखक मला फार आवडतात. त्यांची लिखाणाची शैली ही निराळीच आहे. ते मला वि.स. खांडेकरांपेक्षाही जास्त आवडतात. तसेच शिवाजी सावंतापेक्षा मला विश्वास पाटीलांची पुस्तके विशेष आवडतात. अर्थात हा माझा वैयक्तिक प्रश्न आहे.

पुस्तकांच्या सॉफ्ट कॉपीजच्या बाबतीत माझा वेगळाच अनुभव आहे. कारण ईंटरनेटवर शोध व्यवस्था भरपूर प्रमाणात असल्यामुळे मी शक्यतोवर मोफत पुस्तके पिडीएफ फॉर्मेटवर शोधतो. मोफत ईंग्रजी पुस्तकांसाठी मला Gutenberg.org, library Genesis, Cincinnatitemple.com, messagefrommasters.com, Osho.com,freeebooks.net, Pdfplanet.com अशा साईटवरून मी बरीच पुस्तके गोळा केली आहेत. आजकाल मराठी

पुस्तकांच्या पिडीएफ फाईलही ब-याच साईटवर उपलब्ध आहेत. विवेकानंदांची पुस्तके मी रामकृष्ण मठावरून विकतच घेत असतो. एखादे ग्रंथ प्रदर्शन अमरावतीमध्ये भरले की, मी प्रथम तेथे वारंवार जावून ओळख वाढवतो मग एकदम भरपूर पुस्तके घेतल्यामुळे मला भरघोस सूट मिळते. अर्थात हे मी बायकोला माहित नसतांना करत असतो. आता तर तिला पुस्तकांचा एवढा कंटाळा आला आहे की, ती कधी कधी फार नाराज होत असते पण ही माझी ‘सवय वजा वेड ‘याला आता काहीही नियंत्रण मला ठेवता येत नाही. असे माझे जीवनाचे क्षण आहेत. बुकचोर डॉट कॉम (Bookchor.com) ही सुध्दा माझी आवडती साईट आहे. मला त्यावर खूप स्वस्त पुस्तके मिळतात. माझा एक वाईट गुणधर्म असा की, मला टी.व्ही. अजिबातच आवडत नाही. तो कोणी लावला की, मला तो फोडून टाकण्याची प्रबळ ईच्छा होते. पण नवीन काळानुरूप मी मनाला फार आवर घालत असतो. जर चुकून एखादे ‘देवमाणूस’ सारखे सिरीयल पाहलेच तर, मग मला मात्र अशी प्रेरणा मिळते की, आपणही एखादे सिरीयल कां लिहिण्याचा प्रयत्न करू नये असे वाटत राहते. ... हंss... मला गाण्याची आवड असल्यामुळे ते कार्यक्रम मी अधुनमधून पाहत असतो.

एखादी गोष्ट पाहण्यापेक्षा ती कला आपण आत्मसात करावी याकडेच माझा कल जास्त असतो. मला कार ड्रायव्हींग फार आवडते कारण मला तोतलाडोह प्रकल्पावर मोतीराम ड्रायव्हरने चार चाकी वाहन चालवायला, अर्थात सरकारी जीपवर शिकवली होती. ती ईच्छा मी प्रथम 1998 ला साधी सेकंड हँड फियाट घेवून पूर्ण केली होती. तिचा वारंवार होणारा त्रास बघून मी मग 2009 मध्ये एक लहानशी मारूती कार घेतली व तिचा आनंद आतापर्यंत म्हणजे 2020 पर्यंत घेत आलो आहे. पण जीवनात याहीपेक्षा आनंदाचे क्षण, माझ्या मुलाने यावर्षी आणले, ते म्हणजे माझा मुलगा आशय हा व आमच्या सुविदय सूनबाई पल्लवी यांनी विदेशातून माझ्यासाठी नवीन ह्युंडाई ऑरा घेण्यासाठी तब्बल नऊ लाख रूपये पाठविण्याचे ठरविले होते त्यानुसार त्यांनी पूर्ण रक्कम पाठविण्याचा प्रयत्न केला, पण मीच,उस गोड असला म्हणून त्यास मुळासकट खावू नये, या तत्वानुसार मी त्यांचेकडून फक्त पांच लाख रूपयेच स्विकारले व बाकीचे माझ्या पेन्शन शिल्लकीतून टाकले व साडे नऊ लाखाची हयुंडाई ऑरा गाडी विकत घेतली आणि सध्या मी नवीन गाडीचा आनंद घेत आहे.

सगळयात आनंदी जीवन हे सेवानिवृत्तीनंतरच असते. कोणते टेन्शन नाही, आराम ही आराम असतो. सरकार भरपूर पेन्शन देत असते. अजून काय हवे. स्वत:चे पाहिजे ते छंद जोपासता येतात. भारत दर्शनाला सुध्दा मी अनेकदा जावून आलो आहे. आता मुलगा आम्हा

उभयतांना विदेशात नेण्यास उत्सुक आहे पण या लॉकडाऊनमुळे ही क्रिया स्थगीत झाली आहे. पण असा योग जीवनात येण्याची शक्यता आहे.

जगातील महान तत्वज्ञ स्पिनोझा म्हणतो की, “आनंदी राहणे हा माणसाचा मूळ स्वभाव आहे”. त्यानुसार जगणे सुरू आहे. खरं तरं या वयात आता स्वास्थ्याकडे लक्ष देणे हेच एक महत्वाचे काम उरले आहे त्यासाठी मी दररोज सकाळी दोन कि.मी. नित्यनियमाने चालत असतो. जापर्यंत आपले आयुष्य आहे तोपर्यंत या जगाचा जेवढा आनंद घेता येईल तेवढा आपण घ्यावा, उगीच जुन्या आठवणींचे रडगाणे गाण्याचे मला आवडत नाही. आजकालचा काळ असा आहे की, जरा कोणाशी संपर्क वाढविला की, त्याचाही त्रास व्हायला लागतो. प्रत्येकाकडे अहंकार वृत्ती बळावत आहे तेंव्हा एकटेच जीवन जगणे क्रमप्राप्त आहे. त्यापेक्षा आपले मनोगत लिहित बसणे काय वाईट. या लिखाणाच्या छंदामुळे एकतर मनोरंजनही होते आणि झालाच तर ईतरांना फायदा व काही प्रेरणा पण जीवनात मिळू शकते. कोणतीही साहित्य निर्मीती ही प्रथम आपल्या आनंदासाठीच असते. त्यात प्रसिध्दीचा भाग हा लेखकांसाठी गौण असतो या मताचा मी आहे. प्रसिध्द कवी वि.वा. शिरवाडकर म्हणजे केशवसूत म्हणायचे की, त्यांच्या कविता मुळात प्रसिध्दिसाठी नव्हत्याच त्याप्रमाणे माझे ही हे आत्मकथन केवळ माझेसाठी एक मनोरंजनाचे साधन आहे.पुढील भाग क्रमांक 37 मध्ये मी आजपर्यंत काय व कसे कसे लिखाण केले याची काही माहिती तीही संक्षिप्त रूपात सादर करेन.
****

17.माझे लिखाणाविषयी

मला वयाच्या पंधराव्या वर्षापासूनच लिखाणाचा छंद जडला होता. मी जेंव्हा वृत्तपत्रातील लहान स्तंभ वाचायचो तेंव्हा मलाही त्यात लिहावेसे वाटे. उदाहरणार्थ ‘प्रश्न तुमचा उत्तर शरद तळवलकरांचे’ असा काही स्तंभ दिसला की मी प्रश्न विचारीत असे व मला पेपरमध्ये माझ्या प्रश्नाची निवड झाल्यावर उत्तर आले की खूप मजा वाटायची. मी पॉलिटेक्निकमध्ये असतांना एक अपयशी प्रयत्न कादंबरी लिहिण्याचा केला होता पण तो अभियांत्रीकी अभ्यासामुळे

यशस्वी होवू शकला नाही. मला तोतलाडोह प्रकल्पावर नोकरी लागल्यावर मी ईंग्रजी पेपरमध्ये Letters to the editor या स्तंभामध्ये खूप पत्रे लिहिली आहेत. सुरूवातीला मात्र माझी चार पत्रे केराच्या टोपलीतच गेली होती तरी सुध्दा मी माझी चिकाटी सोडली नाही उलट मी ईंगजी शब्दसंग्रह एवढा वाढवला की, नंतर माझी पत्रे छापून यायला लागली. त्यावेळी मला आठवते की, द हितवादमध्ये नव्यानेच Micro stories व Height of .... वेगवेगळे विषय जसे की, Height of honesty, attitude असे स्तंभ प्रकाशीत व्हायचे त्यात मी भाग घेत असे. त्यात हजारो लोकांच्या एन्ट्रीज येत होत्या व त्यातल्या निवडक वाक्यांना त्यावेळी प्रथम 31, नंतर दुसरे21 व तिसरे 11 रूपयांचे बक्षीस मिळत असे. मला एकदा 11 रूपयाचे बक्षीस मिळाले व ही अकरा रूपयाची रक्कम मला तोतलाडोह सारख्या दुर्गम प्रकल्पस्थळी मनीऑर्डरने प्राप्त झाली होती. मला अकरा रूपये 1977 ला मिळाल्याचा एवढा आनंद झाला होता की, मग मी Horizontal Reading या कॉलममध्ये पण भाग घ्यायचो. ही सर्व पेपरची कात्रणे आजही माझेकडे जपून ठेवलेली आहेत.

नंतर हळूहळू मी Nagpur Times या वृत्तपत्रामध्येही लिखाण करीत असे. मी साधा Diploma in Civil Engineering होतो आणि ईंगजी पेपरमध्ये माझे लिखाण प्रसिध्द होत असे याचे डिग्री वाल्यांना खूप नवल वाटत असे. तोतलाडोहला असतांना माझी ओळख एका मॉरीशसवरून आलेल्या माणसाशी झाली कारण तो ख्रिश्चन असल्यामुळे त्याची बायको तोतलाडोहला कॉन्हेंटमध्ये शिकवायची कारण ती नागपूरला राहात असे. क्रिस जी. लिट्टल असे त्याचे नांव होते. त्याचे सहवासात माझी ईंग्रजी अजूनच छान झाली. गंमत अशी की, ज्ञान आणि मातृभाषा यात बराच फरक असतो. हा क्रिस जेंव्हा त्याच्या लहान मुलासोबत बोलायचा त्यावर मी खूप लक्ष ठेवित असे. गंमत म्हणून एक उदाहरण सांगतो. त्याचे लहान मुलाच्या नाकाला शेंबूड आला होता. त्यास “ तुझे नाक शिंकर असे म्हणायचे होते. तेंव्हा मलाही हा प्रश्न पडला की, हा आता काय म्हणेल. क्रिस म्हणाला...”Blow your nose, and take a sip of your milk. तेंव्हा मला कळत असे की, नाक शिंकरण्याला Blow असे म्हणतात. अशा अनेक ईंग्रजी परीभाषा मला त्याचेकडून कळल्यामुळे मी सुध्दा अस्खलीत ईंग्रजी बोलायला शिकलो होतो, हे विशेषच. असे म्हणतात की, बोलभाषेला केवळ दोन हजार शब्दांची आवश्यकता असते पण आपण कितीही शब्द संगह वाढवला तरी जोपर्यंत आपण मातृभाषेवाल्याच्या संपर्कात येत नाही तोपर्यंत आपल्याला फ्ल्युयंसी येत नाही. हीच गोष्ट हिंदीच्या भाषेबाबतही लागू होते. उधर गर्दीमे कैसे वळेंगे, किंवा कपडे पिळणेको डाले थे अशा आपल्या मराठी

भाषिकांच्या चुका होणे व त्यातून विनोद निर्मीती होणे ही नित्याचीच बाब आहे. हे सर्व मी केवळ गंमत म्हणून सांगितले आहे.

माझे चुकून जर कोणाशी भांडण झाले तर माझी ईंग्रजी जास्त वाचनामुळे उफाळून येते व मग तो अधिकारी जरी असला तरी थोडयाच वेळात चूप बसत असतो. हा अनुभव मला खूपदा आला आहे. आपल्याकडे सर्वांना ईंग्रजी भाषा येते मग ती कशीही असो पण जर कोणी बोलायला सुरूवात केली की, लोकं विनाकारणच गैरसमज करतात की, हा शिष्टपणा मारत आहे. हे लिहिण्याचे कारण एवढेच आहे की, आजकालच्या मुलांना वाटते की तेच कॉन्व्हेंटमध्ये शिकले आहेत आणि आमच्या सारख्या वयस्कर माणसांना काहीच समजत नाही. ही भावना नवीन पिढीने काढून टाकावी यासाठी या भाषेच्या गंमती मी या परिच्छेदात सांगितल्या आहेत. बाकी काही नाही.

जसजसे वय वाढत गेले तसतसे लिखाण वाढले. मी माझ्या जीवनातले पहिले पुस्तक “नोकरशाहितील बाळूच्या गमतीजमती” हे लिहिले आहे. त्यांनतर “ आजच्या जगात वावरतांना” हे दुसरे व त्यानंतर ॲमॅझॉन डॉट कॉमवर तीन ईग्रजी साहित्य निर्माण केले आहे. आणि आता प्रतिलीपीवर चुटूक बुटूक लिहिणे सुरू असते. याशिवाय जीवनाचा चांगला टाईमपास अजून काय असू शकतो. पुढील भागात मी जीवनात आलेल्या काही विविध दु:खाबाबत सांगेन. तोपर्यंत कपया प्रतिक्षा करावी ही सर्व वाचकांना विनंती.

****

18.जीवन दु:खाचा आराखडा

" No words are enough to express the pain of a soul".-The Randomvibez.com

धार्मिक पुस्तकांमध्ये दु;खाचे तीन भाग पाडलेले आढळतात. आधिभौतिक,आधिदैविक आणि अध्यात्मिक असे ते तीन प्रकार होय. ही दु:खे आपल्याला सहसा टाळता येत नाहीत. ती एकतर चूपचाप सहन करावी लागतात किंवा त्यावर असणारा काळ तसाच जावू दयावा लागतो.

Pain takes it own time असे बरेचदा डॉक्टर मंडळी पण आपणास सांगतात. असेच काही प्रसंग जे मला आठवतात किंवा माझ्या जीवनात वडिलांनी सांगितले ते या भागात कथन करण्याचा विचार आहे. मला ही घटना आठवत नाही पण माझे वडिल म्हणाले होते की, मी वेगावला असतांना घराशेजारी असलेल्या दगडाच्या ओटयावर खेळतांना वरून धाडकन डोक्यावर आपटलो. कपाळ एवढे फुटले होते की, रक्तपुरवठा काही केल्या थांबत नव्हता. त्या काळात खेडयामध्ये सर्वात चांगला उपाय म्हणजे जखम खोल असली की, त्यामध्ये काथ आणि चुना दाबून दयायचे. व कसेही करून रक्त थांबवायचे. त्याकाळी कोणी डॉक्टरकडे जावून जखमेवरील कातडी शिवून घ्यावी अशी प्रथाच नव्हती. ही जखम जरी मला आठवत नसली तरी ते माझ्या कपाळावरील व्रण (व-हाडी भाषेत चोंद) अजूनही माझे कपाळावर जशीच्या तशीच आहे. हा पहिला शारिरीक दु:खाचा प्रसंग. हा प्रकार आधिभौतिक दु:ख प्रकारात मोडतो. यावेळी मी पहिल्या वर्गात पण जायचाच होतो.

दुसरा प्रसंग मी हिवरा मजरा ता. वणी येथे असतांना तिस-या वर्गात होतो. माझे वडिल मुख्याध्यापक होते. शाळा पांच वाजता सुटली. शाळेचे गेट बाबांनी बंद केले होते पण मी व माझा लहान भाऊ विनोद गेटच्या मागे राहून गेलो होतो. विनोद म्हणाला...'भाऊ, आपण तारातून जावू. दोघेही धावत कोण पहिले जातो अशा शर्यतीत तो लहान असल्यामुळे लवकर कंपांउडच्या तारातून निसटला आणि मला तो तार आणि त्यावर असलेला खिळा असा काही पायाला रूतला की, मी रक्तबंबाळ झालो. ही सुध्दा जखम अजूनही माझ्या पायावर आहे. खोल जखमा त्याकाळी टाक्याअभावी तशाच रहात असत. हा प्रकारही आधिभौतिक दु:ख प्रकारात मोडतो.

चिखलद-याच्या शाळेत असतांना एकदा डाव्या बोटाला कांडे झाले होते. कांडे म्हणजे बोटाच्या काठावर पुढील टोकावर पिवळसर पणा येवून ते पिकत असते. तेथे जेंव्हा चिरा दिला

तेंव्हा मला चक्कर आल्यासारखे वाटले होते. हे कशामुळे झाले हे मात्र कळले नाही. वास्तविक मी जिमनॅस्टीक प्लेयर असतांना कधीच माझा हात पाय तुटला नाही. पण हे असे घडणे हे कदाचित आधिदैविक दु:खात येत असावे.

त्यानंतर 1970 ते 1977 पर्यंत मला साधा तापही किंवा सर्दीपडसा पण झाला नाही. मी नियमीत दहा सुर्यनमस्कार व दहा बैठका काढत असे कारण ही आमच्या वडिलांनी मला लावलेली संवय होय. जर ही क्रिया केली नाही तर माझे वडिल मला जेवायलाच देत नव्हते. प्रकल्पावरील टनेलच्या कामावर असतांना बोगदयामध्ये सर्व्हे सुरू असतांना एकदा बोगदयाच्या वरच्या असंधानकीय (Non-concreting portion) भागातून काही मातीचे चिपोरे माझ्या डोक्यावर पडत होते. असे लक्षण म्हणजे वरून मोठा दगड पडण्याचे असते हे आम्हा अभियंत्यांना अवगत होते. त्यावेळी मात्र मी व माझा लेबर स्टाफ यांनी त्वरीत तेथून पळ काढला व लगेच खरंच एक मोठा दगड तेथे पडला. याला अध्यात्मिक दु;ख असे म्हणतात पण यातून माझी सुटका झाली. असाच प्रसंग प्रकल्पावर एका जुनघरे नावाच्या अभियंत्यावर आला होता व त्याला मात्र डोक्यावर हलका मार लागूनही चार टाके पडले होते. या गोष्टी आम्हाला अंगवळणी पडल्या होत्या. कारण आमच्या समोर तोतलाडोह प्रकल्पावर किमान मी असे अपघात तीन वेळा पाहले की ज्यात मजूरांचा मृत्यू झाला होता.

धरणावरील उर्ध्वभागात एकदा ईनटेक स्ट्रक्चर्स चे काम चालू असतोना मी वर उभा होतो. ते टॉवर जवळपास 100 फूट उंच होते. तेथे काँक्रीट चालु होते. अचानक एका मजूराचा तोल गेला व तो तेथून खाली पडला. खाली अर्धवट काँक्रीट चबुतरा नुकताच अर्धवट स्थितीत बांधलेला होता त्यामुळे त्यातील उभ्या सळाखी तशाच होत्या. त्यावर हा मजूर पडला. महाभारतात भिष्मपितामह जसा बाणांवर ठेवल्या गेला होता तशी या मजूराची स्थिती झाली होती. पण ते पितामह ईच्छामरणी होते.आपण सामान्य माणसं. त्याला तात्काळ मृत्यू आला. अशा प्रकल्पावर आम्हाला सरकार 20 % रिस्क अलाँउंस दयायचे तरी मला शासन नोकरी तेथे करावीच लागली. हे सर्व अध्यात्मि क दु:खात येत असते. यातून माझी सुटका होत गेली ही ईश्वराचीच कृपा म्हणावी. या विश्वातील ईश्वर शक्ति माना अगर नका मानू आपण तर येथे उपरेच जन्माला आलो आहे असे कधी कधी वाटते. आपला जन्म हा आपल्या मर्जीने झालेला नाही तसेच आपला मृत्युही आपल्या मनाप्रमाणे होणार नाही हे त्रिवार सत्य आहे.

यानंतर 2008 मध्ये माझी बायको मुलाकडे पुण्याला काही दिवस रहायला गेली होती. जावून केवळ दोनच दिवस झाले होते. ती सांगून गेली की, रोज सायंकाळी देवीच्या मंदिरात जात जा. मी शक्यतोवर मंदीर चकरा मारत नसतो. तिच्या सूचना तिचे माघारी तरी पाळाव्या असे वाटले आाणि देवीच्या मंदीरात गेलो. थोडा वेळ बाकावर बसलो. उन्हाळयाचे दिवस असूनही एक मच्छर मला चावला. घरी येत नाही तर उन्हाळा असूनही मला लगेच खूप थेडी वाटायला लागली. मी जवळच असलेल्या ओळखीच्या डॉ. सारडा यांचे कडे गेलो. त्यांनी रक्त तपासायला लावले आणि मग निदान केले की, मला डेंग्यू झाला आहे. मी माझे नातेवाईक असलेल्या डॉ. मापारी यांचेकडे तपासायला गेलो तेंव्हा त्यांनी मला अॅडमिट केले. माझे प्लेटलेट्स 50000 पर्यंत खाली आले. माझी बायको घाबरली होती. माझ्यासाठी प्लाविक (Blood Plasma) ची गरज होती. आमचे खेमकामध्ये राहणारे मित्र श्री. कैलास शर्मा यांनी ताबडतोब एका तरूण माणसाला बोलावले व त्याच्या रक्त देणगीमुळे माझे प्राण वाचले. त्या तरूणाचे मला आता नांव आठवत नाही पण त्याचे अनंत उपकार मात्र मला आठवतात.

मी एक ईंग्रजी पुस्तक “द सिक्रेट” वाचले होते. हे पुस्तक र्हांडा बर्न या लेखिकेने लिहिले आहे. ती त्या पुस्तकात म्हणते की, या निसर्गात आपण प्रत्येक गोष्टीचे आभार मानायला पाहिजे व थ्यँक्यू म्हणायला पाहिजे मग ते झाड असो की प्राणी असो वा मदत करणारा अनोळखी माणूस असो . या बाबीची मला येथे आवर्जून आठवण झाली.

आता शेवटचा प्रसंग सांगतो आणि या प्रकरणाला विराम देतो. आजकाल माझी शुगर वाढत चाललेली आहे. ती मी ब-यापैकी नियंत्रणात आणीत असतो तरीपण वर्धेला एकदा माझी कन्या मृदुला हिचेकडे मी सहज भेटीला गेलो. कन्या म्हटलं की, प्रेम हे ओघाओघाने आलेच. तिने मला डोळ्याच्या डॉक्टर सुने मॅडमकडे नेले. तिने मला दोन्ही डोळयात मोती विंदू असल्याचे सांगून घाबरविले. मी तीन महिण्यानंतर ऑपरेशनच्या तयारीने वर्धेला गेलो आणि काय आश्चर्य की माझे हे ऑपरेशनही टळले आहे. डॉक्टर म्हणाल्या ..’तूर्त तरी तुमच्या डोळयाचे ऑपरेशन करण्याची गरज नाही.’ मी आनंदी झालो. आता पुढे बघू जीवनात काय व कसे घडत राहते ते. तोपर्यंत तुम्ही मात्र माझे आत्मकथन वाचत चला. हीच विनंती.

****

आयुष्याचे क्षण वेचतांना काही आठवणी आई वडिलांच्या पण मला आठवतात. त्या गरीबीचा माझेशी ही संबंध येत असल्याने मी या भागात काही आठवणी कथन करतो. मी तिस-या वर्गात असतांना आमचेकडे एवढी गरीबी होती की, माझी आई ब-यापैकी सुशिक्षीत असल्यामुळे ती खेडे विभागात गरीब बायांच्या चोळया (व-हाडी भाषेत झांपर किंवा सध्या प्रचलीत भाषेत ब्लाऊज म्हणा.) हाताने शिलाई करून शिवत होती. त्याचे केवळ चार आणे म्हणजे आजचे पंचेवीस पैसे मिळत असे. आई हाताने चोळया शिवते ही बाब माझ्या वडिलांना पटली नाही. त्यांनी तिला एक उषा कंपनीची मशीन त्याकाळी 1964 ला घेवून दिली. त्या मशीनची किंमत त्यावेळी फक्त 250 रूपये होती.आई जे पैसे दिवसभ-यात मिळवायची त्याचा हिशोब मी लहान असलो तरी लिहून ठेवण्याची जबाबदारी माझ्या कडे दिल्या गेली होती. 250 रूपये मशीनची किंमत वसूल होत पर्यंत आम्ही तो जमा व येणारा रीळांचा खर्च नित्यनियमाने लिहित होतो. ते पैसे वसूल होण्यासाठी आम्हाला म्हणजे आमच्या आईला तब्बल 30 महिण्याचा कालावधी लागला. अशा शिवणकलेमुळे आमच्या आईला गावातील लोक मास्तरीन बाई म्हणत असे.

वयाच्या बारा वर्षापर्यंत आमच्या घरी भाकरीचाच स्वयंपाक असे. पोळी फक्त सणासुदीला व्हायची. माझे वडील मात्र आम्ही वणी शहरात रहायला आल्यावर दर महिण्याच्या एक तारखेला पगार झाला की, मला व माझ्या लहान भावाला 40 पैसे हॉटेलमध्ये जावून भजे खाण्याकरीता दयायचे. त्यावेळी वणी शहरात आम्ही दोघे भावंडे 20 पैसे प्लेट प्रमाणे राजपुताना हॉटेलमध्ये दोन प्लेट भजे खात होतो. मी हूशार असल्यामुळे घरचा किराणा आणण्याचे कामही माझेच असे. मला आठवते की, त्यावेळी 1967 मध्ये खाण्याचे तेलाचा भाव 2.40 रूपये एवढा होता. 1968 मध्ये वडिलांनी एक नॉर्टन कंपनीची सायकल खरेदी केली होती. व एक टिटोनी कंपनीची हाताची घडयाळ घेतली होती. आज त्याचेच रूप टायटन झाले असावे असे वाटते. जुना काळ मोठा गमतीचा व संघर्षाचा असे. आम्हाला पांचव्या वर्गापर्यंत चप्पल घालायला मिळत नसे. दर वेळी पायात काटा रूतला की, पायातील काटे काढण्याचे कौशल्य असलेल्या कोणाला तरी गावातल्या माणसाला बोलावून तो काटा काढण्याचा उदयोग करावा लागत असे. आम्ही लहानपणी केवळ हाफ पँट घालत होतो त्याखाली चड्डी घालण्याची प्रथा नव्हती. मग काय निर्गुडा नदीवर पोहायला गेलो की नग्न अवस्थेत पोहावे लागत असे. नदीवरील स्त्रिया खूप हसायच्या. कारण माझे वय 13 वर्षाचे झाले होते. असे कितीतरी किस्से यासाठी सांगावे

लागतात की, आजच्या पिढीला जुन्या काळाची काहीतरी कल्पना यावयास पाहिजे. एवढाच माझा हेतू आहे.

1998 च्या दरम्यान आई व त्यानंतर 2005 च्या दरम्यान वडिलांचे निधन झाले. मी माझ्या आईला कारमध्ये बसवू शकलो नाही पण वडिलांना मात्र जुनी कां असेना पण फियाट कारमध्ये खूप फिरविले. आजकाल तर माझा मुलगाही मला विमानात फिरवतो, ही भाग्याची गोष्ट आहे. जोपर्यंत माणसाला मन आहे तोपर्यंत मानवी ईच्छांना अंत नाही. आयुष्याची दोरी किती आहे याची कल्पना कोणासही नसते त्यामुळे जेवढे दिवस आनंदाने जगता येईल तितके दिवस आनंदात घालवावे या मताचा मी आहे.

प्रत्येक माणसाचे व्यक्तिमत्व,स्वभाव,छंद,ईच्छा या तो जन्मभर जोपासत असतो पण मृत्यूच्या वेळी मात्र त्याला हे सर्व सोडून जावे लागते. उरतं काय ते केवळ आपल्या आठवणी. आपण जमा केलेल्या संपत्तीपेक्षा आपण निर्माण केलेली प्रतिष्ठा, प्रसिध्दी, मान व जीवनात केलेली प्रगती तसेच आपला स्वभाव याच आठवणी चिरकाल टिकतात. त्यावरच पुढील पिढीचा आधारस्तंभ हा अवलंबून असतो असे मला वाटते.

माझ्या भावी ईच्छांचा आराखडा पाहला तर माझी अशी ईच्छा आहे की, अजून भरपूर वाचन करावे व लोकोपयोगी पुस्तकांची निर्मीती करावी. तसेच माझा आयुष्यात जमविलेला ग्रंथ संग्रह हा माझ्या मुलाने किंवा मुलीने यापुढे सांभाळावा तसेच माझी डिजीटल लायब्ररी जी माझे संगणकात आहे ती तशीच ठेवून संगणकाला फॉर्मेट न मारता सुरक्षीत ठेवावी अशी ईच्छा आहे.

पुढील भागामध्ये मी माझ्या आत्मकथनाचा समारोप करीत आहे. आता जे काही जीवनातून सांगायचे सुटलेही असेल त्याची मला आवश्यकता वाटत नाही. सर्व घटना मी संक्षेपात लिहिलेल्या आहेत कारण आजकाल वाचकांचा वेळही माझे दृष्टीने महत्वाचा आहे.

समारोप परीच्छेद

"There is no real ending. It's just the place where you stop the story”.- Frank Herbert

आता मी माझे संक्षिप्त आत्मकथन या ठिकाणी संपुष्टात आणत आहे. मला या गोष्टीची पूर्ण जाणीव आहे की, मी काही नावाजलेला लेखक नाही. तरी सुध्दा माझ्या जीवन घडणातून कोणाला काही प्रेरणा मिळावी या हेतून मी हे कथन केलेले आहे. या कथनात काही व्याकरणाच्या चुकाही असू शकतील हे मी नाकारू शकत नाही. माझ्या या आत्मकथनाला प्रतिलीपीवर ज्या वाचकांनी भरपूर प्रमाणात प्रतिसाद दिला आहे त्यांचा मी मन:पूर्वक आभारी आहे. ज्यांनी हे वाचले नसेल त्यांना वाचलेल्यांनी प्रेरीत करावे अशी माझी ईच्छा आहे. सर्व बाबी या संक्षेपातच लिहिल्या आहेत कारण जास्त पाल्हाळा लावण्यात मला स्वारस्य वाटले नाही. पुस्तक म्हटलं की, ते किमान दोनशे पानाचे व्हावे असे वाटत होते. पण जे काही ईश्वर कृपेने माझ्या हातून लिहिल्या गेले असेल त्यातच मी समाधानी आहे. या पुस्तकात प्रत्येक परीच्छेदापुर्वी मी काही ईंग्रजी कोटेशन्स वापरलेली आहेत ती काही माझ्या प्रचंड वाचनातून व काही ईंटरनेट माध्यमातून घेतलेली आहे. तेथे तो तो संदर्भ दिला आहे. ते ही एक चांगले वाचकांच्या संग्रही रहावे या हेतून मी ते लिहिले आहे. प्रत्येकाचेच जीवन हे संघर्षमय असते पण तो लिहित नाही. मी मात्र मला सेवानिवृत्तीनंतर वेळ असल्यामुळे मी हे लिहिलेले आहे. मला लिखाणाचा छंद आहे त्याचा मी मनोरंजनासाठी फायदा घेत असतो.

ही काही माझ्या जीवनाची पूर्ण कहानी नाही. माझी तब्येत अजून परमेश्वर कृपेने चांगली असल्यामुळे मी तरी या जीवनाला माझी लेखन सुरूवातच समजतो. माझ्या हातून पुढे काहीतरी समाजोपयोगी घडावे या सदीच्छेसह मी या पुस्तकाचा समारोप सहर्ष करीत आहे. सर्व भावी वाचकांना माझ्या खूप खूप शुभेच्छा. माझे जीवन मी तरी ग्रंथमय केले आहे तसेच तुम्ही सुध्दा तुमचे जीवन ग्रंथमय करा व सदोदीत आनंदी रहावे हीच परमेश्वर चरणी माझी प्रार्थना.

नमस्कार.....

प्रकाश राऊत अमरावती दि. 7.09.2021

****

**समाप्त **

संदर्भ

1. कोटशन्स ईंटरनेटवरून
2. वाचन- एका पानाची कहाणी वि.स. खांडेकर आत्मचरीत्र
3. संस्कृत आठवणीतून
4. प्रार्थाना आठवणीतून
5. आधार स्तंभ- माझे नवशे पुस्तकांचे वाचन
6. प्रेरणा प्रतिलीपी ॲपवरून

****